## जागा बदलाबाबत काँग्रेसची ठाकरेंशी चर्चा

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६ :**
महाविकास आघाडीचे जागावाटप निकाली निघाल्याच्या दावा करणाऱ्या काँग्रेसने आज पुन्हा एकदा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाशी जागा बदलावर चर्चा केली.

ज्येष्ठ काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी आज मातोश्रीवर जाऊन जागावाटपाविषयी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांचा निरोप त्यांना कळवला. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना थोरात यांनी याची पुष्टी केली. यावेळी त्यांनी आपल्या मुलीविषयी भाजप नेत्याने केलेल्या विधानाचा कडक शब्दांत निषेध केला. बाळासाहेब थोरात यांनी शनिवारी उद्धव ठाकरेंची भेट घेतल्यानंतर पत्रकारांना माहिती दिली.

Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in
मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५४ * अंक २०० * * नागपूर * | रविवार, दिनांक २७ ऑक्टोबर २०२४ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)




# महाविकास आघाडीतील तिन्ही पक्षांची दुसरी यादी जाहीर

## काँग्रेस २३, राकाँ २२ तर उबाठाचे १८ उमेदवार

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६ :**
महाविकास आघाडीतील काँग्रेस, राष्ट्रवादी शरद पवार गट आणि शिवसेना उद्धव ठाकरे गट यांनी त्यांच्या उमेदवारांची दुसरी यादी आज जाहीर केली. शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसच्या दुसऱ्या यादीत २२ उमेदवारांचा समावेश आहे.

राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी शनिवारी दुपारी येथे आयोजित एका पत्रकार परिषदेत आपल्या पक्षाची दुसरी यादी जाहीर केली.

काँग्रेसने शनिवारी विधानसभा निवडणुकीसाठी आपली २३ उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली. सावनेरमधून अनुजा सुनील केदार तर नागपूर दक्षिणमधून गिरीश पांडव यांना उमेदवारी देण्यात आली आहे. काँग्रेसने आपल्या यापूर्वीच्या पहिल्या यादीत ४८ उमेदवारांच्या नावांची घोषणा केली होती. त्यानंतर शनिवारी जाहीर केलेल्या दुसऱ्या यादीत २३ उमेदवारांच्या नावांची घोषणा करण्यात आली.







उमेदवारांची यादी : पान ८ वर

मविआतील तिसरा घटक पक्ष उद्धव ठाकरे शिवसेनेने त्यांच्या १८ उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली आहे. आज शनिवारी प्रथम १५ उमेदवारांच्या नावाची घोषणा केल्यानंतर पुन्हा ३ उमेदवारांची नावे समाविष्ट करण्यात आलीत. तिन्ही पक्षांकडून सोमवारपर्यंत अंतिम यादी जाहीर केली जाणार असल्याचे सांगण्यात येते.

**परांडावरून वाद?**
शरद पवार गटाने धाराशिव जिल्ह्यातील परांडा विधानसभा मतदारसंघात माजी आमदार राहुल मोटे यांना उमेदवारी दिली आहे. या ठिकाणी ठाकरे गटाने यापूर्वीच राहुल ज्ञानेश्वर पाटील यांना उमेदवारी दिली आहे. त्यामुळे या ठिकाणी महाविकास आघाडीतील दोन्ही पक्षांत वाद होण्याची चिन्हे आहेत. जयंत पाटील यांनी या प्रकरणी शिवसेना ठाकरे गटाशी चर्चा करून तोडगा काढण्याची ग्वाही दिली.

## पटोलेंच्या पत्रामुळे वादाची ठिणगी?

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६ :**
महाविकास आघाडीतील जागा वाटपाचा घोळ सुटण्याऐवजी वाढत जात आहे. शिवसेना उबाठाने जाहीर केलेल्या उमेदवार यादीत काँग्रेसने दावा केलेल्या जागांचा समावेश आहे.



यामुळे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी उद्धव ठाकरे यांना पत्र लिहिले. शरद पवार यांच्याकडेही गाऱ्हाणे मांडले. या पत्रामुळे महाविकास आघाडीत नाराजीनाट्य सुरु झाले आहे. उद्धव ठाकरे या पत्रामुळे कमालीचे नाराज झाले आहे. उद्धव ठाकरे यांनी उमेदवारांची यादी जाहीर केली. या यादीत काँग्रेसने दावा केलेल्या १२ जागांचा समावेश आहे. त्या १२ जागा मुंबई आणि विदभार्तील आहे. त्यामुळे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांना पत्र लिहिले.
उद्धव ठाकरे या पत्रामुळे कमालीचे नाराज झाले आहे. यापुढे काँग्रेस प्रदेशाध्यक्षांसोबत कोणतीही चर्चा करायची नाही? असा मानस त्यांनी बोलून दाखवला.

## भाजपची दुसरी यादी जाहीर : अनेकांना दुसऱ्यांदा संधी, काहींना डच्चू

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६ :**
आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीमधील भाजप पक्षाकडून दुसरी यादी जाहीर करण्यात आली आहे. या यादीत २ २ उमेदवारांचे नावे जाहीर करण्यात आली आहे. या यादीत काही विद्यमान आमदारांनाच पुन्हा संधी देण्यात आली आहे. तर काही नवीन चेहऱ्यांना देखील निवडणुकीच्या रिंगणार उतरवण्यात आले आहे. पहिल्या यादीमध्ये भाजपने ९९ उमेदवारांच्या नावाची घोषणा केली होती.

यादी पान ८

त्यानंतर आता भाजपकडून २२ उमेदवारांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. दोन्ही यादी मिळून एकूण १२१ उमेदवारांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे.

## भारत ढेपाळला, किवीकडून कसोटी मालिका गमावली

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. २६ :**
भारतीय संघाने न्यूझीलंडविरुद्धची कसोटी मालिका गमावली आहे. पुण्यात खेळल्या गेलेल्या दुसऱ्या कसोटीत टीम इंडियाचा किवीजकडून ११३ धावांनी पराभव झाला.

या विजयासह किवींनी ३ सामन्यांच्या मालिकेत २-० अशी अभेद्य आघाडी घेतली आहे.

शनिवारी सामन्याच्या तिसऱ्या दिवशी ३५९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करणाऱ्या भारतीय संघाला दुसऱ्या डावात केवळ २४५ धावा करता आल्या.



मिचेल सँटनरने पहिल्या डावात ७ तर दुसऱ्या डावात ६ बळी घेतले. भारतीय संघाने १२ वर्षांनंतर घरच्या मैदानावर कसोटी मालिका गमावली. तिसरी कसोटी १ नोव्हेंबरपासून सुरू होईल.

## पंजाबचे चार महामार्ग अनिश्चित काळासाठी बंद

■ **वृत्तसंस्था, चंदीगड, दि. २६ :**
पंजाबमध्ये धानाची उचल न झाल्याने नाराज झालेल्या शेतकऱ्यांनी आज (शनिवारी) राज्यातील चार महामार्ग बंद केले आहेत. मागण्या मान्य होईपर्यंत हे आंदोलन सुरूच राहणार आहे. केंद्र आणि राज्य सरकार त्यांच्या मागण्यांकडे लक्ष देत नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे.



किसान मजदूर मोर्चा आणि किसान संयुक्त मोर्चा गैर (राजकीय) संयुक्त मंचाचे नेते सर्वन सिंह पंढेर यांनी सांगितले की, आज दुपारी १ वाजल्यापासून पंजाबचे ४ महामार्ग रोखण्यात आले आहेत.









# प्रहार संघटनेचे प्रदेशाध्यक्ष अनिल गावंडे यांचा भाजपात प्रवेश

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २६ :

प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रदेशाध्यक्ष अनिल गावंडे यांनी शनिवारी आपल्या सहकाऱ्यांसह भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला. प्रदेशाध्यक्ष आमदार चंद्रशेखर बावनकुळे यांनी अनिल गावंडे यांचे स्वागत करत त्यांची भाजपा प्रदेश उपाध्यक्षपदी नियुक्ती केली. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पक्षप्रवेश कार्यक्रमात प्रदेश उपाध्यक्ष आ.डॉ. संजय कुटे, भाजपा प्रदेश सरचिटणीस आ. विक्रांत पाटील, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी उपस्थित होते.



अनिल गावंडे यांच्या प्रवेशामुळे अकोल्यात पक्ष संघटना अधिक मजबूत होईल असा विश्वास बावनकुळे यांनी यावेळी व्यक्त केला. वाशिम जिल्ह्यातील माजी आमदार प्रकाश डहाके यांच्या पत्नी व कारंजा कृषी उत्पन्न बाजार समिती सई डहाके यांनीही राष्ट्रवादी अजित पवार पक्षातून भाजपामध्ये प्रवेश केला.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, प्रहारचे प्रदेशाध्यक्ष अनिल गावंडे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्यातील भाजपाचे नेतृत्व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यशैलीवर विश्वास दाखवत भाजपामध्ये प्रवेश केला आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या योजना, विकासकार्ये तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी अनिल गावंडे प्रयत्न करतील. आ. कुटे यांच्या पुढाकाराने अनिल गावंडे यांच्यासारख्या समर्थ नेतृत्वाने भाजपामध्ये प्रवेश केला आहे. आगामी काळात अनिल गावंडे यांच्या पाठीशी पक्ष खंबीरपणे उभा राहून त्यांचा यथोचित सन्मान राखेल अशी ग्वाही चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

अनिल गावंडे म्हणाले की, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतक-यांच्या आणि स्थानिक समस्या सोडवण्याचा शब्द दिला, त्यांच्या शब्दावर पूर्णपणे विश्वास ठेवून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आपण भाजपा मध्ये प्रवेश करत आहोत.पक्ष जी जबाबदारी देईल ती प्रामाणिकपणे पार पाडेन असेही ते म्हणाले.

## नांदेड जिल्ह्यात पुन्हा भूकंपाचे सौम्य धक्क

■ महासागर प्रतिनिधी
नांदेड, दि. २६ :

मुखेड तालुक्यातील अंबुलगा बुद्रुक व परिसरात शुक्रवारी 25 रोजी दुपारी 2.43 व 3.13 वाजता दोन वेळा भूकंपाचे सौम्य धक्के बसले. दोन वेळा भूगभार्तून आवाज येऊन सौम्य हादरे जाणवले असल्याची माहिती जिल्हा आपत्कालीन कार्य केंद्राने दिली.

या भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर अनुक्रमे 1.5 व 0.7 अशी नोंदवण्यात आलेली आहे. भूकंपाचा केंद्रबिंदू मुखेड शहरापासून 12 किमी दूर दक्षिणपूर्व दिशेला आहे. या धक्क्यांमुळे कुठलीही जीवित आणि वित्तहानी झाली नसल्याची प्राथमिक माहिती जिल्हा प्रशासनाने दिली. नांदेड जिल्ह्यात मंगळवारी 18 रोजी सकाळी 6.52 वाजता 3.8 रिश्टर स्केलचा धक्का बसला होता.

# राज्यात ५२ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त

## दारूचा महापूर हिंगोलीत २ वाहनांतून १.४० कोटी जप्त

■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. २६ :

विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यापासून गेल्या १० दिवसांत सुमारे ९१ कोटी रुपयांची तर त्यापैकी गेल्या २४ तासांत ५२ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली. शनिवारी पुण्यात नाकेबंदीदरम्यान सहकारनगर परिसरात एका टेम्पोतून १३८ किलो सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले, तर हिंगोलीत तपासणी करताना दोन वाहनांतून १.४० कोटींची रोख रक्कम पकडण्यात आली. दरम्यान, पुण्यात २१ ऑक्टोबर रोजी खेड-शिवापूर टोलनाक्यावर पकडलेल्या ५ कोटी रुपयांच्या रकमेचे गूढ दिवसेंदिवस वाढत चालले आहे.

एकूणच निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात पैसे आणि दारूचा महापूर वाहताना दिसत असून राज्य व केंद्र सरकारच्या ११ विविध यंत्रणांद्वारे बेकायदा रक्कम, दारू आणि मौल्यवान धातूंचा साठा हस्तगत करण्यात आला आहे.

१५ ते २४ ऑक्टोबर या १० दिवसांच्या कालावधीत तब्बल ९० कोटी ७४ लाख रुपयांची मालमत्ता जप्त केल्याचा समावेश आहे, तर गेल्या २४ तासांत ५२ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे. राज्यभरात पुणे, नागपूर, मुंबई उपनगर, रत्नागिरी जिल्ह्यांमध्ये निवडणूक यंत्रणेसह इतर तपास यंत्रणांनी बेकायदा कारवाया हाणून पाडल्या आहेत.

पुण्यात जप्त दागिने सराफ व्यावसायिकांचे पुण्यात सकाळी नऊ वाजेच्या सुमारास सिक्वेअर लॉजिस्टिक कंपनीच्या एका पांढऱ्या रंगाच्या टेम्पोला ( एमएच ०२ ई ८११२) पोलिसांनी नाकेबंदी दरम्यान सहकारनगर परिसरात थांबवले. या टेम्पोत १३८ किलो सोन्याचे दागिने पोलिसांना आढळले. हे सोने आता स्वारगेट येथील आयकर विभागाच्या कार्यालयात ठेवण्यात आले आहे. दरम्यान, जीएसटी पावतीसह हे दागिने अधिकृत असून मुंबईतील सराफ व्यापाऱ्यांकडून पुण्यातील व्यापाऱ्यांकडे पाठवण्यात आल्याचे पु.ना.गाडगीळ सन्सचे सीईओ अमित मोडक यांनी स्पष्ट केले आहे.

राज्यभरात सी-व्हिजिल ॲपवर एकूण १ हजार १४४ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यापैकी १ हजार १४२ तक्रारी निवडणूक आयोगाकडून निकाली काढण्यात आल्या आहेत. म्हणजे एकूण ९९ टक्के तक्रारी निकाली काढण्यात आल्या आहेत, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे.

पुण्यात २१ ऑक्टोबर रोजी खेड-शिवापूर टोलनाक्यावर पकडलेल्या ५ कोटी रोकडचे गूढ अद्यापही कायम आहे. सांगोला (जि.सोलापूर) येथील कंत्राटदार बाळासाहेब आसबे यांनी हे आपले वैयक्तिक पैसे असल्याचा दावा केला.

कुटुंबीय व नातेवाइकांकडून ही रक्कम जमा केली असल्याचे सांगितले. परंतु त्याबाबत नेमके स्पष्टीकरण त्यांना देता आले नाही.गेल्या २ वर्षांत आयकर विभागात भरलेल्या परताव्यातही या पैशांचा उल्लेख नाही. त्यामुळे सध्या तरी ही रक्कम केंद्र सरकारच्या नावे एका बँक खात्यात ठेवण्यात आली आहे. कंत्राटदार आसबे यांना ३० दिवसांचा अवधी देण्यात आला. योग्य पुरावा न दिल्यास ही रक्कम केंद्र सरकारच्या तिजोरीत जमा होईल.

हिंगोली बसस्थानक परिसरात पोलिसांनी एका इनोव्हा कारची तपासणी केली असता त्यात १ कोटी २६ लाख ८८ हजार रुपये आढळून आले. याबाबत चालक अमित हेडा यांची चौकशी केली, मात्र त्यांना समाधानकारक उत्तर देता आले नाही. तसेच जुन्या नगरपालिका कार्यालयाजवळ दुसऱ्या इनोव्हा कारच्या तपासणीत १३ लाख ५० हजार रुपये आढळून आले.

पोलिसांनी कारचे चालक गजानन काळे यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनाही रक्कम वाहतुकीचे समाधानकारक उत्तर देता आले नाही. ज्यांच्या वाहनात रक्कम सापडली ते दोघेही व्यापारी आहेत.

# वैद्यकीय महाविद्यालय आर्थिक गैरव्यवहार प्रकरण

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६ :

मुंबई : मायणी वैद्यकीय महाविद्यालयातील आर्थिक गैरव्यवहाराच्या प्रकरणात अटकेत असलेले श्री छत्रपती शिवाजी एज्युकेशन सोसायटीचे संचालक आप्पासाहेब देशमुख यांचे पुत्र दीपक देशमुख यांना उच्च न्यायालयाने शुक्रवारी दिलासा दिला. न्यायालयाने त्यांची अटक बेकायदा ठरवून त्यांची जामिनावर सुटका करण्याचे आदेश दिले.



सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) केलेल्या अटकेला देशमुख यांनी आव्हान दिले होते. तसेच, अटक बेकायदा ठरवून जामिनावर सुटका करण्याची मागणी केली होती. न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे आणि न्यायमूर्ती पृथ्वीराज चव्हाण यांच्या खंडपीठाने देखमुख यांची अटक बेकायदेशीर असल्याचे सकृतदर्शनी आढळून येत असल्याचे निरीक्षण नोंदवले. तसेच, त्यांची जामिनावर सुटका करण्याचे आदेश दिले.

देशमुख यांनी भाजप आमदार जयकुमार गोरे यांचा करोना काळातील रुग्णांच्या नावे निधी लाटल्याचा आरोप केला होता. तसेच, गोरे यांच्यावर कारवाई करण्याच्या मागणीसाठी उच्च न्यायालयात याचिका केली होती.

या याचिकेची दखल घेऊन गोरे यांच्यावरील आरोपांच्या चौकशीचे आदेश दिले होते. दरम्यानच्या काळात ईडीने देशमुख यांना मायणी वैद्यकीय महाविद्यालयातील आर्थिक गैरव्यवहाराच्या प्रकरणात अटक केली. त्यामुळे, ही अटक राजकीय सूडबुद्धीने केल्याचा आरोप देशमुख यांनी केला होता.

# तळ्यात पडलेल्या युवकाचा मृतदेह ११ तासानंतर शोधून बाहेर काढला

■ महासागर प्रतिनिधी
शिर्डी, दि. २६ :

शिर्डी राहाता तालुक्यातील पिंपळवाडी शिवारात गुरुवारी फिट येऊन तळ्यात पडलेल्या २२ वर्षीय युवकांचा मृतदेह ११ तासानंतर अथक प्रयत्नाने अग्निशामक दलाच्या कर्मचाऱ्यांनी शोधून काढला. राहुल दळवी असे मृताचे नाव आहे.

पिंपळवाडी शिवारात संतोष दगडू लांडगे यांची शेती आहे. त्यांनी रेल्वे रुळाला भराव करण्यासाठी त्यांच्या शेतातील माती रेल्वे विभागाला दिल्याने जवळपास १ एकर जागेत वीस ते पन्नास फूट खोल खड्डा पडला. पावसाचे पाणी साचून या खड्ड्याला तळ्याचे स्वरूप आले. गुरुवारी दुपारी ४ वाजे दरम्यान राहुल दळवी व त्याची आई खड्ड्याजवळ बसले होते. राहुल दळवी याला यावेळी अचानक फिट आल्याने तो त्या खोदलेल्या तळ्यात पडला.

घटनेची माहिती समजताच परिसरातील नागरिकांनी राहाता नगरपरिषदेचे मुख्याधिकारी वैभव लोंढे यांच्याशी संपर्क साधला. मुख्याधिकारी लोंढे यांनी राहाता अग्निशामक दलाचे प्रमुख अशोक साठे यांना घटनास्थळी जाण्याच्या सूचना केल्या. नगर जिल्हा येथील अग्निशामक दलाचे प्रमुख शंकर मिसाळ यांनी श्रीरामपूर, शिर्डी व राहाता या ठिकाणच्या नगरपरिषद विभागाच्या अग्निशामक दलाच्या कर्मचाऱ्यांना या संदर्भात माहिती देऊन रेस्क्यू ऑपरेशन करण्यासंदर्भात सांगितले. या कर्मचाऱ्यांनी गुरुवारी तळ्यात पडलेल्या युवकाचा शोध घेण्याची मोहीम सुरू केली. परंतु सायंकाळी ६ नंतर रेस्क्यू मोहिमेला परवानगी नसल्यामुळे ही शोधमोहीम सहानंतर बंद करण्यात आली.

शुक्रवारी पुन्हा ८ वाजे दरम्यान अग्निशामक दलाच्या कर्मचाऱ्यांनी युवकाची शोध मोहीम सुरू केली.

अखेर ११ तासानंतर कर्मचाऱ्यांच्या प्रयत्नाने शुक्रवारी ४ वाजता तळ्यात पडलेल्या राहुल दळवी याचा मृतदेह अग्निशामक दलाच्या कर्मचाऱ्यांनी शोधून बाहेर काढला.

मृत युवकाच्या भावाचा मागील वर्षी अपघातात मृत्यू झाला होता. या युवकाचा पाण्यात पडून मृत्यू झाल्याने आई-वडिलांना आता कुठलाही आधार राहिला नाही. घटनेचा तपास पोलिस निरीक्षक रंजीत गलांडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस करीत आहे. ११ तास-ांच्या शोध मोहिमेनंतर पाण्यात बुडालेल्या युवकाचा मृतदेह शोधून काढला.

# पनवेलमधील आरोपीच्या घरातून पिस्तुल जप्त

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २६ :

माजी मंत्री बाबा सिद्दिकी यांच्या हत्येसाठी वापरण्यात आलेले पिस्तुल आणण्यासाठी राजस्थानला गेलेल्या राम कनोजिया याच्या राहत्या घरातून पोलिसांनी पिस्तुल व तीन जिवंत काडतुसे जप्त केली. आरोपी भाडेतत्त्वावर या घरात राहत होता. दरम्यान, याप्रकरणातील न्यायालयाने नऊ आरोपींच्या पोलीस कोठडीत २६ ऑक्टोबरपर्यंत वाढ केली.

बाबा सिद्दीकी यांची वांद्रे पूर्व परिसरातील निर्मल नगर येथील आमदार, मुलगा झिशान सिद्दीकीच्या कार्यालयाजवळ गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. याप्रकणातील अटक आरोपी नऊ जणांमध्ये गुरमेल बलजित सिंह (२३), धर्मराज कश्यप (२१), हरीशकुमार निषाद (२६), प्रवीण लोणकर (३०), नितीन गौतम सप्रे (३२), संभाजी किसन पारधी (४४), प्रदीप दत्तू ठोंबरे (३७), चेतन दिलीप पारधी आणि राम फुलचंद कनोजिया (४३) यांच्या पोलीस कोठडीत वाढ करण्यात आली आहे. सिद्दीकी यांच्या हत्येत सहभागी आरोपी राम कनोजिया हा पनवेल येथील पळस्पे फाट्याजवळ भाडेतत्त्वाने घर घेऊन राहत होता. त्याच्या घरातून पोलिसांनी पिस्तुल व तीन जीवंत काडतुसे जप्त केले.

# कोलकाता-पुणे विमानात बॉम्ब ठेवल्याची धमकी

■ महासागर प्रतिनिधी,
पुणे, दि. २६ :

पुण्यातून उड्डाण घेणाऱ्या तसेच पुणे विमानतळावर दाखल होणाऱ्या वेगवेगळ्या विमानांत बॉम्ब ठेवल्याचे मेसेज मागील काही दिवसांपासून सातत्याने येत असल्याने त्याचा फटका हवाई वाहतुकीला बसत आहे. अशाचप्रकारे पुन्हा एकदा इंडिगो विमान कंपनीच्या कोलकाता ते पुणे (६ ई १३३- ६ ई१३५) या विमानात बॉम्ब ठेवल्याचा मेसेज ट्विटरवरून कंपनीला प्राप्त झाल्याने खळबळ उडाली. तपास यंत्रणांनी सदर विमानातील प्रवासी व सामानाची तसेच विमानाची तपासणी केल्यानंतर ही अफवाच असल्याचे निष्पन्न झाले.

याप्रकरणी इंडिगो कंपनीच्या वतीने सुरक्षा अधिकारी प्रसाद चंद्रकांत जाधव (वय-४०,रा.धनकवडी, पुणे) यांनी अदामलांझा २२२ या एक्स हँडलचा अज्ञात वापरकर्ता याच्यावर विमानतळ पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यानुसार पोलिसांनी अनोळखी आरोपीवर भान्यांस १२५, ३५१ (४), ३५३ (१) नुसार गुन्हा दाखल केला आहे. २४ ऑक्टोबर रोजी दुपारी १२ वाजून ५७ मिनिटांनी इंटरग्लोब एव्हिएशन, ग्लोबल बिजनेस पार्क, गुरगाव, हरियाणार येथील कार्यालयात इंडिगो ६ ई या अधिकृत एक्स कॉर्प हँडलवर मेसेज आला की, प्लान्टेड बॉम्ब ऑनबोर्ड ऑफ २० ऑफ युअर प्लॅन्स. द फ्लाइट आर ६ ई ११, ६ ई १७, ६ ई १२५, ६ई ५८, ६ई १३३, ६ ई१३५, ६ई१४९, ६ई१९६,६ई२०१, ६ई२३५, ६ई२३५, ६ई२३६,६ई२५९, ६ई२६५, ६ई २७७, ६ई२८२,६ई३०४, ६ई३३४,६ई३६२, ६ई३९४. नो वन विल गेट आऊट अलाईव्ह.ट्रीट धीस ॲज युअर लास्ट डे अशा प्रकारे लिहिलेला मजकूर पाठवण्यात आला.

त्यानुसार कंपनीने तातडीने याबाबतची माहिती पुणे विमानतळाला व तपासयंत्रणांना दिली. त्यानुसार सदर विमानातील प्रवासी तसेच एअरपोर्ट परिसरातील नागरिक व प्रवाशांमध्ये खोटी माहिती, अफवा पसरवून भीतीदायक वातावरण निर्माण करुन त्यांचे जीवीताच्या सुरक्षतेस धोका निर्माण केला गेला आहे.

# रात्री १० ते सकाळी ६ पर्यंत फटाके वाजवण्यास बंदी

■ महासागर प्रतिनिधी
नाशिक, दि. २६ :

नाशिक - प्रदूषण नियंत्रण महामंडळाच्या सूचनेनुसार वायु प्रदूषण करणारे फटाके विक्री व वाजवणे तसेच रात्री 10 ते सकाळी 6 या कालावधीत फटाके वाजविण्यास बंदी घालण्यात आली असून त्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर महापालिका व पोलिसांची नजर असणार आहे. फटाके वाजवताना वायू प्रदूषण वाढणार नाही याची काळजी घेण्याचेही महापालिकेच्या पर्यावरण विभागाने आवाहन केले आहे.

केंद्र सरकारच्या राष्ट्रीय शुद्ध हवा कार्यक्रमांतर्गत झालेल्या सर्वेक्षणात नाशिकचा क्रमांक 131 इतका आला. गेल्या वर्षभरापासून महापालिका शहरातील वायुप्रदूषण कमी करण्यासाठी प्रयत्न करत आहे. आता दिवाळीतही मोठ्या प्रमाणामध्ये वायू आणि ध्वनी प्रदूषण होण्याची भीती असून या पार्श्वभूमीवर महापालिकेने हा निर्णय जाहीर केला आहे.

## स्वयंपाक येत नसल्याने विवाहितेचा छळ

**हिंगोली** : हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव येथील विवाहितेचा स्वयंपाक येत नसल्याच्या कारणावरून विवाहितेचा छळ करणाऱ्या छत्रपती संभाजीनगरच्या सात जणांवर सेनगाव पोलिस ठाण्यात शुक्रवारी ता. २५ गुन्हा दाखल झाला आहे. सेनगाव येथील आरती पुनपाळे यांचा विवाह छत्रपती संभाजीनगर येथील अभिजीत पुनपाळे यांच्यासोबत झाला होता. विवाहानंतर काही दिवस त्यांना चांगले वागविल्यानंतर सासरच्या मंडळींनी त्यांचा छळ सुरु केला होता.

# अंगावर पाणी उडाल्याने अन्नपदार्थ घरी पोहोचविणाऱ्याने केला चाकू

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २६ :

हात धुताना अंगावर पाणी उडाल्यामुळे संतापलेल्या अन्नपदार्थ घरी पोहोचविणाऱ्या कर्मचाऱ्याने ३० वर्षाच्या तरुणावर चाकूने हल्ला केल्याची घटना कुर्ला पश्चिम परिसरात घडली. हल्ल्यात जखमी झालेल्या तरुणाला परळ येथील केईएम रुग्णालयात दाखल करण्यात आले. याप्रकरणी साकीनाका पोलिसांनी हत्येच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल केला असून हल्ला करणाऱ्या तरुणाचा पोलीस शोध घेत आहेत.

प्रदीपकुमार गोबनाथ प्रजापती (३०) असे जखमी तरुणाचे नाव आहे. तो कुर्ला पश्चिम परिसरातील गौरव इंडस्ट्रीयल इस्टेट येथील फूड डिलेव्हरी सेंटरमध्ये काम करतो. तो मूळचा उत्तर प्रदेशातील सुलतानपूर मधील रहिवासी आहे. तो शुक्रवारी काम करीत असलेल्या फूड डिलेव्हरी सेंटरमध्ये हात धुत होता. त्यावेळी अन्नपदार्थ घरी पोहोचविणारा पुष्कर यादव जवळच उभा होता. त्याच्या अंगावर पाणी उडाले. त्यामुळे संतापलेला यादव आणि प्रजापतीमध्ये वाद झाला. वाद विकोपाला गेला आणि यादवने प्रजापतीवर चाकूने हल्ला केला. त्यात गंभीर जखमी झालेल्या प्रजापतीला जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले. मात्र जखमा गंभीर असल्याने त्याला परळ येथील केईएम रुग्णालयात नेण्यात आले. केईएम रुग्णालयात त्याला दाखल करण्यात आले आहे.

प्रजापतीवर करण्यात आलेल्या हल्ल्यात त्याच्या पोटावर व हातावर गंभीर वार झाले आहेत. प्रजापती गंभीर जखमी झाला असला तरी त्याची प्रकृती स्थिर आहे. पोलिसांनी त्याचा जबाब नोंदवला आहे. पुष्कर यादवने हल्ला केल्याचे त्याने जबाबात सांगितले. याप्रकरणाची गंभीर दखल घेऊन पोलिसांनी प्रजापतीच्या तक्रारीवरून यादवविरोधात भारतीय न्याय संहिता कलम १०९ (१) अंतर्गत हत्येच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करण्यात आल्याचे अधिकाऱ्याने सांगितले. प्रजापतीने हात धुतले आणि त्यानंतर हात झटकल्यामुळे आरोपी यादवच्या अंगावर पाणी उडाले. त्यावरून उभयतांमध्ये वाद झाला.

# शिरडशहापूरच्या शेतकऱ्याला हळद खरेदीतून १४.२३ लाख रुपयांचा गंडा

■ महासागर प्रतिनिधी,
हिंगोली, दि. २६ :

औंढा नागनाथ तालुक्यातील शिरडशहापूर येथील शेतकऱ्याची हळद खरेदी करून 14.23 लाख रुपयांची फसवणूक करणाऱ्या विदभार्तील यवतमाळच्या व्यापाऱ्या विरुध्द औंढा नागनाथ पोलिस ठाण्यात शनिवारी ता. 26 पहाटे फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, औंढा नागनाथ तालुक्यातील शिरडशहापूर येथे हळद उत्पादक शेतकऱ्यांची संख्या मोठी आहे. या ठिकाणी बाहेरगावचे व्यापारी हळद खरेदीसाठी येतात. शेतकऱ्यांची हळद खरेदी करून त्यांना तातडीने पैसे दिले जातात.

दरम्यान, यवतमाळ येथील व्यापारी शेख खुदूस शेख इब्राहिम हा व्यापारी गुरुवारी ता. 24 शिरडशहापूर येथे हळद खरेदीसाठी आला होता. त्याने शेतकरी शिवहार चटप व अन्य एका शेतकऱ्याशी संपर्क साधून हळद खरेदीसाठी आल्याचे सांगितले. त्यानुसार त्याने हळदीची पाहणी करून 13 हजार 300 रुपये क्विंटल दराने हळद खरेदी करण्याचे कबुल केले. त्यानुसार शेतकऱ्यांनी त्यास 117 क्विंटल हळद विक्री केली. त्यानंतर व्यापारी शेख खुदूस याने सर्व हळद खरेदी करून एका ट्रकमध्ये भरून वसमतच्या हळद बाजारात विक्री केली. त्या ठिकाणी मिळालेल्या 15.66 लाख रुपयांपैकी त्याने शेतकऱ्यांना 1.43 लाख रुपये दिले. उर्वरीत रक्कम लगेच देतो असे सांगून लघुशंकेला गेला अन तेथून त्याने पळ काढला.

# 'साधा शिक्षक ते अभिनेता - एक प्रवास' 'प्रविणकुमार अहिरेंचे चंदेरी दुनियेत पदार्पण'

**धु**ळे जिल्ह्यातील शिरुड हे गाव तसं कलाकारांची खाण आहे. शिरुडचे रहिवासी, सध्या कन्नड तालुक्यातील अतिदुर्गम भागातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा धामणी येथे कार्यरत,एक साधा पण धेयवेडा कलावंत शिक्षक,नाट्यकर्मी प्रविणकुमार छबीलाल अहिरे यांना 'मायाक्का फिल्म प्रॉडक्शन' व 'मुंबई क्रिएशन इंटरटेन्मेंट' प्रस्तुत,बाळासाहेब एरंडे व मारुती बनकर निर्मित, राजकारणात अढळ स्थान प्राप्त करणारे आणि सांगोला मतदार संघातील 11 वेळा आमदार व कॅबिनेट मंत्री असलेले माननीय गणपतराव देशमुख यांच्या जीवनावरती येणारा बहुचर्चित चित्रपट कर्मयोगी आबासाहेब यात एक छोटीशी पण महत्वपूर्ण भूमिका करण्याची संधी मिळाली आहे.



वर्ल्ड बुक रेकॉर्ड प्राप्त दिग्दर्शक अल्ताफ दादासाहेब शेख यांनी दिग्दर्शन केले असून अभिनेते अनिकेत विश्वासराव, प्रदिप वेलणकर, विजय पाटकर, सुरेश विश्वकर्मा, हार्दीक जोशी, पृथ्वीक प्रताप, अरबाज शेख असे दिग्गज मराठी कलाकार मुख्य भूमिकेत आहेत.गाणी कुणाल गांजावाला यांच्या आवाजात तर अवधूत गुप्ते यांचे संगीत आहे. विशेष म्हणजे प्रदर्शनापूर्वीच या चित्रपटाला दोन आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत. प्रविणकुमार अहिरेंनी यापुवीर्ही मुंम्बा फिल्म फेस्टिव्हल पुरस्कार प्राप्त 'परसु आक्का' या फेस्टिव्हल फिल्ममध्ये किन्नरची भूमिका साकारली होती. 'रंग वेगळा प्रेमाचा' 'सावकार' 'कोरोना-एक संघर्ष' 'टम-टम' 'पेईंग गेस्ट बॉईज' या चित्रपटांसह 'चौफुली' 'दारुडा नवरा बायको बेजार' 'कथा कमार्ची' 'तात्याची पोर जिवाला घोर' 'नाद खुळा' अशा वेबसिरिज मध्ये अहिरे यांनी अभिनयासह लेखन, दिग्दर्शन व निर्मितीही केली आहे.लवकरच उसतोड कामगारांच्या जीवनावर आधारित ''कोयताबंद' हा त्यांचा दिर्घ लघुचित्रपटही येणार आहे.

''कर्मयोगी आबासाहेब'' हा मल्टीस्टारर चित्रपट मराठी आणि हिंदी भाषेत 25 ऑक्टोबर पासून संपूर्ण जगभर रिलीज झाला आहे. कलासक्त व आपला शिक्षकी पेशा सांभाळत दुर्गम भागातील एका खेडेगावात नोकरीस असूनही चित्रपट क्षेत्रात भरारी घेणाऱ्या सिने अभिनेता प्रविणकुमार अहिरेंचे कलेसह शिक्षण व सामाजिक क्षेत्रातून कौतुक व अभिनंदन होत आहे.

# लोकसेवा आयोगाने सात सहाय्यक आयुक्तांची शिफारस यादी केली जाहीर

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २६ :

मुंबई महानगरपालिकेला लवकरच सात सहाय्यक आयुक्त मिळणार आहेत. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने अखेर सात सहाय्यक आयुक्तांची शिफारस यादी आपल्या संकेतस्थळावर जाहीर केली आहे. सहाय्यक आयुक्तांची सात पदे भरण्यासाठी उमेदवारांची यादी द्यावी असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतरही महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस यादी न दिल्यामुळे मुंबई महानगर पालिकेने नुकतीच आयोगाविरोधात अवमान याचिका दाखल केली होती. त्यानंतर आयोगाने सावध पवित्रा घेत सात उमेदवारांची यादी जाहीर केली. या सात उमेदवारांमध्ये एका महिलेचा समावेश आहे.

मुंबई महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्तांची नियुक्ती लोकसेवा आयोगामार्फत केली जाते. या पदावर बढतीने नियुक्ती दिली जात नाही. जून २०२१ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने मुंबई महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्त पदाच्या १६ जागांसाठी जाहिरात दिली होती. त्यानंतर उमेदवारांची चाचणी परीक्षा, लेखी परीक्षेचा निकाल, कागदपत्रांची पडताळणी, मुलाखती अशी सर्व प्रक्रिया पार पाडण्यात आली होती. मात्र कागद पडताळणीनंतर अपात्र उमेदवारांनी या भरती प्रक्रियेतील नऊ उमेदवारांविरोधात याचिका दाखल केल्या होत्या. त्यामुळे ही भरती प्रक्रिया न्यायप्रविष्ट होती. हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात पोहोचले होते. सर्वोच्च न्यायालयाने ऑगस्ट २०२४ मध्ये सात उमेदवारांची शिफारस यादी पालिकेला देण्याचे आदेश दिले होते.

मात्र आयोगाने ही शिफारस यादी न दिल्यामुळे पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी आयोगाला खरमरीत पत्र लिहून उमेदवारांची यादी देण्याची मागणी सप्टेंबर महिन्यात केली होती. त्याकडेही आयोगाने काणाडोळा केल्यामुळे अखेर पालिका प्रशासनाने कठोर निर्णय घेत नुकतीच सर्वोच्च न्यायालयात अवमान याचिका दाखल केली होती. ही याचिका दाखल करून घेत सर्वोच्च न्यायालयाने ४ नोव्हेंबर रोजी पुढील सुनावणी ठेवली होती. मात्र त्याआधीच शुक्रवारी संध्याकाळी लोकसेवा आयोगाने सात उमेदवारांची यादी संकेत स्थळावर जाहीर केली. त्यामुळे परीक्षा उत्तीर्ण होऊनही गेली तीन वर्षे वाट पाहणाऱ्या उमेदवारांनी आनंद व्यक्त केला. महानगरपालिकेतील सहाय्यक आयुक्त पदाच्या ५० टक्के जागा रिक्त आहेत. एकूण ३५ पदांपैकी केवळ १७ पदे भरलेली आहेत. तर उर्वरित १८ पदांपैकी ११ पदांवर कार्यकारी अभियंत्यांना अथवा उपप्रमुख अभियंत्यांना अतिरिक्त पदभार देण्यात आला आहे.

तर सहाय्यक आयुक्तपदी सध्या असलेले काही अधिकारी हे उपायुक्त पदासाठी पात्र झालेले आहेत. मात्र सहाय्यक आयुक्त पदासाठी उमेदवार मिळत नसल्यामुळे त्यांची बढती रखडली आहे. मुंबई महापालिकेतील सहाय्यक आयुक्तांची पदे रिक्त असल्याने पालिकेच्या सेवा प्रभावित होत आहे. त्यामुळे पालिकेने ही याचिका केली होती.

# नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने दान केल्या घरातील निरुपयोगी वस्तू

## निरुपयोगी वस्तू संकलन/दान केंद्राचे आयुक्त डॉ. चौधरींच्या हस्ते उद्घाटन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :

नागपूर महानगरपालिकेद्वारा स्वच्छ दिवाळी शुभ दिवाळी अभियानांतर्गत दिवाळीतील निरुपयोगी वस्तू संकलन केंद्र शहरातील विविध ठिकाणी उभारण्यात आले, यातील मंगळवारी झोन येथील राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय परिसरातील निरुपयोगी वस्तू संकलन केंद्राचे उद्घाटन मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या हस्ते शनिवारी (ताः २६) करण्यात आले.

तसेच मनपाच्या अतिरिक्त आयुक्त आंचल गोयल यांनी धंतोली उद्यान परिसरात उभारण्यात आलेल्या केंद्राला भेट देत नागरिकांशी संवाद साधला. उद्घाटन प्रसंगी मनपाचे उपायुक्त विजय देशमुख, उपायुक्त डॉ. गजेंद्र महल्ले यांच्यासह मनपाचे अधिकारी व कर्मचारी केंद्रावर उपस्थित होते.

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या निर्देशांनुसार, अतिरिक्त आयुक्त आंचल गोयल व अजय चारठाणकर यांच्या मार्गदर्शनात दिवाळीतील निरुपयोगी वस्तू संकलन मोहीम सुरु करण्यात आली असून, आयुक्तांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत नागरिकांनी स्वयंस्फूतीर्ने मनपाच्या केंद्रांवर घरातील निरुपयोगी वस्तू दान केल्या.



शनिवार सकाळपासून नागरिकांनी केंद्रंकडे धाव घेत घरातील घरातील पुनर्वापरण्यात येणाऱ्या किंवा निरुपयोगी वस्तु/साहित्य जसे कपडे, लाकडी वा प्लास्टिकच्या वस्तू, घरातील भांडी, खुर्च्या, खेळणी, कपाट, चपला /जोडे, पुस्तकांची रद्दी, इलेक्ट्रॉनिक वस्तू या संकलन केंद्रामध्ये जमा केल्या. मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी आणि अतिरिक्त आयुक्त श्रीमती आंचल गोयल यांनी स्वतः विविध केंद्रांवर भेट देत नागरिकांचा उत्साह वाढविला. मनपाच्या सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी देखील घरातील निरुपयोगी वस्तू दान करीत अभियानात उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला.

दिवाळीनिमित्त स्वच्छते दरम्यान घरातून निघणाऱ्या वस्तूंचे संकलन करून त्याचा पुनर्वापर करण्याचा महत्त्वाचा निर्णय नागपूर महानगरपालिकेने स्वच्छ दिवाळी, शुभ दिवाळी अभियानंतर्गत घेतला आहे.

घरातून निघणाऱ्या वापरात नसणाऱ्या वस्तूंचा स्वीकार करण्यासाठी मनपाने दहाही झोन निहाय निरुपयोगी वस्तू संकलन/स्वीकार केंद्रे उभारण्यात आले असून, पहिल्या दिवशी नागरिकांनी मोहिमेला उदंड प्रतिसाद दर्शविला, ही केंद्रे सोमवार 28 ऑक्टोबर सकाळी ८ ते दुपारी ४ पर्यंत नागरिकांच्या सेवेत राहणार आहेत. तरी नागरिकांनी आपल्या घरातील पुनर्वापरण्यात येणाऱ्या किंवा निरुपयोगी वस्तु/साहित्य/ इलेक्ट्रॉनिक वस्तू संकलन केंद्रामध्ये जमा करून गरज वंताना लाभ देण्यास सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त डॉ. चौधरी यांनी केले आहे.

संपूर्ण शहरात मनपाद्वारे प्रभाग स्तरावर उभारण्यात आलेल्या निरुपयोगी वस्तू दान/संकलन केंद्र उभारण्यात आले आहे. या केंद्रांवर नागरिकांनी आपल्या घरातील निरुपयोगी वस्तू स्वतंत्र वर्गीकरण करून केंद्रावर जमा केल्या. वर्गीकृत स्वरूपात जमा करून अभियानात उत्स्फूर्तपणे सहभाग दर्शविणाऱ्या नागरिकांना नागपूर महानगरपालिकेद्वारे थँक यू चे स्टिकर्स देण्यात आले. आपल्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त होत असल्याचे बघून नागरिक भारावून केले.

# प्रिया फुकेंविरुद्ध अंबाझरी पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :

भारतीय जनता पक्षाचे आमदार परिणय फुके यांच्यासह त्यांच्या कुटुंबीयाविरुद्ध अंबाझरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर त्यांच्यावर कारवाई करण्याऐवजी तक्रारदार प्रिया फुके यांनाच पोलीस त्रास देण्याचा प्रयत्न करीत आहे. गुरुवारी नितीन फुके यांनी दिलेल्या तक्रारीवरून अंबाझरी पोलिसांनी प्रिया फुके यांना नोटीस बजावली आहे. या प्रकरणात अंबाझरी पोलिसांच्या भूमिकेवर संशय व्यक्त केला जात आहे.

फियार्दी प्रिया फुके यांच्या तक्रारीवरून अंबाझरी पोलिसांनी. आ. परिणय फुके यांच्यासह त्यांचे वडील रमेश गोविंदराव फुके (७२), आई रमा फुके (६७), पत्नी डॉ. परिणीता फुके (४१) आणि नितीन फुके (४०) यांच्यावर गुन्हा दखल केला आहे. पती संकेत फुके यांच्या निधनानंतर त्यांच्या कुटुंबीयांकडून धमक्या देण्यात येत होत्या. फुके कुटुंबीयांनी एटीएम, बँकेचे पासबुक, पासवर्ड रेकॉर्ड, दागिने जबरदस्तीने काढून घेतले. संकेतचे अताशा आशीर्वाद बिल्डर्समध्ये ४० टक्के शेअर्स होते. ते परस्पर सासू-सासऱ्यांच्या नावाने करून घेतले. याबाबत नितीन फुके यांना विचारणा केली असता त्यांनी शिवीगाळ केली, असे प्रिया फुके यांनी अंबाझरी पोलिसांकडे दिलेल्या तक्रारीत नमूद आहे.

पोलिसांनी या प्रकरणात गुन्हा दाखल केला. पण, आरोपींवर कारवाई केली नाही. दुसरीकडे नितीन फुके यांनी केलेल्या तक्रारीवरून आता प्रियलाच पोलिसांनी नोटीस बजावली आहे. यासंदर्भात नितीन फुके यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांच्या नातेवाईकांनी दूरध्वनी घेतला व या प्रकरणात काहीच बोलायचे नसल्याचे सांगितले. नितीन फुके सध्या उपलब्ध नसल्याचे सांगून त्यांनी फोन ठेवला.

प्रिया फुके यांनी मनीष अशोक राऊत यांच्या मदतीने घर खाली करण्याची तसेच घरात तोडफोड करण्याची धमकी दिल्याचे तक्रार अर्जात नितीन फुके यांनी नमूद केले आहे. याप्रकरणी अंबाझरी पोलिसांनी कोणताही वेळ न गमावता प्रिया फुके यांना लगेच नोटीस पाठवली आहे. माझ्या तक्रारीवरून नितीन फुके यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. त्यामुळे ते संतापले. अंबाझरी, हिलटॉप येथील परिणय अपार्टमेंटमधील फ्लॅट क्रमांक १०२ हा माझ्या नावे असून तो खाली करून मागितल्यामुळे ही खोटी तक्रार करण्यात आली. आमदार परिणय फुके आणि कुटुंबीयांविरुद्ध दाखल गुन्ह्यात कारवाई करण्याऐवजी पोलीस मलाच त्रास देत आहेत.

# स्वच्छतेत लोकसहभाग वाढवण्यासाठी तुमसर रोड स्थानकावर स्वच्छता चौपालचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :

भारतीय रेल्वेच्या स्वच्छता अभियानाच्या यशस्वीतेसाठी देशातील सर्व स्थानकांवर स्वच्छता चौपाल उभारण्यात येत आहेत. या मालिकेत दिनांक 25-10-2024 रोजी तुमसर रोड स्टेशन येथील स्वच्छता चौपालचे नेहल डी. नारायणे, सहाय्यक अभियंता-तुमसर रोड, ज्ञानेश्वर बिरनवरे-सदस्य स्टेशन सल्लागार समिती, तुमसर रोड, श्री. राहुल कुमार पांडे- स्थानक व्यवस्थापक श्री सुजित यांनी कुमार-कमर्शियल इन्स्पेक्टरसह प्रादेशिक सार्वजनिक आणि रेल्वे कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत आयोजित केलेल्या या विशेष मोहिमेअंतर्गत विविध समस्या आणि सूचना उपस्थित रेल्वे अधिकाऱ्यांशी थेट माहिती आणि सेवांची उपलब्धता वाढवण्यासाठी शेअर करण्यात आली. डिजिटल प्लॅटफॉर्म.



या प्रकारच्या कार्यक्रमामुळे प्रवाशांना सुरक्षितता आणि स्वच्छतेशी संबंधित महत्त्वाच्या मुद्द्यांवर जागरुकता येईल आणि या सामुदायिक संवादाच्या माध्यमातून प्रवासी त्यांच्या समस्या आणि सूचना थेट रेल्वे अधिकाऱ्यांशी शेअर करू शकतील आणि यामुळे स्थानिक व्यापारी आणि इतरांनाही मदत होईल. स्टेकहोल्डर्समध्ये संवाद वाढवून केवळ नेटवर्किंगच्या संधी निर्माण केल्या जातील असे नाही तर विकास उपक्रमांनाही चालना दिली जाईल, ज्यामुळे प्रवासी आणि स्थानिक लोक पर्यावरण संरक्षण आणि स्वच्छतेबद्दल जागरूक होतील.

या चौपालमध्ये लोकप्रतिनिधी, ग्रामपंचायत व नागरी संस्थांचे प्रतिनिधी तसेच संबंधित क्षेत्रातील जाणकारांना निमंत्रित करून स्थानकाची स्वच्छता सुधारण्यासाठी सूचना करण्यात आल्या. यावेळी सहाय्यक अभियंता-तुमसर रोड नेहल डी स्वच्छता चौपालच्या माध्यमातून सर्वसमावेशकतेला प्राधान्य देत, कामाच्या ठिकाणांची स्वच्छता आणि 'वेस्ट टू वेल्थ' या संकल्पनेवर भर देण्यात आला. त्यांनी रेल्वे प्रवाशांशी थेट संवाद साधला आणि स्वच्छतेच्या प्रश्नांवर त्यांच्या प्रतिक्रिया आणि महत्त्वाच्या सूचना जाणून घेतल्या. तसेच, या सूचना सकारात्मकतेने घेत त्यांनी प्रवाशांचे विचार लक्षात घेऊन रेल्वे सेवा वाढवल्या/सुधारल्या जातील, असे आश्वासन दिले. स्वच्छतेच्या क्षेत्रात रेल्वेकडून होत असलेल्या प्रयत्नांचे प्रवाशांनी कौतुक केले आणि स्थानकावर पुनर्बांधणीचे काम सुरू असतानाही स्थानक परिसर स्वच्छतेबद्दल समाधान व्यक्त केले.

## शस्त्रासह दोन गुंडाना अटक

**नागपूर :** एमआयडीसी पोलिसांनी गस्तीदरम्यान दोन गुन्हेगारांना शस्त्र घेऊन परिसरात फिरताना अटक केली. रंजित सोहनसिंग शाहू (42) आणि दिलीप आसाराम बघेले (35) दोन्ही रा. राजीवनगर, अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. शुक्रवारी सायंकाळी पोलिसांचे पथक ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान राजीवनगरच्या मदर मॅरी शाळेजवळ एक गुंड शस्त्राचा धाक दाखवून लोकांना धमकावत असल्याची माहिती मिळाली. या माहितीवरून पोलिस तेथे पोहोचले असता रंजित हातात मोठा चाकू घेऊन लोकांना धमकावताना दिसला. त्याला ताब्यात घेऊन चाकू जप्त करण्यात आला.

# संपूर्ण राज्यात १५ हून अधिक उमेदवार उभे करणार : स्वामी संजय कटकमवार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :

आगामी महाराष्ट्र निवडणुकीत इंडियन नॅशनल फॉरवर्ड ब्लॉक राज्यभरातून १५ उमेदवार उभे करणार आहे. अशी माहिती ब्लॉकचे राष्ट्रीय अध्यक्ष स्वामी संजय कटकमवार यांनी नागपुरात पत्रपरिषदेत दिली. त्यांनी सांगितले की नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी 18 जून 1940 रोजी नागपुरात फॉरवर्ड ब्लॉकचा राजकीय जाहीरनामा जारी केला होता. कालांतराने त्यांची मूळ विचारसरणी सोडून फॉरवर्ड ब्लॉक डाव्या आघाडीत सामील झाला.




ही पोकळी भरून काढण्यासाठी आणि नेताजींच्या संकल्पाचा भारत बनवण्यासाठी 21 जानेवारी 2024 रोजी भारतीय राष्ट्रीय फॉरवर्ड ब्लॉकची स्थापना करण्यात आली. ज्यांची नोंदणी 16 एप्रिल 2024 रोजी भारतीय निवडणूक आयोगाकडे करण्यात आली आहे.

स्वामी कटकमवार म्हणाले की, नेताजींचे विचार, मूल्ये आणि तत्त्वे लक्षात घेऊन विदभार्तील जनतेने आपले उमेदवार लोकसभा आणि विधानसभेत पाठवले होते. पण कालांतराने त्यांची मूल्ये आणि तत्त्वे विसरली गेली. त्यांच्या तत्वानुसार इंडियन नॅशनल फॉरवर्ड ब्लॉक राज्यभरातून 15 उमेदवार उभे करणार आहे, ही संख्या देखील वाढू शकते ज्यामध्ये महिलांना देखील प्रतिनिधित्व दिले जाईल. अशी माहिती त्यांनी परिषदेत दिली. ब्लॉक प्रदेशाध्यक्ष नागेंद्र देवके यांनीही पत्रपरिषदेला संबोधित केले. पत्रपरिषदेत नरेंद्र चुघ, उमाकांत अग्निहोत्री, अजयकुमार यादव, अनिशा वासनिक, प्रमिला मेश्राम, योगिता वनवे, फिरोज खान, विजय सराफ आणि संतोष मिश्रा आदीं उपस्थित होते.

## परीक्षा केंद्रावर बोगस उमेदवार सापडला

**नागपूर :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या हिवाळी परीक्षेत एक विद्यार्थी त्याच्या वर्गमित्रासाठी परीक्षा देण्यासाठी आला. कागदपत्रांच्या पडताळणीत त्याचा भंडाफोड झाला आणि पोलिसात तक्रार करण्यात आली. नंदनवन पोलिसांनी गुन्हा नोंदवून दोन्ही विद्यार्थ्यांना अटक केली आणि नंतर जामीनावर त्यांची सुटका झाली. विराट विजय सोनवने (21) रा. तुमखेडा, गोंदिया आणि आयूष उत्तम वरघने (19) रा. मुरमाडी, भंडाराशी आरोपी विद्यार्थ्यांची नावे आहेत. विराट आणि आयूष हे दोघेही वैनगंगा कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे विद्यार्थी आहेत. आयूष द्वितीय सेमिस्टरमध्ये बेसिक इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगच्या विषयात नापास झाला होता. त्याने वर्गमित्र असलेल्या विराटला त्याच्या जागी परीक्षा देण्यासाठी म्हटले.

मैत्रीखातर विराटही परीक्षा देण्यासाठी तयार झाला. हिवाळी परीक्षेसाठीचे केंद्र उमरेड मार्गावरील प्रियदर्शनी भगवती इंजीनिअरिंग कॉलेज मिळाले. शुक्रवारी सकाळी विराट हॉल तिकीट घेऊन प्रियदर्शनी कॉलेजमध्ये पोहोचला. निरीक्षकांनी सर्व उमेदवारांचे प्रवेशपत्र आणि आधार कार्ड तपासले. विराटचे आधारकार्ड तपासले असता ते बोगस असल्याचे समजले. त्यांनी केंद्र प्रमुख उमा गायकवाड यांना माहिती दिली. गायकवाडसह इतर शिक्षकांनी विराटची चौकशी सुरू केली. तो घाबरला आणि मित्राच्या जागेवर परीक्षा देण्यासाठी आल्याचे कबूल केले.

# नाल्याचे पाणी, चितेची राख त्यातून फुललेली बाग



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :

मानवी जीवनाचा अंत होतो ती जागा म्हणजे स्मशानभूमी आणि तिथूनच सुरू होते त्याची स्वर्गाची वाटचाल ! स्वर्गाकडे नेणारे द्वार म्हणजे स्मशानभूमी, अशी संकल्पना मनात ठेवून, उपराजधानीतील दोन पर्यावरण तज्ज्ञांनी एक स्वप्नपाहिलं. आज तब्बल वर्षभराच्या परिश्रमांनंतर, ते साकारलं आहे. ही अंबाझरी स्मशानभूमी आहे, हे सांगूनही कोणाचा विश्वास बसणार नाही, इतकी देखणी बाग इथे बहरली आहे. विशेष म्हणजे या बागेच्या निर्मितीसाठी वाया गेलेल्या वस्तूंचा कल्पक वापर करण्यात आला आहे. अंबाझरी स्मशानभूमीची काया बदलण्यासाठी विजय लिमये आणि योगेश अनेजा हे दोघे पर्यावरणप्रेमी गेल्या वर्षभरापासून कार्यरत आहेत.

जवळच्या पैशांनी, त्यांनी स्मशानभूमीच्या परिसरात दहा प्रकारचे जास्वंद, मॉर्निंग ग्लोरीचे वेल, गुलाब, चमेली, काटेकोरांटी, पारिजात, दूध मोगरा, चाफा, ल्यंटेना आणि सोनचाफा या फुलझाडांसह अनेक शोभेची झाडंही रुजवली आणि फुलवली. स्मशानभूमीच्या परिसरात 20 पेक्षा जास्त प्रकारची फुलझाडं असून, फुलपाखरांना आकर्षित करणारी ही झाडं आहेत. कधी काळी ओसाड दिसणाऱ्या या स्मशानभूमीत आता 300 पेक्षा जास्त आणि 7-8 रंग संगती असलेली फुलपाखरं बागडतात आणि नवजीवनाची जाण करून देतात. या दहनघाटातून श्रद्धांजली सभास्थानाकडे जाणाऱ्या रस्त्यावर मॉर्निंग ग्लोरी वेलीचा मांडव तयार केला आहे. दीड वर्षांपूर्वीपासून तिरडीच्या बांबूंचा उपयोग करून, कठडे आणि मांडव उभारण्यात आला आहे. आता इको फ्रेंडली लिव्हिंग फाऊंडेशनच्या माध्यमातून हा उपक्रम राबविण्यात येतो आहे.

या झाडांना पाणी देण्यासाठी नाग नदीत सबमर्सिबल पंप टाकण्यात आला आहे. नदीच्या दूषित पाण्यातून बाग फुलवली असून दहनघाटांवरची अतिरिक्त राखच खत म्हणून वापरतात.आता या उद्यानाचा व्याप वाढल्यामुळे, झाडांची निगा राखण्यासाठी फाऊंडेशनच्या वतीने एका कामगाराला नियुक्त करण्यात आले आहे.

# ज्येष्ठ नागरिकांनी राष्ट्रासाठी एक तास द्यावा : अजय चारठाणकर



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :

विधानसभा निवडणुकीसाठी मतदारांच्या मनात आपल्या राष्ट्रीय कर्तव्याप्रती जागृती निर्माण व्हावी याकरिता ज्येष्ठ नागरिकांनी राष्ट्रासाठी एक तास देत, मतदारांचे प्रबोधन व मार्गदर्शन करण्याच्या राष्ट्रीय कार्यात योगदान द्यावे असे आवाहन नागपूर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त तथा स्वीपचे नोडल अधिकारी श्री. अजय चारठाणकर यांनी केले.

सिस्टिमेटिक व्होटर्स एज्यूकेशन अँड इलेक्ट्रॉल पार्टीसिपेशन अर्थात ह्यस्वीपह्व कार्यक्रमांतर्गत नागपूर महानगरपालिकाद्वारे शहरातील विविध ज्येष्ठ नागरिक संस्था संघटनाच्या प्रतिनिधींची व शहरातील हॉकर्स असोसिएशनच्या प्रतिनिधींची शुक्रवारी (ताः २५) मनपाचे अतिरिक्त आयुक्त तथा स्वीपचे नोडल अधिकारी श्री. अजय चारठाणकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. मनपा मुख्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती स्थायी समिती सभागृहात आयोजित बैठकीत मनपाच्या उपायुक्त डॉ. रंजना लाडे, स.वि.प्र. चे सहायक अधीक्षक राजकुमार मेश्राम यांच्यासह ज्येष्ठ नागरिक संघटनाचे प्रतिनिधी व हॉकर्स असोसिएशनचे प्रतिनिधी प्रामुख्याने उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करीत मनपाचे अतिरिक्त आयुक्त तथा स्वीपचे नोडल अधिकारी श्री. अजय चारठाणकर यांनी सांगितले की, लोकशाहीचा उत्सव असणाऱ्या निवडणूकांमध्ये ज्येष्ठ नागरिकांची महत्त्वाची भूमिका आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत नागपूर शहरातील मतदानाचा टक्का वाढावा व जास्तीत जास्त नागरिकांनी मतदानासाठी बाहेर पडावे या करिता मतदारांचे प्रबोधन करण्यासाठी ज्येष्ठ नागरिकांनी पुढकार घ्यावा, मनपाद्वारे स्वीप अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमात सक्रीय सहभाग नोंदवावा. बीएलओ यांच्यावर अवलंबून न राहता, ऐन मतदानाच्या दिवशी धावपळ टाळण्यासाठी आणि आपले मतदान केंद्र तपासण्यासाठी आणि याबाबत इतरांना देखील मार्गदर्शन करावे, घरातील ज्येष्ठांनी प्रबोधनात्मक आवाहन केल्याचा मुलांवर नक्कीच सकारत्मक परिमाण होईल, असा विश्वास श्री. चारठाणकर यांनी व्यक्त केला.

तसेच ज्येष्ठ नागरिकांनी त्यांच्या स्तरावर प्रभात फेरी, उद्यानांमध्ये युवकांचे मार्गदर्शन, विरंगुळा केंद्रावर मार्गदर्शन, भजन मंडळांनामार्फत मतदान जागृती करावी याकरिता मनपाचे संपूर्ण सहकार्य मिळेल असे आवाहन श्री, चारठाणकर यांनी केले. हॉकर्स असोसिएशने देखील आपल्याकडील आस्थापनांवर मतदान जनजागृती फलक लावावे असे आवाहन ही श्री. चारठाणकर यांनी केले.

स्वीप कार्यक्रमांतर्गत नागपूर महानगरपालिकेद्वारा शहरातील विविध ठिकाणी मतदान जनजागृती फलक लावण्यात येत आहेत. यातील सेल्फी पॉईंट वर ज्येष्ठ नागरिकांनी आपला सेल्फी घेत तो स्टेट्स वर ठेवावा व इतरांना देखील प्रोत्साहित करावे असे आवाहन चारठाणकर यांनी केले आहे.

## रेल्वेची सोन्याच्या तस्करीवर यशस्वी कारवाई

**नागपूर :** रेल्वे सुरक्षा दल नागपूरच्या केंद्रीय गुप्तचर विभाग आणि महसूल गुप्तचर संचालनालय नागपूर यांच्या संयुक्त कारवाईत एका तस्कराला 787.86 ग्रॅम सोन्याच्या बिस्किटांसह अटक करण्यात आली असून, जप्त केलेल्या सोन्याची किंमत अंदाजे 61,45,308 रुपये आहे. ही कारवाई वरिष्ठ गुप्तचर अधिकारी नरसिंह यांच्या सूचना मिळाल्यानंतर, ट्रेन क्रमांक 12296 संघमित्रा एक्सप्रेस मध्ये करण्यात आली.

संघमित्रा एक्सप्रेस मध्ये सोन्याची तस्करी होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर, केंद्रीय गुप्तचर विभाग नागपूरचे निरीक्षक यांच्या सोबत सहाय्यक उपनिरीक्षक राजकुमार भारती आणि मुकेश राठोड, अजय सिंह, जसवीर सिंह, हरविंदर सिंह, आणि श्याम झाडोकर यांच्या टीमला तयार करण्यात आले. उम्र्क्र नागपूरचे उपसंचालक गौरव मेश्राम आणि वरिष्ठ अधिकारी वी.एल. नरसिंह यांच्यासह तीन संयुक्त पथकांची स्थापना करण्यात आली.

संघमित्रा एक्सप्रेस प्लेटफॉर्म क्रमांक 2 वर आल्यावर, पथकाने ट्रेनमध्ये शोध मोहीम राबवली. कोच क्रमांक अ-1 मधील सीट क्रमांक 35 वर एक प्रवासी त्यांच्याकडे असलेल्या फोटोशी जुळत असल्याचे आढळले असून, तो चित्तूर, आंध्र प्रदेश मधील आहे. चौकशीत, त्याच्या बॅगेत लपवलेले 787.86 ग्रॅम सोन्याचे बिस्किट जप्त करण्यात आले.

# पेपर विकणाऱ्या माणसाने केले महाराष्ट्राचे सारथ्य

कोणत्याही व्यक्तीचे महत्त्व त्याच्या कर्तृत्वाने जोखण्याची गरज असते. पण दुर्दैवाने तसे घडत नाही. महाराष्ट्राच्या राजकारणाचा सध्याचा चिखल पाहता आजमितीस कर्तृत्व पैशाने विकत घेतले जाते आणि पैशांसाठीच ते विकले जाते अशी स्थिती आहे. माणूस नावाचा प्राणी पैशांपुढे किती हतबल व लाचार होतो हे सध्या पावलोपावली दिसते. त्यामुळे महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदावर एक पेपर वाटणारा सर्वसामान्य माणूस बसून गेला, असे कुणी सांगितले तर कुणाचाही त्यावर विश्वास बसणार नाही.

----------------

आपल्या महाराष्ट्राच्या दैदिप्यमान राजकीय इतिहासात खरेच एक माणूस असा होऊन गेला जो केवळ आपल्या तत्त्वांसाठी जगला. त्याला त्याच्या पत्नीचीही तेवढीच खमकी साथ लाभली. या बाईने आपल्या नवऱ्याचे तत्व असे जगले की, त्याच्या मृत्यूनंतर अवघ्या महिन्याभरातच ती बसस्टँडवर ताटकळत उभी असल्याचे दिसून आली. तिने आपल्या उदरनिर्वाहासाठी नागपूरमध्ये चहाचा ठेला लावल्याचा किस्साही सांगण्यात येतो.

मारोतराव कन्नमवार यांचा जन्म 10 जानेवारी 1900 रोजी चंद्रपूरच्या भानापेठ या साध्या वस्तीतील एका गरीब कुटुंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सांबशीवपंत, तर आईचे नाव गंगूबाई होते. मारोतरावांचे शिक्षण मॅट्रिकपर्यंतही झाले नाही. पण आहे त्याच शिक्षणाच्या जोरावर तथा कोणत्याही धनवंत व संख्यासंपन्न जातीचे पाठबळ नसताना त्यांनी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदापर्यंत मजल मारली. त्यामुळे त्यांची राजकीय वाटचाल अक्षरशः थक्क करणारी मानली जाते.

मारोतराव भटक्या विमुक्तामधील 'बेलदार' या छोट्याशा जमातीमध्ये जन्मले, पण स्वतःच्या संयमी कर्तृत्वाने ते महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदापर्यंत पोहचले. ते दादासाहेब म्हणूनही ओळखले जात. 20 नोव्हेंबर 1962 ते 24 नोव्हेंबर 1963 पर्यंत ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. त्यांनी 1957 मध्ये मुंबई राज्यातील सावली विधानसभा मतदारसंघाचे आणि 1960 ते 1963 पर्यंत महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व केले. 1962 च्या निवडणुकीत ते पुन्हा सावली येथून महाराष्ट्र विधानसभेवर निवडून गेले. त्यानंतर 24 नोव्हेंबर 1963 रोजी मुख्यमंत्रीपदावर असतानाच त्यांचे निधन झाले.

### पेपर विकून उदरनिर्वाह

मारोतराव कन्नमवर यांचे जीवन फार कष्टात गेले. त्यांनी पेपर विकून आपला उदरनिर्वाह चालवला. काँग्रेस कमेटीच्या बाहेर ठेवलेल्या बाकड्यावर दिवस काढले. त्यांच्या पत्नी गोपिकाबाई यांनी वरोराच्या रस्त्याशेजारी खाणावळ चालवून आपल्या कुटुंबाची गुजराण चालवली. पण हे कुटुंब स्वतःच्या हिंमतीवर पुढे आले.

दादासाहेबांना राज्याचे मुख्यमंत्रीपद अपघाताने वा नशिबाने मिळाले नाही. त्यांना सीएमपद देणे ही महाराष्ट्राच्या मराठी राजकारणाची तेव्हाची गरज होती ही बाब या प्रकरणी लक्षात घेण्याची गरज आहे.



पूर्वार्ध

### विदर्भाचा राजकीय अनुशेष भरून काढण्याचा पहिला प्रयत्न

1962 च्या भारत - चीन युद्धानंतर यशवंतराव चव्हाण दिल्लीला गेले आणि महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची धुरा मारोतराव कन्नमवार यांच्या खांद्यावर येवून पडली. मध्य भारताचा हिस्सा असणारा विदर्भ प्रांत 1956 साली महाराष्ट्रात आला. तेव्हा वैदर्भीय जनतेच्या मोठ्या आशा-आकांक्षा होत्या.

मध्य भारत व बिदर प्रांताची नागपूर ही राजधानी होती. त्यातच फाझल अली आयोगाने त्यावेळी विदर्भ हे स्वतंत्र राज्य असावे, असा सूर आळवला होता. त्यामुळे विदर्भवासियांच्या मनात आपण फसवले तर गेलो नाही ना, अशी भावना निर्माण होईल अशी भीती काँग्रेस नेत्यांना वाटू लागली.

यशवंतरावांचेही मत असेच होते. त्यामुळेच पश्चिम महाराष्ट्र, कोकण व मराठवाड्यातील दिग्गज नेत्यांना बाजूला सारून यशवंतरावांच्या संमतीने विदर्भातील मारोतराव कन्नमवार यांची महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी निवड झाली. हा विदर्भाच्या विकासाच्या अनुशेषाची मोजदाद करण्यापूर्वीच विदर्भाचा राजकीय अनुशेष भरून काढण्याचा पहिला प्रयत्न होता असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

सामान्यतः हाती सत्ता आली की लोक आपल्या कर्तव्याकडे दुर्लक्ष करतात. पण मारोतराव कन्नमवार त्याला अपवाद होते. त्यांनी आपल्या योजनाबद्ध कार्यशैलीच्या जोरावर महाराष्ट्राचा विकास साधण्याचा प्रयत्न केला. त्यांच्याच अल्प कारकिर्दीत ओझर येथे मिग विमानांचा तथा वरणगाव - भंडारा व भद्रावती येथे संरक्षण साहित्य उत्पादनांचे कारखाने सुरू झाले.

मारोतराव कन्नमवार हे तत्कालीन विदर्भातील सर्वश्रेष्ठ नेते होते. त्यामुळे फाझल अली आयोगाच्या शिफारशीनुसार विदर्भ हे वेगळे राज्य झाले असते, तर कन्नमवार त्याचे पहिले मुख्यमंत्री झाले असते. पण कन्नमवारांनी विदर्भाच्या संभाव्य मुख्यमंत्रीपदावर पाणी सोडून एका निष्ठावान कार्यकर्त्यासारखे महाराष्ट्रात राहणे पसंत केले. विशेष म्हणजे त्यावेळी कन्नमवारांचे मन वळवण्यासाठी दस्तुरखुद्द पंडित जवाहरलाल नेहरू यांनाही पुढाकार घेतल्याचे सांगितले जाते. त्यामुळे यशवंतराव दिल्लीत गेल्यानंतर साहजिकच त्यांच्या जागी दादासाहेबांची नियुक्ती झाली.

### साखरपट्ट्यातील नेत्यांचे कडू राजकारण

मारोतराव कन्नमवार एक उत्तम प्रशासक होते. पूर्वीच्या मध्य भारतातील प्रशासनाचा अनुभव त्यांच्या गाठीशी होता. खास म्हणजे त्यांना यशवंतरावांचा पूर्ण पाठिंबा होता. त्यामुळेच त्यांच्या निवडीला फार कुणी विरोध केला नाही. कन्नमवारांचे व्यक्तिमत्व काहीसे नेमस्त होते. त्यामुळे त्यांना शत्रू कमी होते. त्यांनी मोठ्या उमेदीने कारभार सुरू केला.

नवे पाटबंधारे प्रकल्प राबवताना त्यांनी मागास व कोरडवाहू भागांना झुकते माप मिळेल याची काळजी घेतली. इथेच त्यांचे व पश्चिम महाराष्ट्रातील साखटपट्ट्यात राजकारण करणाऱ्या काँग्रेस नेत्यांशी खटके उडू लागले.

पश्चिम महाराष्ट्रात पुणे, अहमदनगर, सातारा, कोल्हापूर आदी भागात सहकारी साखर कारखान्यांचे जाळे पसरत होते. त्यामुळे साखर लॉबीचा प्रभाव राज्याच्या मंत्रिमंडळावर स्पष्टपणे दिसून येत होता. साखरेच्या कडू राजकारणात मुरलेले अनेक नेते मारोतरावांच्या मंत्रिमंडळात होते. त्यात एका बाजूला ही मंडळी आणि दुसऱ्या बाजूला शेषराव वानखेडे, नासिकराव तिरपुडे, नरेंद्र तिडके यांच्यासारखे विदर्भातील, तर शंकरराव चव्हाणांसारखे मराठवाड्यातील नेते अशी उभी फूट मारोतरावांच्या मंत्रिमंडळात पडली होती. पण त्याचा मारोतरावांच्या नेतृत्वावर कोणताही परिणाम पडला नाही.

### संरक्षण निधीसाठी क्रिकेट खेळणारा एकमेव मुख्यमंत्री

दादासाहेबांना क्रिकेट फार आवडायचे. बालपणी आईसोबत जंगलात जावून ते लाकडे तोडून आणत. त्यानंतर त्याच्या बॅट तयार करत. वयाच्या 64 व्या वर्षी त्यांना पुन्हा एकदा देशाच्या संरक्षणासाठी हातात बॅट घ्यावी लागली.

17 मार्च 1963 रोजी मुंबईत बॉम्बे जिमखाना मैदानावर मंत्री व महापौर संघांत क्रिकेटचा सामना झाला. त्यातून जवळपास 25 लाखांचा निधी जमा झाला. या सामन्यात मंत्री संघाचे नेतृत्व दादासाहेबांनी केले, तर एम एन शाह यांनी महापौर संघाचे नेतृत्व केले होते. देशासाठी संरक्षण निधीची जमवाजमव करणारे दादासाहेब हे संभवतः देशाचे एकमेव मुख्यमंत्री होते.

### शिक्षकाच्या जावयाला दिली समज

मुख्यमंत्रीपदी आरुढ झाल्यानंतर दादासाहेब चंद्रपुरात आले. तेव्हा त्यांचे स्वागत तेथील विश्रामभवनापुढे झाले. हजारो लोक त्यांच्या स्वागतासाठी आले होते. पोलिसांची मानवंदना स्वीकारण्यापूर्वी ते नेहमीप्रमाणे गर्दीत शिरले. त्यातल्या अनेकांशी ते नाव घेऊन बराचकाळ बोलत होते.

तेव्हा एका शिक्षकाने त्यांच्याकडे आपल्या जावयाची तक्रार केली. आपला जावई मुलगी नांदण्यास घेऊन जात नसल्यासंबंधी ही तक्रार होती. त्यानंतर कन्नमवार एका कार्यक्रमाच्या निमित्ताने त्या जावयाच्या गावी गेले. त्यांनी अधिकाऱ्यांकरवी त्या जावयाला बोलावणे धाडले. त्यानुसार तो त्यांना भेटण्यासाठी आला असता बायकोला नेले नाहीस तर गाठ माझ्याशी आहे, अशी समज त्याला दिली. या प्रसंगानंतर तक्रारदार शिक्षकाच्या मुलीचा संसार मार्गी लागला.

दादासाहेब भाषण करण्यात तरबेज होते. त्यांच्या भाषणात ग्रामीण म्हणी अन किस्से मुबलक प्रमाणात असत. सुरुवातीच्या काळात त्यांना आपल्या भाषणातील उत्साह आवरता येत नसेत. बोलताना अवसान चढले की ते श्रोत्यांच्या दिशेने पुढे - पुढे जात. मग कुणीतरी धरून त्यांना मागे आणत. यामुळे भाषण देताना पुढे सरकणाऱ्या कन्नमवारांना एका जागीच खिळवून ठेवण्यासाठी त्यांच्या शर्टला मागच्या बाजूने दोरी बांधण्यात येत होती. यामुळे बोलताना कन्नमवार पुढे गेले की मागून कुणीतरी त्यांची दोरी ओढायचा. यामुळे ते पुन्हा परत आपल्या जागी यायचे. पण कोणताही दोर कन्नमवारांना थांबवू किंवा अडवू शकला नाही. ते कायम सामान्यांमध्येच रमले.

(उर्वरीत भाग पुढील आठवड्यात)

●●●●●●

# दिवाळीचे बदलते स्वरूप!

जसा काळ सरत गेला तसा मानवाच्या राहणीमानातही बदल होत गेला. वाहतुकीची विविध साधने आल्याने जुनी बैलगाडी, टमटम यांसारखी वाहतुकीची साधने कालबाह्य झाली. बाजारात जाऊन आवश्यक वस्तूंची खरेदीही आता हळूहळू कमी होत चालली आहे.

गरजेच्या सर्व वस्तू आता ऑनलाईन ऑर्डर करून घरपोच मागवल्या जाऊ लागल्या आहेत. गेल्या काही वर्षांत माणसाच्या पोषाखांतही कमालीचा बदल झालेला दिसून येतो. प्रत्येकाच्या हातात मोबाईल आल्यामुळे तर मानवाचा समाजाशीही हळूहळू संबंध तुटू लागला आहे. शहरासारख्या ठिकाणी धावपळीच्या जीवनाचा प्रभाव आता सण-उत्सव साजरे करण्यावरही होत चालला आहे.

पूर्वी दसरा सरला की दिवाळीच्या स्वागताची तयारी सुरु होत असे. अख्खे घर झाडून त्याला रंगरंगोटी केली जात असे. घरातील बच्चे कंपनीपासून वयोवृद्धही आपापल्या परीने या मोहीमेत उत्साहाने सहभागी होत असत. साफसफाई झाली कि घराघरांतून दिवाळीच्या फराळाचे सुगंध येऊ लागत. या फराळ बनवण्याच्या प्रक्रियेतही घरातील समस्त मंडळी आपापल्या परीने सहभागी होत असत.

घरातील कर्त्या पुरुषाचा बोनस झालेला असायचा, मग टेलरकडे जाऊन नवीन कपडे शिवण्यासाठी माप दिले जाई. कंदिलासाठी काठ्या गोळा करून सुरीने तासून आणि मापात कापून त्यापासून आकाशकंदील बनवला जाई किंवा माळ्यावर ठेवलेला कंदिलाचा जुना सांगाडा काढून त्याला नवीन कागद लावला जाई. घरातील महिला वर्गाची रांगोळ्यांची विशेष तयारी चालू असायची. ठिपक्यांच्या रांगोळीसाठी कागदावर मापात रेषा आखून अगरबत्तीच्या साहाय्याने त्यावर छिद्रे पाडली जात.

गेल्या वर्षीचे शिल्लक रंग आणि रांगोळी यांचा अंदाज घेऊन नवीन रंग खरेदी करण्याचा बेत आखला जात असे. ४ दिवसांत दारात कोणत्या ४ रांगोळ्या काढायच्या त्या वहीच्या पानावर पेन्सिलने काढून त्यामध्ये रंग कोणते भरायचे हेही निश्चित केले जात असे. बच्चे कंपनी मातीचे किल्ले बनवण्याची तयारी करत. त्यासाठी आवश्यक साहित्याची जमवाजमव केली जात असे. आपण बनवलेला किल्ला इतरांपेक्षा अधिक उठून कसा दिसेल याची आगळी चढाओढ चालत असे.

नरक चतुर्दशीच्या पहाटे लवकर उठून अभ्यंग स्नान करायचे म्हणून त्याची तयारी आदल्या संध्याकाळपासूनच केली जात असे. घरातील गृहिणी घरीच उटणे बनवत असे. दिवाळीच्या गुलाबी थंडीत पहाटे लवकर उठून अंगाला सुगंधी तेल आणि उटणे लावून आंघोळ करण्यात आणि त्यानंतर अंगठ्याने नरकासुराचे प्रतीक म्हणून अंगठ्याने कारेटे फोडून त्याची कडुशार बी जिभेवर ठेवण्यात वेगळीच मौज असे.

दिवाळीच्या पहिल्या आंघोळीची सर वर्षभरात पुन्हा कधीच अनुभवाला येत नसे. सहामाही परीक्षा संपून बच्चे कंपनीला दिवाळीची सुट्टी लागलेली असायची. सुट्टी पडल्यावर सर्वप्रथम मुले शाळेत शिकवल्यानुसार शुभेच्छापत्र बनवायची आणि या शुभेच्छा पत्रांवर दिवाळीच्या शुभेच्छांसह आपुलकीचा संदेश लिहून ती पोस्टाने आपल्या आप्तेष्टांना आणि मित्र मंडळींना पाठवत. घरी बनवलेल्या फराळाच्या विविध पदार्थांची शेजाऱ्या पाजाऱ्यांकडे देवाणघेवाण व्हायची. घरोघरी जाऊन मोठ्यांचे आशीर्वाद घेतले जात असत.

आता मात्र चित्र बदलले आहे. शहरासारख्या ठिकाणी घरातील स्त्री पुरुष दोघेही नोकरी व्यवसायानिमित्त प्रतिदिन घराबाहेर पडत असल्याने दिवाळीच्या तयारीवर आणि सण साजरा करण्यावर ऑनलाईनचा आणि रेडिमेडचा प्रभाव दिसू लागला आहे. अनेक घरांत अर्बन किंवा तत्सम कंपन्यांची माणसे बोलावून घराची साफसफाई आणि रंगरंगोटी केली जाते. दारात रांगोळी काढण्यासाठी पुरेसा वेळ नसल्याने किंवा रांगोळी काढण्याची कला अवगत करण्यासाठी कधी प्रयत्नच न केल्यामुळे रांगोळीचे स्टिकर्स लावले जातात किंवा रांगोळीसाठी तयार छापे वापरले जातात.

वाढती मागणी लक्षात घेऊन रांगोळ्यांचे विविध आकाराचे छापे आता बाजारातही मोठ्या प्रमाणात मिळू लागले आहेत. कंदीलही रेडिमेड विकत आणून दारावर लावले जाऊ लागले आहेत. मातीच्या पणत्यांची जागा आता विजेच्या तोरणांनी घेतली आहे. दैनंदिन कामाच्या दगदगीत फराळ तरी केव्हा बनवणार त्यामुळे दिवाळीसाठीचा फराळही रेडिमेड विकत आणला जाऊ लागला आहे.



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई.
९६६४५५९७८०

लोकांची वाढती मागणी लक्षात घेऊन रेडिमेड फराळाच्या उद्योगालाही गती मिळू लागली आहे. विकत आणलेला फराळ बेताचाच असल्याने आणि तो रेडिमेड असल्याने शेजारीपाजारी देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. ऐन दिवाळीतही टेलर्सची दुकाने ओस पडू लागळी आहेत, रेडिमेड कपड्यांचा प्रभाव वाढल्याने सराईत टेलर्सनी सुद्धा टेलरिंग सोडून रेडिमेड कपड्यांच्या अल्ट्रेशनला सुरुवात केली आहे. भाऊ बहिणींना भाऊबीजेच्या निमित्ताने दिल्या जाणाऱ्या भेटवस्तू सुद्धा त्यांना भाऊबीजेच्या आधीच मिळू लागल्या आहेत, त्यामुळे यंदा दादा ताईकडून काय भेटवस्तू मिळणार याबाबतची उत्सुकताच संपून गेली आहे.

हल्ली तर किल्लेही रेडिमेड मिळू लागले आहेत. शुभेच्छापत्र रेडीमेड मिळू लागली आहेत. आता तर शुभेच्छापत्रांचा काळही संपत चालला आहे. प्रत्येकाच्या हातात स्मार्टफोन आले आहेत आणि त्यात व्हॉटस्अपही आहे. आता शुभेच्छांची देवाणघेवाणही व्हॉटस्अपवर होऊ लागली आहे. दिवाळीनिमित्त सुट्टी मिळते म्हणून इतर सुट्यांप्रमाणे दिवाळीलाही लोक उशिरा उठू लागले आहेत. त्यामुळे अभ्यंग स्नान तर बाजूलाच राहिले.

शहरातील लोकांचे राहणीमान उंचावल्याने पूर्वी ज्या प्रकारे दिवाळी श्रीमंतांच्या घरी साजरी होत असे तशी आता चाळीचाळींतूनही ती साजरी होऊ लागली आहे. कामाचा व्याप आणि वेळेच्या अभावामुळे आताच्या पिढीला दिवाळीची सारी सिद्धता करण्यास वेळ मिळत नसेलही मात्र रेडिमेडच्या नादात दीपावलीचा खरा आनंद आपण गमावत आहोत ह नक्की!

शहरातील धकाधकीच्या जीवनातही काही मंडळी आपली संस्कृती जोपासत आहेत, परंपरांचे पालन करत आहेत; मात्र या घरांतील कॉन्व्हेंट मध्ये, इंग्रजी माध्यमांमध्ये शिकणारी भावी पिढी ही परंपरा पुढेही चालवतील का ? की करिअरच्या नादात आपल्या संस्कृतीला विसरतील हाही एक प्रश्न आहे. हिंदू धर्मियांनी आजतागायत काळानुसार आपल्या परंपरांमध्ये, चालीरीतींमध्ये बदल केलेला आहे. मात्र आपण आपल्या संस्कृतीशी जेव्हढी तडजोड करू नेव्हढे खऱ्या आनंदापासून दूर जाऊ हेही तितकेच सत्य आहे.

●●●●●●

# योगाच्या माध्यमातून कमी करा ब्लड प्रेशर





ब्लड प्रेशर (रक्तदाब) हा आजार घराघरात आहे. त्याला नियंत्रणात ठेवणे गरजेचे आहे. योगासनामुळे ब्लड प्रेशर नियंत्रणात ठेवता येते. योगासनच्या विविध आसनाच्या माध्यमातून शरीराला आराम मिळतो. तणाव कमी होतो. ब्लड फ्लोमध्ये सुधारणा होते.

आरामदायी आसनामुळे शरीराला आराम तर मिळतोच पण रक्तदाबही नियंत्रित राहतो. या आसनामुळे शरीरातील स्नायूंचा ताण कमी होतो आणि शरीरातील रक्ताभिसरण प्रक्रिया चांगली सुधारते.

बालासन हा दीर्घ श्वास घेण्याचा आणि शरीराला आराम देण्याचा उत्तम मार्ग आहे. हे आसन मन शांत करते आणि तणाव कमी करते. यामुळे रक्तदाबात सुधारणा होते. रोज बालासन केल्याने रक्तदाब नैसर्गिकरित्या नियंत्रणात राहतो.

विपरीतकरणी हे आसन केवळ रक्तदाब नियंत्रित करत नाही तर शरीराला आराम देण्याचा एक चांगला मार्ग आहे. या आसनामुळे शरीरातील रक्तप्रवाह योग्य दिशेने नियंत्रित होतो. तणाव आणि चिंता कमी होते. त्यामुळे रक्तदाब नियंत्रणात राहतो.

अधोमुख श्वानासनामुळे शरीरात ताण निर्माण होतो आणि तणाव दूर होता. या आसनामुळे शरीराच्या खालच्या भागात रक्त प्रवाह चांगला होतो. त्यामुळे रक्तदाब नियंत्रित राहण्यास मदत होते. हे आसन नियमित केल्याने हृदयाचे आरोग्यही सुधारते.

शवासन हे योगाचे सर्वात सोपे आणि प्रभावी आसन आहे. या आसनामुळे शरीर आणि मनाला पूर्ण विश्रांती मिळते. हे आसन दीर्घ श्वासावर लक्ष केंद्रित करते. या आसनामुळे नैसर्गिकरित्या रक्तदाब नियंत्रित राहण्यास मदत होते.

●●●●●●

## वाचक लिहितात

### फटाके भारतीय संस्कृतीचा भाग नाहीत!

वाढते प्रदूषण आणि हवामानातील बदल लक्षात घेऊन मुंबई उच्च न्यायालयाने गेल्या वर्षी दिवाळीत फटाके फोडण्यासाठी केवळ दोन तासांचा अवधी दिला होता. यंदाही नायालय फटाके फोडण्यासाठी वेळा ठरवून देईल. गतवर्षीच्या तुलनेत यंदाची परिस्थिती तेव्हढीशी गंभीर नसली तरी दिवाळीत प्रचंड प्रमाणात फोडल्या जाणाऱ्या फटाक्यांमुळे तशी परिस्थिती उद्भवू शकते हे सुद्धा खरे आहे.

न्यायालयाने ठरवून दिलेल्या वेळेच्या व्यतिरिक्त अन्य वेळेत फटाके फोडले जात असतील, तर त्यावर कारवाई करण्याबाबत प्रशासन यंदा काय सिद्धता करणार आहे हे पाहणेही तितकेच महत्वाचे आहे. दिवाळीनिमित्त फोडल्या जाणाऱ्या फटाक्यांवर नियंत्रण यावे यासाठी दरवर्षी न्यायालय वेळेची मयार्दा आखून देते मात्र मुंबईसारख्या सर्वाधिक प्रदूषित शहरात दिवाळीच्या दिवसांत रात्री १२ वाजल्यानंतरही फटाके फोडले जातात हे वास्तव नाकारून चालणार नाही. याकडे पोलीस प्रशासनही कोणाची तक्रार येईपर्यंत सोयीस्करपणे कानाडोळा करते. मुंबईतील पोलीस वसाहतींमध्ये सुद्धा रात्री उशिरापर्यंत फटाके फोडले जातात. त्यामुळे न्यायालयाच्या या आदेशाला प्रशासन किती गांभीर्याने घेते हाही एक प्रश्नच आहे.

फटाक्यांच्या आवाजाच्या मयार्देबाबतही दरवर्षी नियम घातले जातात मात्र दिवाळीत ही मयार्दाही सर्वत्र बिनदिक्कतपणे ओलांडली जाते. दिवाळीच्या दिवसांत शहरात सर्वच ठिकाणी मोठ्या प्रमाण फटाके फोडले जात असल्याने प्रशासन तरी कुठे कुठे लक्ष देणार? फटाक्यांमुळे प्रदूषणात वाढ होऊन केवळ माणसाच्याच नव्हे तर पक्षी आणि प्राण्यांच्या आरोग्याचेही अपरिमित नुकसान होते. फटाके फोडणे म्हणजे केवळ धनाचाच अपव्यय नव्हे, तर फटाक्यांमुळे दरवर्षी मोठ्या प्रमाणात जैविक आणि वित्तीय हानी होत असते. क्षणिक सुखाव्यतिरिक्त कोणतेही लाभ नसणारी फटाके फोडण्याची प्रथा ही मुळात भारतीय संस्कृतीचाच भाग नाही. दिवाळी आणि फटाके फोडणे यांचा तर तिळमात्र संबंध नाही. मग या विषवल्लीच्या छोट्या छोट्या फांद्या छाटण्यात वेळ घालवण्यापेक्षा प्रदूषणकारी फटाक्यांवर बंदी आणून मुळावरच का घाव घातला जात नाही?

■ सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई.

### हलाल मुक्त दिवाळी!

थोड्याच दिवसात आपण दिवाळी साजरी करणार आहोत. त्यानिमित्त सगळीकडे घराची साफसफाई, रंगरंगोटी, सजावट होत आहे. नवीन कपड्यांची खरेदी, फराळाच्या पदार्थांसाठी लागणारे साहित्य, किराणामाल यांची खरेदी देखील उत्साहात सुरू आहे. अशावेळी एक आवाहन वारंवार होत असल्याचे वाचण्यात आले. यंदाची दिवाळी हलाल मुक्त दिवाळी म्हणून साजरी करूया!

तसं बघितलं तर 'हलाल ' या विषयावर व्यापक प्रमाणावर जनजागृती होत आहे. हलाल ही इस्लामवर आधारित अर्थव्यवस्था आहे. आज तर हलाल ही संकल्पना केवळ मांसाहारापुरती म्हणजे खाद्य पदर्था पुरती मर्यादित राहिलेली नसून ती औषध, दावाखाने, बांधकाम, बिल्डिंग, उपहार गृह, सौंदर्य प्रसाधने अश्या अनेक ठिकाणी येऊन पोहोचली आहे. हलाल प्रमाणित लोगो या विविध ठिकाणी बघायला मिळतो. मुळातच प्रश्न हा आहे की जर हलाल इस्लाम मान्य आहे तर केवळ मुसलमानांपुरताच ते मर्यादित असायला हवे, असं असताना देखील बहुसंख्य हिंदूंच्या देशात याची आवश्यकताच काय?

दुसरे म्हणजे यातून मिळणारा पैसा देशविघातक कृत्ये करणाऱ्यांना सहाय्य करण्यासाठी वापरला जातो हे सुध्दा उघड झाले आहे. तेव्हा या हलाल अर्थव्यवस्थेला रोखण्यासाठी यावर्षीची दिवाळी हलाल मुक्त दिवाळी साजरी केली तर नक्कीच काही प्रमाणात यावर आळा बसेल. त्यासाठी हलाल प्रमाणित मिठाई, खाद्यपदार्थ, भेटवस्तू खरेदी न करणे. हलालच्या दुष्परिणामांविषयी हिंदू बांधवांना जागृत करणे. इत्यादी प्रयत्न संघटित होऊन केल्यास नक्कीच ही दिवाळी हलाल मुक्त दिवाळी ठरेल आणि देशाची अर्थ व्यवस्था बळकट करण्यासाठी सहाय्यक ठरेल.

■ सौ. प्रिया बागडदेव, छिंदवाडा.

### मतदारांनी प्रश्न विचारायलाच हवे

विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. २९ च्या नंतर मतदारांच्या घरापर्यंत उमेदवारांच्या फेऱ्या सुरू होतील. उमेदवार कितीही असोत, कुणी ना कुणी निवडून येईल. त्यानंतर आपल्या मागण्या पूर्ण झाल्या नाहीत, रस्ते, नाल्या, पाणी अशा मुलभूत सोयींकडे दुर्लक्ष झाले की आपण त्या आमदाराच्या नावाने बोटं मोडतो. पण, नंतर शिव्याशाप देवून काय उपयोग? जुनं जाऊ द्या, आत्ताच जे आमदार होते त्यांना आणि अन्य उमेदवारांना आपण जाब विचारायला हवा.

■ सुरेंद्र भानारकर, नागपूर.

# आयकर रिटर्न भरल्यावर विभागाची नोटीस का येते?

## सोप्या भाषेत इन्कमटॅक्स आणि इन्वेस्टमेन्ट

सीए. गोविंदप्रसाद एस. मुंदडा
सीए. आकाश जी. मुंदडा
जालना

हा विषय समजण्यासाठी आपल्याला मागच्या दोन आठवड्यात पाहिलेली माहिती कामी येणार आहे.

मागच्या दोन आठवड्यात आपण बघितले की बँका आयकर विभागाला AIR ( Annual Information Report) मध्ये प्रत्येक पॅन नंबरवर किती व कोणते व्यवहार झाले आहे हे कळवते. तसेच पॅनवर आलेल्या माहितीला आयकर विभागाचे सिस्टीम कसे बघते हे ही आपण बघीतले. यापुढील माहिती आपण असेच सोप्या भाषेत प्रश्नोत्तर रुपात बघणार आहोत.

**प्रश्न -** बँका प्रमाणे अजुन कोण कोण आपल्या पॅनवर केलेले व्यवहार आयकर विभागाला रिपोर्ट करते ?

■ अ. रजिस्ट्री ऑफिस

जेव्हा आपण एखादी जमीन/ प्लॉट/शेती/ फ्लॅट इ.असे काहीही खरेदी किंवा विक्री करतो तेव्हां आपल्याला पॅन नंबर देणे अनिवार्य असते. ही माहिती रजिस्ट्री ऑफिस आयकर विभागाला आपल्या पॅनवरचे व्यवहार कळवते.

डिमॅट अकाउंट (SEBI)

आपले शेअर्स व म्युच्युअल फंड चे सर्व व्यवहार हे SEBI (Securities Exchange Board Of India) या सरकारी संस्थेद्वारा बनवलेल्या नियमाने चालतात. सएइक च्या नियमाप्रमाणे पॅन नंबर दिल्या शिवाय डिमॅट अकाउंट उघडता येत नाही. तसेच या नियमाप्रमाणे डिमॅट वर च्या प्रत्येक व्यवहाराची माहिती आयकर विभागाला दयावी लागते.

उ. इतर

या सोबतच आयकर विभाग इतर माध्यमांकडून सुद्धा आपली माहिती जमा करते. उदारणार्थ जर आपण विदेश फिरायला गेलो तर आपल्या पॅन वर TCS करावे लागते. आपण कार घेतली तरी TCS होते, इत्यादी हे सर्व व्यवहार आपल्या AIS व 26 अर वर दिसतात

**प्रश्न -** आयकर रिटर्न भरल्यावरही बऱ्याचदा आयकर विभागाची नोटिस आलेली दिसते. असे का होते?




■ जसे आतापर्यंत आपण बघीतले की आयकर विभाग विविध माध्यमांकडून आपली माहिती जमा करते. आयकर रिटर्न भारतांना एखादीही माहिती चुकूनही सुटली तर आयकर चे सिस्टीम आपोआप आपल्या पॅनवर नोटीस पाठवतो.

यापुढील माहिती आपण पुढच्या आठवड्यात बघूया.

■ ■ ■

## अशोकायन

### राजा मरो की राणी..!

एकाच कुटूंबात दोन झेंडे
सुज्ञ मतदारांनो तुम्हाला
हे पटतेय का गडे?.

पटत असेल तर
खुशाल करा मतदान
पटत नसेल तर-
चारी मुंढ्या चित करुन
दाखवा आसमान..!

सत्तेत येवो कोणताही पक्ष
सत्ता राहावी घरात
सत्ता पिपासु नेत्यांची
चाल जनतेने घ्यावी ध्यानात!



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

# सॅमसंगकडून भारतात सॅमसंग हेल्थसाठी नवीन मेडिकेशन्स ट्रॅकिंग वैशिष्ट्याची घोषणा



**गुरूग्राम, २६ ऑक्टोबर :** भारतातील सर्वात मोठा ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँड सॅमसंगने सॅमसंग हेल्थ ॲपमध्ये २ मेडिकेशन्स ट्रॅकिंग वैशिष्ट्याची १ भर केल्याची घोषणा केली आहे, जे वापरकर्त्यांना अधिक सर्वसमावेशकपणे आरोग्याचे व्यवस्थापन करण्यास मदत करते.

हे वैशिष्ट्य वापरकर्त्यांना त्यांच्या प्रीस्क्राइब केलेल्या किंवा ओव्हर-द-काऊंटर औषधोपचार पथ्यांवर देखरेख ठेवण्याची सुविधा देईल, तसेच महत्त्वपूर्ण वैद्यकीय माहिती व टिप्स देखील देईल. हे वैशिष्ट्य उच्च रक्तदाब, मधुमेह, पीसीओएस, पीसीओडी आणि इतर गंभीर आजारांसाठी औषधोपचार करत असलेल्या आणि वेळेवर औषधांचे डोस घेणे आवश्यक असलेल्या व्यक्तींसाठी औषधोपचाराचे काटेकोरपणे पालन होण्यावर देखरेख ठेवण्यास मदत करू शकते.

सॅमसंग ब्रँड ग्राहकांना प्रथम प्राधान्य देतो आणि त्यांच्या दैनंदिन जीवनाला उत्साहित करू शकणारी उत्पादने व सेवा डिझाइन करण्यासाठी सतत काम करतो. आमचा डिवाईसेस व सेवांना एकत्र करत व्यक्तींना त्यांच्या आरोग्याबाबत उत्तम माहिती मिळण्यासोबत व्यवस्थापन करण्यासाठी सर्वांगीण हेल्थ प्लॅटफॉर्म निर्माण करण्याचा मनसुबा आहे. भारतीयांसाठी सॅमसंग हेल्थ ॲपमध्ये मेडिकेशन्स वैशिष्ट्याची भर करण्यासह आमचा विश्वास आहे की वापपरकर्ते त्यांच्या औषधोपचारांचे अधिक कार्यक्षमपणे व्यवस्थापन करू शकतील, औषधोपचारांचे अधिक काटेकोरपणे पालन करू शकतील आणि परिणामत: आरोग्य उत्तम ठेवू शकतील असे नोएडा येथील सॅमसंग रिसर्च इन्स्टिट्यूटचे व्यवस्थापकीय संचालक क्यूनग्यून रू म्हणाले.

सॅमसंग येथील आरअँडडी, डिझाइन अँड कंझ्युमर एक्स्पेरिअन्स टीम्सच्या सहयोगात्मक प्रयत्नामधून मेडिकेशन्स वैशिष्ट्य भारतीय ग्राहकांच्या गरजा लक्षात घेत डिझाइन करण्यात आले आहे. सॅमसंग हेल्थ ॲपमध्ये निवडक औषधाचे नाव प्रविष्ट केल्यानंतर मेडिकेशन्स वैशिष्ट्य वापरकर्त्यांना जनरल डिस्क्रिप्शन्स, तसेच संभाव्य प्रतिकूल परिणामांसह सविस्तर माहिती देईल. तसेच, नवीन वैशिष्ट्य ड्रग-टू-ड्रग इंटरॲक्शन्समधील प्रतिकूल प्रतिक्रियांबाबत माहिती देईल आणि इतर संबंधित सुरक्षितताबाबत मार्गदर्शन देईल. वापरकर्ते औषधे घेण्याची आणि सॅमसंग हेल्थ ॲपच्या माध्यमातून पुन्हा रिफिल करण्याची आठवण करून देण्यासाठी अलर्ट्स सेट करू शकतात.

या अलर्ट्समध्ये वैयक्तिक वापरकर्त्यांच्या गरजेनुसार बदल करता येऊ शकतो, ज्यामुळे औषधोपचारांना वापरकर्त्यांसाठी त्यांच्या महत्त्वानुसार प्राधान्य देता येऊ शते. सॅमसंग हेल्थ ॲप जेंटल ते स्ट्राँग रिमाइंडर्स पाठवते. गॅलॅक्सी वॉच वापरकर्त्यांना देखील त्यांच्या मनगटावरील स्मार्टवॉचच्या माध्यमातून रिमाइंडर्स मिळतील, ज्यामुळे ते स्मार्टफोन दूर असताना देखील त्यांच्या औषधोपचार वेळापत्रकाचे पालन करू शकतील.

हेल्थ मॉनिटर ॲपच्या माध्यमातून उपलब्ध होतात. बाजारपेठ किंवा डिवाईसनुसार उपलब्धतेमध्ये फरक असू शकतो. सॉफ्टवेअर ॲज ए मेडिकल डिवाईस (एसएएमडी) म्हणून मान्यता/नोंदणी प्राप्त करण्यामध्ये बाजारपेठ निर्बंध असल्यामुळे ही वैशिष्ट्ये सध्या सेवा उपलब्ध असलेल्या बाजारपेठांमधून खरेदी केलेल्या वॉचेस व स्मार्टफोन्सवर कार्य करतात (पण, वापरकर्ते नॉन-सर्विसबाजारपेठांमध्ये गेल्यास सर्विसवर प्रतिबंध होऊ शकतो). हे ॲप २२ वर्ष व त्यापेक्षा अधिक वय असलेल्या व्यक्तींमधील आरोग्याचे मापन करण्यासाठी वापरता येऊ शकते.

## महायुतिच्या पायाभूत सुविधा आणि जनकल्यानाला कौल मिळणार : सीएसडीएस-लोकनीतिसर्वेक्षण अहवाल प्रसिद्ध

**मुंबई, २६ ऑक्टोबर :** नुकत्याच झालेल्या सीएसडीएस.- लोकनीतिच्या निवडणुकीपूर्वीच्या सर्वेक्षणात असे दिसून आले आहे की, महाराष्ट्र राज्य निवडणुकांपूर्वी पायाभूत सुविधा आणि कल्याणकारी उपक्रमांना मोठ्या प्रमाणात सार्वजनिक मान्यता मिळाल्याने भाजपाच्या नेतृत्वाखालील महायुति आघाडीला फायदा होणार आहे. सार्वजनिक वाहतूक, वीज, पाणीपुरवठा आणि स्वच्छता यासारख्या क्षेत्रांमध्ये देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली लक्षणीय सुधारणा झाल्या आहेत, ज्यामुळे सत्ताधारी महायुतीला निवडणुकीत मोठ्या प्रमाणात फायदा होऊ शकतो. ही कामगिरी मतदारांमध्ये प्रतिध्वनित होत असल्याचे दिसते, युती पुन्हा सत्तेत आल्यास फडणवीस हे मुख्यमंत्रीपदासाठी प्रबळ दावेदार समजले जात आहे.

सर्वेक्षणानुसार, पायाभूत सुविधा विकासामुळे महाराष्ट्राचा कायापालट झाला कारण महायुति सरकारला सार्वजनिक मान्यता देणाऱ्या प्रमुख घटकांपैकी एक म्हणजे त्याचा पायाभूत सुविधा विकास म्हणावा लागेल. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अद्ययावत करणे, रस्ते जोडणी वाढवणे आणि परवडणारी घरे उपलब्ध करून देणे यासाठीचे सरकारचे प्रयत्न हे फडणवीस यांच्या नेतृत्वाचे वैशिष्ट्य बनले असल्याचे दिसून येत आहे. हे उपक्रम केवळ शहरी भागापुरते मर्यादित नव्हते तर ग्रामीण भागांनाही फायदा झाला आहे, रस्त्यांच्या पायाभूत सुविधांमध्ये केलेल्या लक्षणीय गुंतवणूकीमुळे मागील काही वर्षात आरोग्यसेवा आणि शिक्षणासारख्या अत्यावश्यक सेवा अधिक चांगल्या प्रकारे उपलब्ध झाल्या आहेत.

कल्याणकारी योजनांना जनसहभाग वाढावा यासाठी महायुति सरकारमधील कल्याणकारी कार्यक्रमांनीही मतदारांना प्रभावित केले आहे. माझी लाडकी बाहिन सारख्या उपक्रमांमुळे २ कोटींहून अधिक महिलांना लाभ झाला आणि वंचित कुटुंबांना तीन मोफत गॅस सिलिंडरचे वितरण करण्यात आले, ज्यांचे जीवनमान सुधारण्यावर आणि सामाजिक समानतेला प्रोत्साहन देण्यावर लक्ष केंद्रित केल्याबद्दल राज्यभरातून कौतुक करण्यात आले आहे. अनुसूचित जाती/जमाती समुदाय आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसारख्या असुरक्षित गटांना प्राधान्य देणाऱ्या सरकारच्या या विविध उपक्रमांमुळे जनतेचे समाधान झाले, ज्यामुळे ते आधीच्या महाविकास आघाडी प्रशासनापेक्षा वेगळे आहे अशी प्रतिक्रिया येत आहेत.

फडणवीस हे मुख्यमंत्रीपदाचे प्रबळ दावेदार असून महाराष्ट्राच्या निवडणुका जसजशा जवळ येत आहेत, तसतसे पायाभूत सुविधा आणि कल्याणकारी सुधारणा या दोन्हींमध्ये फडणवीस यांचे नेतृत्व प्रमाण मानले जात आहे. महायुतीची सत्ता कायम राहिल्यास देवेंद्र फडणवीस यांना मुख्यमंत्रिपदासाठी स्पष्ट पसंती म्हणून स्थान मिळू शकते. सर्वसमावेशकता, पारदर्शकता आणि शाश्वत विकासावर लक्ष केंद्रित करणाऱ्या त्यांच्या काम करण्याच्या प्रक्रियेला व्यापक प्रमाणात मतदारांची मान्यता मिळाली आहे, ज्यामुळे आगामी निवडणुकांमध्ये महायुति आघाडीला भक्कम आघाडी मिळणार असल्याचे बोलले जात आहे.

## गॅलॅक्सी, ए१६ ५जी १८९९९ रूपयांमध्ये४ लाँच




**गुरूग्राम, २६ ऑक्टोबर :** सॅमसंग या भारतातील सर्वात मोठ्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडने आज भारतात गॅलॅक्सी ए१६ ५जी च्यार लाँचची घोषणा केली. या स्मार्टफोनची किंमत १८९९९ रूपयांपासून सुरू होते.

वापरकर्त्यांसाठी किफायतशीर दरामध्ये सर्वोत्तम नाविन्यता देत गॅलॅक्सीं ए१६ ५जी ने भारतातील मिड-रेंजस्मार्टफोन्ससाठी नवीन मानक स्थायपित केले आहे, जेथे या स्मार्टफोन ओएस अपग्रेड्सच्या ६ जनरेशन्स आणि ६ वर्ष सिक्युरिटी अपडेट्स आहेत.

सॅमसंग गॅलॅक्सी ए१६ ५जी ८ जीबी/१२८ जीबी व ८ जीबी/२५६ जीबी या दोन व्हेरिएण्ट्स्सह गोल्डर, लाइट ग्रीन आणि ब्यू ब्लॅक या आकर्षक रंगांमध्ये१ उपलब्ध असेल. हा स्मार्टफोन आजपासून रिटेल स्टोअर्स, Samsung.com आणि ऑनलाइन प्लॅटफॉर्म्स सह Amazon.in व Flipkart.com वर उपलब्ध असेल.

## आयडीबीआय बँकचे ३० सप्टेंबर रोजी समाप्त झालेल्या तिमाही आणि अर्ध वर्षाचे आर्थिक निकाल जाहीर

**मुंबई, २६ ऑक्टोबर:** आयडीबीआय बँकेने एफवाय२५ च्या दुसऱ्या तिमाहीचे आपले निकाल जाहीर केले. एफवाय२५ च्या दुसऱ्या तिमाहीचा निव्वळ नफा १,८६८ कोटी रु. झाला असून गेल्या वर्षाच्या तुलनेत ३९% इतकी दमदार वाढ त्यात झाली आहे. कार्यकारी नफा ३,००६ कोटी रु. झाला आहे, जो गेल्या वर्षाच्या तुलनेत ४५% वाढला आहे. एनआयएम ४.८७% असून निव्वळ व्याज उत्पन्न ३,८७५ कोटी रु. आहे, जे मागील वर्षाच्या तुलनेत २६% वाढले आहे. २०२५ आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीत कॉस्ट ऑफ डिपॉझिट ४.६६% आहे, जी २०२४ या आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीत ४.२२% होती. सीआरएआर २१.९८% असून गेल्या वर्षाच्या तुलनेत ही वाढ ७२ बीपीएसची आहे. रिटर्न ऑन ॲसेट्स (आरओए) १.९७% आहे, गेल्या वर्षाच्या तुलनेत ही वाढ ३८ बीपीएसची आहे, तर रिटर्न ऑन इक्विटी (आरओइ) २०.३५% आहे, जी गेल्या वर्षीच्या तुलनेत १३० बीपीएसने वाढली आहे. एफवाय २०२५ च्या दुसऱ्या तिमाहीत निव्वळ व्याज उत्पन्न २६%नी सुधारून ३,८७५ कोटी रु. झाले आहे. जे २०२४ च्या दुसऱ्या तिमाहीत ३,०६६ कोटी रु. होते. एफवाय२०२५ च्या दुसऱ्या तिमाहीत निव्वळ व्याज मार्जिन (एनआयएम) ५४ बीपीएस ने सुधारून ४.८७% वर आले आहे, जे २०२४ च्या दुसऱ्या तिमाहीत ४.३३% होते. निव्वळ एनपीए रेश्यो ३० सप्टेंबर २०२४ रोजी ०.२०% आहे, जो ३० सप्टेंबर २०२३ रोजी ०.३९% होता. पीसीआर ९९.४२% वर आहे, गेल्या वर्षाच्या तुलनेत ३२ बीपीएस ने त्यात सुधारणा झाली आहे.

## टाटा एआयजीतर्फे महिला, मानसिक आरोग्य आणि कर्करोग विषयक उपचार सेवा यावर भर देणाऱ्या राइडर्सचे सादरीकरण

**नागपूर, २६ ऑक्टोबर :** भारतातील आघाडीची जनरल विमा पुरवठादारकंपनी टाटा एआयजी जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेडने आज ६० पेक्षा जास्त फायदे देणारे पाच नवीन राइडर्ससादर करण्याची घोषणा केली. त्यायोगे त्यांच्या रिटेल आरोग्य विमा उत्पादनांची लवचिकता आणि व्यापकता वाढविण्याचे उद्दिष्ट आहे. वैद्यकीय खर्च सतत वाढत असल्याने आणि आरोग्यसेवेच्या गरजा बदलत असल्यानेवाढत्या आरोग्य समस्या आणि जीवनशैली बदलांचा विचार करून हे राइडर्सवैयक्तिकृत संरक्षण देण्यासाठी तयार केले गेले आहेत. या सादरीकरणातूनग्राहकांना आरोग्य विमा क्षेत्रात विकास साधणाऱ्यासंबंधित आणि अभिनव उपायसुविधादेण्याची टाटा एआयजी चीबांधिलकीप्रतिबिंबीत होते.

मेंटलवेलबीइंग, एम्पॉवरहर, ओपीडी केअर, कॅनकेअर आणि फ्लेक्सीशिल्ड हे नवीन राइडर्समानसिक आरोग्य, महिलांचे आरोग्य आणि कर्करोग संरक्षण या सारख्या महत्त्वाच्या आरोग्य गरजांच्या पूर्ततेसाठी तयार करण्यात आले आहेत. एम्पॉवरहरराइडर महिलांच्या समग्र आरोग्य समस्यांवर लक्ष केंद्रित करते. जसे की वंध्यत्व, PCOS आणि इतर स्त्रीरोग संबंधित समस्या. मेंटलवेलबीइंगराइडरया उद्योगक्षेत्रातप्रथमच मानसिक आरोग्य चांगले राखण्यासाठी प्रतिबंधात्मक तपासण्या आणि पुनर्वसन संरक्षण सादर करते. कॅनकेअर कर्करोगासाठी वाढीव संरक्षण देते, ओपीडी केअर आणि फ्लेक्सीशिल्ड ग्राहकांना वाढत्या वैद्यकीय खर्च आणि दैनंदिन आरोग्य खर्चांपासून सुरक्षित करतात.

## सा रे ग म प च्या सेटवर कार्तिक आर्यनने कोणाला गजरा भेट म्हणून दिला ?



**मुंबई, २६ ऑक्टोबर:** झी टीव्हीवरील सा रे ग म प ने आपल्या नवीन पर्वाची जोरदार सुरूवात केली असून प्रेक्षकांचाही उत्तम प्रतिसाद ह्या शो ला लाभत आहे. सचिनजिगर, सचेतपरंपरा आणि गुरू रंधावा यांसारख्या अतुलनीय मेंटॉर्सचे पॅनल आणि विपुल रॉय आणि सलमान अली यांसारखे सूत्रसंचालक यांसह हा मंच काही अविस्मरणीय परफॉर्मन्सेससाठी सज्ज आहे. मुळातच ह्या सगळ्या गोष्टींची ह्या पर्वामध्ये जोरदार चर्चा सुरू आहे आणि प्रत्येक भागासह उत्सुकता आणखी शिगेला पोहोचत आहे. पुढच्या वीकेन्डच्या मस्त भागामध्ये प्रेक्षकांना एकपात्री संवादांचा बॉलीवूडचा राजा असलेल्या कार्तिक आर्यनला स्पर्धक पार्वतीला एक सुंदर गजरा भेट देऊन आश्चर्यचकित करताना पाहायला मिळेल. त्याने केवळ तिला गजरा भेटच दिला नाही तर तिच्या केसांमध्ये स्वतः माळलासुद्धा.

कार्तिक म्हणाला, आम्ही इथे येत असताना मला ही कल्पना सुचली जेव्हा विद्या मॅम म्हणाल्या की त्यांना गजरा हवा आहे. मी पाहिलंय की तू नेहमीच केसांमध्ये गजरा माळतेस, म्हणून हा गजरा मी खास तुझ्यासाठी घेऊन आलो. मी एखाद्या प्रोप्रमाणे गजरा तुझ्या केसांमध्ये माळला असला तरी हे मी प्रथमच केले आहे. त्याच्या ह्या गोड कृतीमुळे पार्वतीलाच नव्हे तर सेटवर उपस्थित सर्वांनाच छान वाटले. स्पर्धक आपले सर्वोत्तम ह्या मंचावर देत असून, अशा ह्या क्षणांमुळे आपल्याला ह्या गोष्टीची आठवण होते की सा रे ग म प ही केवळ एक स्पर्धा नाहीये पण हे समर्थन, मैत्री आणि अविस्मरणीय आठवणी निर्माण करण्याबद्दलही आहे. पहा हे खास क्षण आगामी वीकेन्ड भागामध्ये, जिथे कार्तिक आर्यन आणि विद्या बालन हे ह्या मंचावर उपस्थित असतील.

## सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबलमध्ये विरेनने रचला पुष्पाला मारण्याचा कट

**मुंबई, २६ ऑक्टोबर :** पुष्पा इम्पॉसिबल मालिकेतील पुष्पा (करुणा पांडे) या अत्यंत खंबीर आणि आशावादी स्त्रीच्या कहाणीमुळे सोनी सबवरील ही मालिका अत्यंत लोकप्रिय झाली आहे. अलीकडच्या भागांमध्ये, पुष्पा पटोळा प्रदर्शनासाठी जुगल (अंशुल त्रिवेदी) सोबत कानपूरला जाऊन पोहोचते, जिकडे तिचा सामना तिचा जुना शत्रू विरेन (हेमंत खेर) याच्याशी होतो. विरेनच्या जुन्या जखमा अजून वाहत्या आहेत, तो ते काहीच विसरलेला नाही. त्यामुळे तो पुष्पाचा बदला घेण्यासाठी टपलेला आहे. एक भयंकर कट रचून पुष्पापासून कायमची सुटका करून घेण्याचे तो योजतो. पुष्पाच्या घरी तो तिच्या जागी बसंती नावाच्या एका चहावालीला पाठवतो, जी हुबेहूब पुष्पासारखी दिसते.

आपल्या कटाची अंमलबजावणी करण्यासाठी तो पुष्पाच्या कारमध्ये बॉम्ब ठेवण्याचे ठरवतो, जेणे करून तो एक अपघात वाटेल. बॉम्ब कारच्या खाली टिक-टिककरत असताना विरेन पुष्पाच्या घरी तिच्या सारख्याच दिसणाऱ्या बसंतीला पाठवतो. बसंती कानपूरची एक चहावाली आहे.




दुसरीकडे, बॉम्ब फुटतो आणि पुष्पाची कार एका खड्ड्यात जाऊन पडते. इकडे, पुष्पाचे रूप घेऊन तिच्या घरी जाण्यासाठी विरेन बसंतीला आमिष दाखवतो.

**या कार अपघातातून पुष्पा वाचणार का? की विरेनची योजना फसणार?**

पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत पुष्पाची मध्यवर्ती भूमिका करत असलेली करुणा पांडे म्हणते, विरेनच्या भयंकर योजनेमुळे कथानकाला एक तीव्र वळण मिळाले आहे. प्रेक्षकांना एक मोठे सर्प्राइज मिळणार आहे. पुष्पाने आजवर अनेक इम्पॉसिबल गोष्टी साध्य केल्या आहेत, पण यावेळी परिस्थिती फार बिकट आहे. पुष्पाचा मुखवटा घेऊन आलेली बसंती, भयंकर कट आणि पुष्पाचा जीव धोक्यात असल्यामुळे हे नाट्य प्रेक्षकांची उत्कंठा वाढवणार आहे. प्रत्येक वळणाला तुम्ही विचार करत राहाल आणि मला आशा आहे की, पुष्पाची चिकाटी पुन्हा संकटांवर मात करेल.

## शब्दकोडे क्रमांक १९५७



**उभे शब्द :-**

१) चामट, वातड
२) स्तुती, प्रशंसा
३) एक गोड फळ
४) चटकन रागविणारा, संतापी
५) इर्षा, बळ, शक्ती
६) वणवा
७) क्रिकेटमधील धाव
८) नाहक
९) कोलकाताचे विमानतळ
१०) अजिबात, कधीही (नाही),
१४) समुद्र
१५) अवधान, चित्त
१६) केसाळ, ओंगळ प्राणी, रीस
१८) वस्ती
२०) मोठे घर, राजवाडा
२१) त्वचेचा पापुद्रा
२२) पाढ्यातील सहा
२४) नवरा
२५) कापडी बैठक, सतरंजी
२७) चाकरी करणारा
२९) बारीकसारीक
३१) खोकल्याची उबळ
३४) देशाचे नाणे
३५) लापशी
३६) वाचा, किराणा व्यापारी
३७) कातडी
३८) हार, सर
४०) भ्रमर
४१) हेम
४२) गुणांची पारख
४४) अपापाचा माल ***
४५) श्रीरामाची चरित्रगाथा
४७) छोट्याशा कारणावरुन रडणारी
४९) संताप
५१) कपोल
५२) लाडीगोडी लावणे, गोंजारणे
५३) बिनावासाचे पांढरे फूल
५६) हाताने गोळा न होणारा पातळ पदार्थ
५९) एक पालेभाजी
६०) जनावर (हिं.)
६१) नहर
६३) संरक्षक, भिंत
६४) युवती
६६) संगीतातील एक राग
६९) मोठा नगारा
७०) नम्र, वाकलेला
७१) पातक
७२) रक्षाबंधनाचा धागा, एक रंग
७३) नाचणी

(उत्तर उद्याच्या अंकात)

**आडवे शब्द :-**

१) चिमणीला कावळ्याची विनंती
११) मान्यता, अनुमाती
१३) फळाचे साल
१६) शर्त
१७) ढीग
१९) माफी असावी,
२१) गरीब साधा, प्रामाणिक
२३) ** ** दंड भेद
२५) मेंढा
२६) चलनवलन
२८) भांडण
३०) पावसाची झड
३१) तलवारीबरोबरचे शस्त्र
३२) लबाडी कट
३३) जादू
३६) गंध
३७) क्षाराची चव
३८) प्रतिष्ठेचा एक अवयव
३९) मन रमविणारी युवती
४१) कुराणातील वचने
४२) शिखराचे टोक
४३) अस्सल माल, पर्वत
४५) अरण्य
४६) ढग
४८) बांबुची मोठी टोपली
५०) घोडे बांधण्याची जागा
५२) चुका करत करत
५४) भीती
५५) पोलिस
५७) खंदक
५८) अंकशास्त्र
६०) माहितगार
६२) नखरेल चालणे
६५) दात
६६) धनदेवता
६७) वड, प्रतिष्ठा
६८) समुद्रातील अग्नी
७१) गवताचे पान
७२) रात्री सुगंध पसरविणारी वनस्पती
७४) लाज
७५) भूतकाळ
७६) मैत्रीण

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



## सणासुदीनिमित्त 'पीएनजी ज्वेलर्स'तर्फे 'सप्तम' आणि 'इना' कलेक्शन' सादर

**नागपूर, १९ ऑक्टोबर :** गेल्या वर्षीच्या फेस्टिव्ह कलेक्शनला मिळालेल्या यशानंतर, उत्कृष्ट कारागिरी आणि गुणवत्तेसाठी प्रसिद्ध असलेला आणि समृध्द वारसा असलेल्या प्रतिष्ठित ज्वेलरी ब्रँड 'पीएनजी ज्वेलर्स'तर्फे यावर्षी आपल्या लोकप्रिय 'सप्तम' आणि 'इना' कलेक्शनअंतर्गत नवीन डिझाइन्स सादर करण्यात आल्या आहेत. ज्यामध्ये पुन्हा एकदा बॉलिवूड आयकॉन माधुरी दीक्षित या मोहिमेचा चेहरा म्हणून असणार आहेत.

गेल्या वर्षीच्या डिझाईन्सना ग्राहकांच्या प्रतिसादाने प्रेरित होऊन, 'पीएनजी ज्वेलर्स'ने 'सप्तम कलेक्शन'चा विस्तार केला आहे. हे नवीन सप्तम कलेक्शन आनंद, समृद्धी, प्रेम, एकता, नवी सुरुवात, उत्साह आणि सौंदर्य या उत्सवाच्या सात भावना प्रतिबिंबित करून दागिन्यांच्या माध्यमातून आनंद व्यक्त करते. या कलेक्शनमध्ये कुंदन, जडाऊ, हिरे व पारंपरिक सोन्यामध्ये तयार करण्यात आलेले हार, कानातले, अंगठी, ब्रेसलेट इत्यादी उत्कृष्ट दागिन्यांची विस्तृत श्रेणी उपलब्ध आहे. या नवीन डिझाईन्सचा उद्देश भारतीय कलात्मकतेला समकालीन शैलीसह जोडून आधुनिक भारतीय महिलांची आवड व गरजांची पूर्तता करणे हा आहे. वारसा आणि भव्यता यांचा मिलाफ असणारे सप्तम कलेक्शन हे सणाच्या उत्साहाचे प्रतिक आहे.

'पीएनजी ज्वेलर्स'चे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. सौरभ गाडगीळ म्हणाले की, गेल्या वर्षीच्या कलेक्शनला खूपच चांगला प्रतिसाद मिळाला आणि सणासुदीला वेधून घेणाऱ्या नवीन डिझाईन्स सादर करून हा क्षण साजरा करण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत. सप्तम आणि इना कलेक्शनमधील प्रत्येक दागिना हा आधुनिकता आणि परंपरा यांचा मिलाफ करून तयार केला गेला आहे. हे कलेक्शन ग्राहकांना अद्वितीय अनुभव प्रदान करणारे असेल.

ब्रँड ॲम्बेसेडर माधुरी दीक्षित म्हणाल्या की, मी नेहमीच सप्तम आणि इना कलेक्शनच्या अभिजाततेचे आणि सौंदर्याचे कौतुक केले आहे आणि या वर्षीच्या नवीन डिझाइन्स मोहित करणाऱ्या आहेत. मला विश्वास आहे की हे कलेक्शन उत्सव काळात आपल्या पेहरावातील सौंदर्यात भर घालून महिलांच्या नक्कीच पसंतीस पडेल. सप्तम आणि इना हे दोन्ही कलेक्शन पीएनजी ज्वेलर्सच्या महाराष्ट्र आणि गोव्यातील सर्व ४७ दालनांमध्ये उपलब्ध असेल. या उत्सव काळात ग्राहकांना विविध डिझाइन्स पाहता येणार आहेत. सणासुदीचा काळ आणखी संस्मरणीय बनवण्यासाठी पीएनजी ज्वेलर्सने आपल्या ग्राहकांसाठी खास ऑफरही आणली आहे. यामध्ये ३ नोव्हेंबर २०२४ पर्यंत सोन्याच्या दागिन्यांच्या घडणावळीवर ३० टक्क्यांपर्यंत सवलत आणि हिऱ्यांच्या दागिन्यांच्या घडणावळीवर १०० टक्केटक्क्यांपर्यंत सवलत दिली जाणार आहे.

## केदारा प्रवर्तित विशाल मेगा मार्टतर्फे सेबीकडे अद्ययावत आयपीओ कागदपत्रे सादर

**मुंबई, २६ ऑक्टोबर:** केदारा प्रमोटेड सुपरमार्ट मेजर विशाल मेगा मार्टने भांडवली बाजार नियामक सेबीकडे १० रु. चे दर्शनी मूल्य असलेल्या इक्विटी शेअर्ससाठी ८,००० कोटी रु.पर्यंतच्या प्राथमिक समभाग विक्रीकरिता (IPO) अद्ययावत मसुदा कागदपत्रे ऑफर फॉर सेल (OFS) द्वारे प्रवर्तक समायत सर्व्हिसेस एलएलपीकडून सादर केली आहेत.

सध्या, समायत सर्व्हिसेस एलएलपीकडे गुरुग्रामस्थित सुपरमार्ट मेजरमध्ये ९६.५५ टक्के हिस्सा आहे. विशाल मेगा मार्टच्या गोपनीय ऑफर दस्तऐवजाला २५ सप्टेंबर, २०२४ रोजी सेबीने मंजुरी दिल्यानंतर अद्ययावत मसुदा दाखल (UDRHP I) करण्यात आला आहे. कंपनीने जुलैमध्ये गोपनीय प्री-फायलिंग मार्गाने आपले ऑफर दस्तऐवज सादर केले होते. अखेरीस, सार्वजनिक टिप्पण्यांमुळे केलेल्या बदलांचा समावेश केल्यानंतर, कंपनीला DRHP-II (UDRHP-II) अद्ययावत करणे आवश्यक बनले.

विशाल मेगा मार्ट हे भारतातील मध्यम आणि निम्न-मध्यमउत्पन्न गटातील ग्राहकांना सेवा पुरविणारे एक प्रमुख ठिकाण आहे. उत्पादन श्रेणीमध्ये इन-हाउसआणि थर्ड पार्टी अशा दोन्ही ब्रँड्सचा समावेश आहे. त्यात तीन मुख्य श्रेणी आहेत -कपडे, जनरल मर्चेंडाइज आणि फास्ट-मूव्हिंग कंझ्युमर गुड्स (FMCG). भारतभरात विशाल मेगा मार्टस्टोअर्स ३० जून, २०२४ पर्यंत मोबाइल ॲहप आणि वेबसाइटसह ६२६ ठिकाणी कार्यरत आहेत.

कोटक महिंद्रा कॅपिटल कंपनी, आयसीआयसीआय सिक्युरिटीज, इंटेन्सिव्ह फिस्कल सर्व्हिसेस, जेफ्रीज इंडिया, जे.पी. मॉर्गन इंडिया आणि मॉर्गन स्टॅन्ले इंडिया कंपनीहे इश्यूचे बुक-रनिंग्लीड मॅनेजर्स आहेत.

# भक्तिमार्ग

मानवी आयुष्याभोवती अपरिहार्य असणारी व्यावहारिकतेची चौकट सुशोभित ठेवणाऱ्या धनाला लक्ष्मी आणि कुबेर स्वरुपात पूजणं ही आपली संस्कृती आहे. दिवाळीतल्या लक्ष्मीपूजनाच्या दिवशी घरातील धनाची पूजा होते आणि सदासर्वदा लक्ष्मीचा वास राहो ही मनोकामना व्यक्त केली जाते. या पुजेमध्ये घर निर्मळ ठेवणाऱ्या केरसुणीलाही विशेष स्थान असतं. अगदी पहाटेपासून रात्रीपर्यंत साजऱ्या होणाऱ्या या मंगलमय दिवसाबद्दल...

## लाभो लक्ष्मीचा आशीर्वाद






विशेष लेख

सणांच्या मांदियाळीमध्ये सर्वात महत्त्वाची पर्वणी म्हणजे दिवाळी आणि दिवाळीच्या पवित्र पर्वातील एक महत्त्वाचा दिवस म्हणजे लक्ष्मीपूजन... चांगल्या पद्धतीने आयुष्य जगण्यासाठी अनेकगोष्टींची उपलब्धता गरजेची असते, त्यातील महत्त्वपूर्ण बाब म्हणजे धन... धन असेल तर बऱ्याच बिकट समस्या सहजी सुटतात. धनवान माणसाला समाजात मान, प्रतिष्ठा, आदर, प्रेम अगदी न मागता मिळतो. हा त्या व्यक्तीला नसून त्याच्याकडच्या धनाला केलेला नमस्कार असतो ही बाब वेगळी, पण यामुळे नश्वर मानवी देह आणि असमंजस मानवी मन हे दोन्ही सुखावतात यात शंका नाही. त्याबरोबरीने सदर व्यक्तीकडे सद्गुणांचा खजिना असेल तर दुधात साखर... अशा व्यक्तीच्या लोकप्रियतेला कालाचं बंधनच रहात नाही. एक आदर्श म्हणूनच तिचा गौरव होतो. म्हणजेच एक तर माणसाकडे चांगलं मन हवं, सदाचार हवे, चांगली वृत्ती हवी आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे पैसा हवा. कारण धनाची साथ असेल तर चांगल्या वृत्तींना चांगली दिशा मिळू शकते. इच्छित सत्कृत्ये पार पाडण्यासाठी हे बळ कामी येतं. अर्थात धनाचा अतिरेक आणि विवेकशून्य माणसाच्या हातातील धनाची उपलब्धी त्याला कमालीचा मुजोर, स्वार्थी आणि अहंकारी बनवू शकते ही बाब वेगळी, पण क्षणभर ही बाब बाजूला ठेवून धनाचा विचार करायचा झाल्यास त्याची गरज नजरेआड करुन चालणार नाही. ही गरज, निकड, आवश्यकता इतकी तीव्र आहे की भारतीय संस्कृतीत आपण धनाला देवतास्वरुप मानलं आहे. आपल्याला उपयुक्त ठरणाऱ्या प्रत्येक घटकाला देवत्व देणाऱ्या आणि त्याची मनोभावे पूजा करण्याची शिकवण देणाऱ्या या संस्कृतीने लक्ष्मी आणि कुबेर या धनाच्या देवता मानून त्यांना पूजनीय स्थान दिलं आहे. दिवाळीतील लक्ष्मीपूजन हा मंगल दिवस याच देवतांना वंदन करण्याचा, आराधना करण्याचा. या दिवशी उत्साही आणि आनंदी वातावरणात, भवताल लक्ष ज्योतींनी तेजाळलेलं असताना होणारी लक्ष्मीची पूजा फळाला येते आणि तिचे आशिष मिळतात अशी सांगितलं जातं. म्हणूनच जनलोक या काळोख्या अमावस्येला लक्ष्मीची पूजा करतात आणि तिने आपल्या घरात थांबावं, स्थिर रहावं यासाठी मनधरणी करतात.

लक्ष्मीपूजन करताना सगळे हर्षोल्हासित असतात. लक्ष्मीची पूजा करताना कोणतीही कसूर राहू नये याची दक्षता घेतली जाते. सुशोभित पूजा मांडली जाते. चांदीच्या तबकात घरातील रोकड, दागदागिने, मौल्यवान चीजवस्तू सन्मानपूर्वक ठेवल्या जातात. आता बदलत्या काळानुसार बँकेचं पासबूक, एटीएम कार्ड यांनादेखील या तबकात स्थान मिळताना दिसतंय. धनसंपत्तीशी, ऐश्वर्यसंपन्नेशी संबंधित प्रत्येक चीजवस्तू या दिवशी पूजली जाते. पूजेसाठी पाच फळं, नारळ, सुका मेवा, लाह्या–बत्तासे, पंचपक्वान्न, मिठाई अशी जय्यत तयारी असते. या सर्व धनाची मन:पूर्वक पूजा होते आणि सुगंधी फुलांनी तबक आच्छादलं जातं. समई–निरांजनाच्या मंद प्रकाशात, धूप–उदबत्तीच्या धुरांच्या वलयांमध्ये लक्ष्मीचं हे साजिरं रूप मनभावन दिसतं. लक्ष्मीचे आशीष घेण्यासाठी प्रत्येकजण आतूर असतो. लक्ष्मीपूजन गोरज मुहूर्तावर केलं जात असलं तरी सकाळपासून उत्सवी माहोल असतो.

लक्ष्मीपूजनाच्या दिवशी अभ्यंगस्नानाला विशेष महत्त्व आहे. दिवाळीत दर दिवशी लवकर स्नान केलं जात असलं तरी त्यातही लक्ष्मीपूजनाच्या दिवशी बाहेर फटफटलेलं नसताना गरम पाण्याने स्नान करण्याचा रिवाज अनेक घरांमध्ये पाळला जातो. सुगंधी तेल लावून, औक्षण करुन घरातील पुरुषांच्या आंघोळी उरकल्या की बायकांची फराळाची लगबग सुरू होते. पूर्वी बऱ्याच घरांमध्ये लक्ष्मीपूजनाच्या दिवशी न्याहरीला मुगाच्या डाळीची खिचडी आणि दिवाळीचा फराळ असा फक्कड बेत असायचा. या निमित्ताने आलेल्या पाहुण्याराहुळ्यांच्या पंगती उठायच्या. रांगोळ्यांनी सजवलेल्या ताटात विशेष पक्वान्न वाढले जायचे. कालौघात यातील बरेच रिवाज बदलू लागले असते तरी आजही गल्लीत पहिला आपलाच फटाका लागला पाहिजे असा अनेकांचा अट्टहास असतोच. आजचे तरुणही नवे कपडे घालून देवदर्शनाला जातात. थोरामोठ्यांचे आशीर्वाद घेतात. यानिमित्त साजऱ्या होणाऱ्या दीपोत्सवात सहभागी होतात. अलिकडे लक्ष्मीपूजनाच्या दिवशी 'दिवाळी पहाट' सारख्या कार्यक्रमांना हजेरी लावणाऱ्यांचं प्रमाणही लक्षणीयरित्या वाढत आहे. एकंदरच आबालवृद्ध सकाळपासून लक्ष्मीपूजनाचा आनंद लुटण्यात गर्क असतात.

लक्ष्मीपूजन घरोघरी साजरं होत असलं तरी व्यावसायिक, व्यापारी यांच्यासाठी हा दिवस विशेष महत्त्वाचा आहे. नवीन खतावण्यांचं विधीपूर्वक पूजन हा या वर्गासाठी अत्यंत महत्त्वाचा विधी. आपला व्यवसायात भरभराट होवो, नफा वाढता राहो आणि लक्ष्मीचा कायम वास राहो ही सदिच्छा मनी ठेवत घराबरोबर व्यावसायिक आस्थापनांमध्ये लक्ष्मीची पूजा मांडली जाते. त्या पूजेचा दिमाख तर काही वेगळाच असतो. एकीकडे पूजा सुरू असते तर बाहेर फटाक्यांचा लडी लावून आनंदोत्सव साजरा केला जातो. आलेल्या सर्वांना प्रसादाचं वाटप होतं. लक्ष्मीपूजनाच्या पूजेमध्ये धनसंपत्तीबरोबरच मानाचं स्थान मिळतं ते केरसुणीला. घरातील केरकचरा लोटून परिसर परिमळ करणारी ही केरसुणी यादिवशी लक्ष्मी म्हणून पुजली जाते. हळदी–कुंकू वाहून तिचा सन्मान केला जातो. हेच तर भारतीय संस्कृतीचं श्रेष्ठत्व आहे. इथे सगळ्यांचाच उचित सन्मान होतो. मग तिथे श्रेष्ठ अथवा कनिष्ठ हा भेदाभेद रहात नाही. कृतज्ञतेची भावना सगळ्यांप्रती सारखीच असते. मुख्य म्हणजे ती अत्यंत संयतपणे, शुचिर्भूततेने आणि मंगलमय वातावरणात व्यक्त केली जाते. मंगल वाद्यांच्या गजरात, सुगंधी आणि आल्हाददायक वातावरणात एका सोहळ्याचं स्वरुप देऊन हे विधी संपन्न होतात. म्हणूनच या सणांचं महत्त्व शतपटीने वाढतं.

## चांगल्या लोकांना ओळखायला शिका...

भक्ती मार्ग

आयुष्यात आपण कशाचा तरी शोध घेत असतो. कुणाला सुख हवं असतं तर कुणाला समाधानाची आस असते पण आयुष्यात आनंद आणण्यासाठी चांगल्या लोकांची गरज असते. त्यामुळे चांगल्या लोकांचा शोध घेणं थांबवू नका. सध्याच्या कलियुगात चांगले लोक मिळणं खूप कठीण झालंय. सगळीकडे मतलबी दुनिया दिसून येते. पण प्रत्यक्षात तसं नाही. चांगली माणसं आपल्या आयुष्यात येत असतात. ही माणसं कोणत्या रूपात येतील याचा नेम नाही. तुम्ही कोणत्याही क्षेत्रात असलात तरी



सहकार्य करणारे लोक भेटतातच. वाईट माणसांपासून सावध राहण्याबाबत आपल्याला कायम सांगितलं जातं. यासोबतच चांगल्या लोकांना पारखता आलं पाहिजे. त्यांच्या अस्तित्त्वाचा योग्य तो लाभ घेता आला पाहिजे.

आपल्या आयुष्यात चांगली माणसं पाच मार्गांनी येतात. आपल्या चांगल्यासाठी मोलाचा सल्ला दिला जातो किंवा मत मांडलं जातं. हितचिंतक आपलं वाईट कधीही चिंतणार नाहीत. कामात मदत करायला येणारे लोक असतात. असे लोक आपल्याला सुरक्षा देतात. त्यामुळे त्यांच्यापासून कधीही दूर पळू नका. त्यांच्या जवळ राहा. त्यांच्यासोबत चांगले संबंध प्रस्थापित करा. स्वभावाने चांगली असलेली माणसं फार कमी वेळा व्यक्त होतात. त्यामुळे आपल्यालाच त्यांच्याकडे गेलं पाहिजे. आपल्या मनाला समजवा आणि चांगल्या माणसांकडे वळा. त्यांच्याशी बोला. चांगल्या माणसांसोबत हृदय आणि बुद्धीने स्वत:ला जुळवून घ्या. नंतर मनाचा विचार करा. मनातल्या शंका दूर सारून लोकांच्या जवळ जा. चांगल्या लोकांचा लाभ घ्या.

## प्रेमभाव वाढण्यासाठी...

वास्तु भक्ती

कुटुंबातल्या प्रत्येक सदस्यात प्रेमभाव, आपुलकी असावी असं आपल्याला वाटत असतं. पण काही कारणांमुळे एकमेकांमध्ये वैमनस्य निर्माण होतं. काही वादाचे प्रसंग निर्माण होतात. फेंगशुई टिप्सच्या मदतीने कुटुंबात आनंद निर्माण करता येतो.

✽ घराच्या पश्चिम–दक्षिण कोपऱ्यात क्रिस्टलचा गोळा लावता येईल. त्यात लाल बल्ब लावा.

✽ पलंग खिडकीला चिकटवून ठेऊ नका. खिडकी आणि पलंगात थोडं अंतर ठेवा. पलंग खिडकीला चिकटलेला असेल तर एकमेकांमध्ये वैरभाव निर्माण होतो. गैरसमज पसरतात. घरात जागा नसेल तर खिडकीला पडदा लावा. यामुळे नकारात्मक ऊर्जा घरात येणार नाही.

✽ नवीन लग्न झालेल्या जोडप्याचा पलंगही नवा असला पाहिजे. हे शक्य नसेल तर पलंगावर घातल्या जाणाऱ्या चादरीला छिद्र असू नये.

✽ पलंगासमोर आरसा लाऊ नका. तुमच्या पलंगाचं प्रतिबिंब दिसता कामा नये. यामुळे नात्यांमध्ये दुरावा निर्माण होतो आणि झोपेशी संबंधित तक्रारी निर्माण होऊ शकतात. हे शक्य नसेल तर आरशावर पडदा टाकून ठेवा.

✽ शयनगृहात टिव्ही किंवा कोणतंही गॅझेट ठेऊ नका. यातल्या तरंगाचा परिणाम आपल्या शरीरावर होतो. टिव्ही किंवा



कॉम्प्युटर ठेवला असेल तर झाकून ठेवा.

✽ कुटुंबातल्या सदस्यांमध्ये प्रेम निर्माण करण्यासाठी घराच्या दक्षिण आणि पश्चिम कोनात काच किंवा सिरॅमिक पॉटमध्ये छोटे छोटे दगड किंवा क्रिस्टल घालून लाल रंगाच्या मेणबत्त्या लावा. यामुळे सकारात्मक ऊर्जेची निर्मिती होईल.

## इथे जळते अखंड ज्योत...

तीर्थक्षेत्र

मंदिर छोटं असो की मोठं, लोकांच्या मनात श्रद्धा आणि आदरभाव असतो. पण काही मंदिरांचं वैशिष्ट्य असतं. मंदिरांमध्ये चमत्कार घडत असतात. या चमत्कारांमुळे अशा मंदिरांमध्ये भक्तांची गर्दी झाल्याचं आपल्याला पहायला मिळतं. भारतात काही मंदिरांमध्ये अखंड ज्योत जळत असल्याचं पहायला मिळतं. यामागचं रहस्य अजूनही उघड झालेलं नाही. अशाच काही मंदिरांबद्दल जाणून घेऊ या.


✽ हिमाचल प्रदेशातल्या ममलेश्वर महादेव मंदिरात अशीच ज्योत जळत आहे. या ठिकाणी एक अग्निकुंड आहे. या ठिकाणी पाच शिवलिंगं असून त्यांची स्थापना पांडवांनी केली असल्याचं बोललं जातं. पाच हजार वर्षांपूर्वी पांडवांनी या कुंडात अग्नी पेटवला होता. त्या क्षणापासून ज्योत विझलेली नाही.

✽ उत्तराखंडमधल्या रूद्रप्रयाग जिल्ह्यात त्रियुगी नारायणाचं मंदिर आहे. या ठिकाणी एक अग्निकुंड असून शिव–पार्वतीच्या विवाहासाठी हे अग्निकुंड प्रज्वलित करण्यात आलं होतं, असं मानलं जातं. सत्ययुगापासूनच या कुंडात आग जळत असल्याचं मानलं जातं.

✽ वृंदावनच्या श्रीराधारमण मंदिरातही अखंड ज्योत जळते आहे. ही ज्योत तामिळनाडूतल्या श्रीरंगम मंदिरातून इथे आल्याचं बोललं जातं. चैतन्यमहाप्रभूंचे भक्त ही ज्योत इथे घेऊन आले आणि अजूनही ती विझलेली नाही.

✽ आसाममध्ये कामाख्या देवीचं मंदिर आहे. इथे एक ज्योत जळत असून ती नैसर्गिक असल्याचं मानलं जातं. ही ज्योत म्हणजे देवी असल्याचं मानलं जातं.





## शिवाचा नाही अंत!

जाणून घ्या

भगवान शिवाला आदी आणि अंत नाही असं मानलं जातं. ऋग्वेदातल्या नासदीय सूक्तातल्या दहाव्या अध्यायातल्या १२९ व्या सूक्तात शिवलिंगाचा संबंध ब्रह्मांडाच्या उत्पत्तीशी असल्याचं नमूद करण्यात आलंय. शिवलिंग हे शंकराचं आदी आणि अनादी स्वरूप आहे. शून्य, आकाश, अनंत, ब्रह्मांड आणि निराकार परमपुरूषाचं प्रतिक असल्यामुळे शंकराच्या प्रतिकाला शिवलिंग म्हटलं जातं. आकाश हे स्वयंलिंग असल्याचा उल्लेख स्कंद पुराणात आढळतो. पृथ्वी आधार असून या सगळ्याची उत्पत्ती अनंत शून्यातून झाल्याचं मानलं



जातं. लय असल्याने याला लिंग असं म्हटलं जातं. हिंदू पुराणांमध्ये शिवलिंगाला वेगवेगळ्या नावांनी संबोधित केलं जातं.


शंकराला आदी किंवा अंत नसल्याचं विद्येश्वर संहितेत नमूद करण्यात आलंय. त्यामुळे शंकराचं अस्तित्त्व अनादी अनंत काळापर्यंत राहणार असल्याचं म्हटलं जातं. शिव निराकार आहे पण शिवलिंग हे शिवाचं निराकार रूप मानलं जातं. त्यामुळे शिवलिंग पूजनाचं महत्त्व आहे. पौराणिक ग्रंथांमध्ये शिवलिंगाविषयी विस्ताराने सांगण्यात आलंय. हडप्पा आणि मोहेंजोदडो संस्कृतीत शिवलिंगाची पूजा होत असल्याचे पुरावे सापडले आहेत. त्यामुळे शिवाची पूजा अनादी आणि अनंत काळापासून होत असल्याचं दिसून येतंय.

## ध्यान सकारात्मकतेचं...

बोध

ध्यान ही मानवी जीवनातली अत्यंत महत्त्वाची बाब मानली जाते. ध्यान ही एक प्रक्रिया आहे. भारतीय संस्कृतीत ध्यानधारणेला प्रचंड महत्त्व देण्यात आलंय. ध्यानाला आपण मुक्तीमार्ग मानतो. ध्यानामुळे आपण परमेश्वरप्राप्ती करू शकतो. ध्यानामुळे संसारातल्या प्रत्येक गोष्टीपासून आपल्याला मुक्ती मिळते. ध्यानामुळे मन एकाग्र होतं. इंद्रियांवर ताबा मिळवणं शक्य होतं. ध्यानामुळे माणसाची इंद्रियं मनाशी, मन बुद्धीशी आणि बुद्धी आत्म्याशी एकरूप होतं. ध्यानामुळे दिव्यत्त्वाची प्रचिती येते. ही प्रचिती आली की सगळी सृष्टी सुंदर आणि प्रेममय भासू लागते. म्हणूनच तपस्वी, ऋषीमुनी प्रत्येकाने ध्यान केलं. ध्यानामुळे त्यांची सृष्टीशी ओळख झाली.

ध्यानामुळे माणूस संसारातली सगळी दु:खं विसरतो आणि संसाराच्या उद्धारासाठी काम करू लागतो. ध्यानामुळे माणूस वाईट गोष्टींपासून दूर जातो. मन थाऱ्यावर आल्याने चुकीच्या गोष्टींना दूर सारलं जातं. त्यामुळे शक्य तिथे आणि शक्य तेव्हा माणसाने ध्यान केलं पाहिजे. दिवसभरातला काही काळ ध्यानाला दिला पाहिजे. शरीर आणि मनापासून दूर झाल्याने आपण सुखाची प्राप्ती करू शकतो. शरीर आणि मनाच्या गरजा हे दु:खाचं मुख्य कारण असतं. आपण मन आणि शरीराने निश्चल होणं गरजेचं असतं. ध्यानामुळे सर्व विकारांचा नाश होतो. ध्यानातलं गांभीर्य माणसाच्या चारही बाजूंना सकारात्मक ऊर्जेची निर्मिती करतं. ही सकारात्मक ऊर्जा मनुष्याला सतत प्रेरणा देत राहते. परोपकार करण्याविषयी सुचवत राहते. ध्यान करताना सकारात्मक बाबींचा विचार करा. नकारात्मक विचारांमुळे आपण नकारात्मकतेकडे झुकूलागतो. विचारांमध्येही अनोखी शक्ती असते. या शक्तीचा वापर करा.




## स्वस्तिकाविषयी...

धर्म देशोदेशीचे

प्रत्येक धर्माशी संबंधित पवित्र चिन्ह असतं. सनातन धर्माचं पवित्र चिन्हं म्हणजे स्वस्तिक. पूर्वीचा सनातन धर्म म्हणजे आजचा हिंदू धर्म. स्वस्तिकाचा वापर हिंदूधर्मीयांसह बौद्ध आणि जैन धर्माचे अनुयायीही करतात. इतिहासात डोकावून पाहिलं तर सिंधू नदीच्या किनारी सनातन धर्म बहरला, फुलला. या परिसरात केलेल्या खोदकामातून स्वस्तिक काढलेल्या अनेक वस्तू मिळाल्या आहेत. म्हणजे स्वस्तिक चिन्हाचा वापर गेल्या अनेक वर्षांपासून केला जातोय. मध्य आशियातल्या काही देशांमध्येही स्वस्तिक चिन्हाचं महत्त्व आहे. या देशांमध्ये स्वस्तिक म्हणजे मांगल्य आणि सौभाग्याचं प्रतिक मानलं जातं. नेपाळमध्ये हेरंब, इजिप्तमध्ये अॅक्टोन आणि म्यानमारमध्ये महापियेन्ने या नावाने स्वस्तिक ओळखलं जातं. ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडमधले मावरी आदिवासी स्वस्तिकाला मांगल्याचं चिन्हं समजतात.

स्वस्तिकाला गणपतीचं प्रतिक मानलं जातं. श्रीहरी विष्णू आणि सूर्याचं आसन म्हणजे स्वस्तिक असंही म्हणतात.



बौद्ध धर्मात बुद्धाच्या हृदयाच्या स्थानी स्वस्तिक काढलेलं आढळून येतं. पूर्वीचा मेसापोटेमिया म्हणजे आजचा इराक. मेसापोटेमियात युद्धानंतर अस्त्रशस्त्रांवर स्वस्तिकाचं चिन्हं काढून विजय साजरा केला जात असे. स्वस्तिक हा संस्कृत शब्द आहे. स्वस्तिकाचा अर्थ मांगल्य किंवा प्रसन्नता. वास्तूशास्त्रानुसार स्वस्तिकात चार दिशा असतात. त्यामुळे हिंदू धर्मात मंगलप्रसंगी स्वस्तिक काढलं जातं. स्वस्तिकाचा मंत्र जपल्याने मनोमिलन होतं. दुरावलेली नाती जवळ येतात असं मानलं जातं.

वास्तुशांतीदरम्यान स्वस्तिक मंत्र म्हणून कमंलडूतलं जल शिंपडलं जातं. ही प्रक्रिया अत्यंत शुभ मानली जाते.




## मोदी, शहा, योगी, गडकरी, फडणवीस, बावनकुळेसह अनेकांचा समावेश

# भाजपचे ४० स्टार प्रचारक जाहीर

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २६ :** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाच्या वतीने ४० स्टार प्रचारकांची यादी जाहीर करण्यात आली आहे. या यादीमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शहा, नितीन गडकरी, योगी आदित्यनाथ, देवेंद्र फडणवीस यांच्याबरोबरच नवनीत राणा यांच्या नावाचा देखील समावेश करण्यात आला आहे. या यादीमध्ये नवनीत राणा यांच्याबरोबरच स्मृती इराणी आणि पंकजा मुंडे यांना देखील स्थान देण्यात आले आहे.

भारतीय जनता पक्षाच्या वतीने स्टार प्रकारांच्या यादीमध्ये पक्षाचे प्रमुख नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी, पक्षाचे अध्यक्ष जगत प्रकाश नड्डा, केंद्रीय मंत्री राजनाथ सिंग, अमित शहा, नितीन गडकरी यांच्यासोबतच भाजपशासित राज्यांचे मुख्यमंत्री तसेच राज्यातील प्रमुख नेते देवेंद्र फडणवीस,



चंद्रशेखर बावनकुळे, रावसाहेब दानवे, नारायण राणे, पियुष गोयल, अशोक चव्हाण, चंद्रकांत पाटील, आशिष शेलार, पंकजा मुंडे, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे पाटील, गिरीश महाजन, रविंद्र चव्हाण यांचा देखील समावेश केला आहे. याचबरोबर नव्याने केंद्रत मंत्री झालेले मुरलीधर मोहोळ यांना देखील या यादीमध्ये स्थान देण्यात आले आहे.

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने नवनीत राणा यांना अमरावती मतदारसंघातून उमेदवारी दिली होती. मात्र, त्यांचा पराभव झाला. नवनीत राणा या हैदराबाद येथे देखील भाजपचा प्रचार करण्यासाठी पोहोचल्या होत्या. आता महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत देखील नवनीत राणा या भारतीय जनता पक्षाच्या स्टार प्रचारक असतील.

लोकसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान नवनीत राणा यांनी केलेल्या मुस्लिम समाजाबद्दलच्या वक्तव्यामुळे चांगलाच वाद निर्माण झाला होता. त्यामुळे आता विधानसभा निवडणुकीत देखील नवनीत राणा यांच्या वक्तव्यांकडे सर्वांचे लक्ष असणार आहे.

| | |
|---|---|
| नरेंद्र मोदी | अश्विनी वैष्णव |
| जगत प्रकाश नड्डा | नारायण राणे |
| राजनाथ सिंह | पीयूष गोयल |
| अमित शहा | ज्योतिरादित्य सिंधिया |
| नितीन गडकरी | रावसाहेब दानवे |
| योगी आदित्यनाथ | अशोक चव्हाण |
| डॉ. प्रमोद सावंत | उदयनराजे भोंसले |
| भूपेंद्रभाई पटेल | विनोद तावडे |
| विष्णू देव साई | ॲड. आशिष शेलार |
| डॉ. मोहन यादव | पंकजा मुंडे |
| भजनलाल शर्मा | चंद्रकांत पाटील |
| नायब सिंह सैनी | सुधीर मुनगंटीवार |
| हिमंता बिस्वा सरमा | राधाकृष्ण पाटील |
| शिवराज सिंह चौहान | गिरीश महाजन |
| देवेंद्र फडणवीस | रवींद्र चव्हाण |
| चंद्रशेखर बावनकुळे | स्मृती इराणी |
| शिवप्रकाश | प्रवीण दरेकर |
| भूपेंद्र यादव | अमर साबळे |
| | मुरलीधर मोहोळ |

# मविआच्या दुसऱ्या यादीत काही नवे चेहरे, नव्यांनाही संधी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६ :** महाविकास आघाडीतील काँग्रेस, शरद पवार राष्ट्रवादी आणि उबाठा शिवसेना या तीन पक्षांनी त्यांच्या उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली. या यादीत तिन्ही पक्षांनी अनेक जुन्या उमेदवारांना संधी दिली असली तरी काही नवीन चेहऱ्यांचा समावेश केला आहे.

### उबाठा शिवसेना

धुळे शहर- अनिल गोटे
चोपडा - राजू तडवी
जळगाव शहर- जयश्री महाजन
बुलडाणा- जयश्री शेळके,
दिग्रस- पवन श्यामलाल जयस्वाल
हिंगोली- रूपाली राजेश पाटील
परतूर- आसाराम बोराडे
देवळाली - योगेश घोलप
कल्याण पश्चिम- सचिन बासरे
कल्याण पूर्व - धनंजय बोडारे
वडाळा- श्रद्धा श्रीधर जाधव
शिवडी- अजय चौधरी
भायखळा- मनोज जामसुतकर
श्रीगोंदा- अनुराधा राजेंद्र नागावडे
कणकवली- संदेश भास्कर पारकर
वर्सोवा - हरुन खान
घाटकोपर पश्चिम - संजय भालेराव
विलेपार्ले - संदीप नाईक

### राष्ट्रवादी शरद पवार गट

सतीश अण्णा पाटील - एरंडोल
सतीश चव्हाण - गंगापूर
पांडूरंग वरोरा - शहापूर
राहुल मोटे - परांडा
संदीप क्षीरसागर - बीड
मयुरा काळे - आर्वी
दीपिका चव्हाण - बागलाण
माणिकराव शिंदे - येवला
उदय सांगळे - सिन्नर
सुनीत चारोसकर - दिंडोरी
सचिन दोडके - खडकवासला
गणेश गीते - नाशिक पूर्व
ओमी कलाणी - उल्हासनगर
सत्यशिल शेलकर - जुन्नर
सुलक्षणा शिलवंत - पिंपरी
अश्विनी कदम - पर्वती
अमित भांगरे - अकोले
उत्तम जानकर - माळशिरस
दीपक चव्हाण - फलटण
नंदिनी बाभूळकर - चंदगड
मदन कारंडे - इचलकरंजी
अ. कळंबकर - अहिल्यानगर

### काँग्रेस पक्ष

डॉ. राजेश मानवतकर - भुसावळ
डॉ. स्वाती वाकेकर - जळगाव (जामोद)
महेश गांगणे - अकोट
शेखर शेंडे - वर्धा
अनुजा सुनील केदार - सावनेर
गिरीश पांडव - नागपूर दक्षिण
सुरेश भोयर - कामठी
पूजा ठवकर - भंडारा
दिलीप बनसोड - अर्जुनी - मोर.
राजकुमार पुराम - आमगाव
प्रो. वसंत पुरके - राळेगाव
अनिल मंगुळकर - यवतमाळ
जितेंद मोघे - आर्णी
साहेबराव कांबळे - उमरखेड
कैलास गोरंट्याल - जालना
मधुकर देशमुख - संभाजीनगर पूर्व
विजय गोविंद पाटील - वसई
काळू बधेलिया - कांदीवली पूर्व
यशवंत सिंह - चारकोप
गणेश यादव - सायन कोळीवाडा
हेमंग ओगळे - श्रीरामपूर
अभयकुमार साळुंखे - निलंगा
गणपतराव पाटील - शिरोळ

# भाजपाच्या दुसऱ्या यादीत २२ उमेदवारांचा समावेश

### पडळकरांना संधी डॉ. होळीला डच्चू

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २६ :** भाजप पक्षाकडून दुसरी यादी जाहीर करण्यात आली आहे. या यादीत २२ उमेदवारांचे नावे जाहीर करण्यात आली आहे.

विदर्भातील गडचिरोली या अनु . जमाती प्रवर्गासाठी राखीव मतदारसंघातून विद्यमान आमदार डॉ . देवराव होळी यांना तिकीट नाकारण्यात आले आहे . डॉ . देवराव होळी हे उमेदवारी मिळावी म्हणून मुंबई, दिल्लीच्या वाऱ्या करीत होते . तथापि, डॉ . होळी यांच्या विविध प्रसंगी विचित्र वक्तव्यांमुळे आणि अन्य कारणांमुळे त्यांना उमेदवारी नाकारण्यात आल्याचे सांगण्यात येते . डॉ . देवराव होळी यांच्या जागी आता डॉ . मिलींद नरोटे यांची वर्णी लागली आहे .

चंद्रपूर जिल्ह्याच्या राजूरा विधानसभा मतदारसंघातून देवराव भोंगळे यांना तर ब्रम्हपुरीमधून कृष्णलाल सहारे यांना भाजपाकडून उमेदवारी देण्यात आली आहे.

1. पुणे छावणी - सुनील कांबळे
2. कसबा - हेमंत रासने
3. लातूर ग्रामीण - रमेश कराड
4. उल्हासनगर - कुमार आयलानी
5. शिराळा - सत्यजित देशमुख
6. धुळे ग्रामीण - राम भदाणे
7. मलकापूर - चैनसुख संचेती
8. अकोला प. - विजय अग्रवाल
9. ब्रह्मपुरी - कृष्णलाल सहारे
10. वाशिम - श्याम खोडे
11. खडकवासला - भीमराव तापकीर
12. जत - गोपीचंद पडळकर
13. अकोट - प्रकाश भारसाखले
14. मेळघाट - केवलराम काळे
15. नाशिक मध्य - देवयानी फरांदे
16. पंढरपूर - समाधान आवताडे
17. वरोरा - करण देवतळे
18. विक्रमगड - हरिश्चंद्र भोये
19. सोलापूर मध्य - देवेंद्र कोठे
20. राजुरा - देवराव भोंगळे
21. गडचिरोली - मिलिंद नरोटे
22. पेन - रवींद्र पाटील

## विदर्भ आणि मराठवाड्यावर संभाजी ब्रिगेडचे विशेष लक्ष

■ **वृत्तसंस्था, जालना, दि. २६ :** शिवसेना ठाकरे गटाचा पाठिंबा काढल्यानंतर आता संभाजी ब्रिगेड राज्यातील 40 ते 50 जागा लढविणार असून त्यात मराठवाडा व विदभार्तील जागांवर विशेष लक्ष राहणार असल्याची माहिती संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष मनोज आखरे यांनी दिली.

आखरे यांनी सांगितले की, शिवसेना ठाकरे गटाने संभाजी ब्रिगेडचा विश्वासघात केल्यानंतर आम्ही आता अधिक सावध झालो आहोत. राजकारणात आम्ही सावध पवित्रा घेत विधानसभेच्या 40 ते 50 जागा लढविण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये प्रामुख्याने मराठवाड्याच्या जागांसह विदर्भातील जागांचा समावेश असून त्यानंतर इतर ठिकाणाच्या जागांचा समावेश आहे. संभाजी ब्रिगेडकडून विधानसभा निवडणुक लढविण्यासाठी इच्छुकांकडून माहिती घेतली जात असल्याचेही ते म्हणाले.

महासागर
२०२४
दिवाळी विशेषांक
■ **राजकारण** : डॉ. भालचंद्र कांगो, भागा वरखडे, भाष्कर खंडागळे यांचे विश्लेषण
■ **आरोग्य : आरोग्यापुढचे धोके आणि वाढते अनारोग्य**
डॉ. सतिश सोनवणे, डॉ. अभिजीत वैद्य, डॉ. संपत केदारे, डॉ. कुंदन गायकवाड, प्रा. शिला गाडे, डॉ. राकेश शेट्टी यांची अत्यंत उद्बोधक माहिती.
**पैसा नेमका किती हवा?** पैशाचे महत्व विशद करणारा परिसंवाद
■ **पर्यावरण : निसर्ग सूड उगवतो काय?**
डॉ. मधुकर पाचुलकर, पर्यावरण तज्ज्ञ, वैजयंती कुळकर्णी, पर्यावरण अभ्यासक, डॉ. किरण कुळकर्णी, पर्यावरण तज्ज्ञ यांची अभ्यासपूर्ण माहिती.
■ **ग्राहक** : ग्राहकांना सावधान करणारा श्रीराम झंवर यांचा अभ्यासपूर्ण लेख
**: मधल्या पिढीच्या समस्या :** मेघा ईनामदार, स्वाती पेशवे
**: मराठी गझलेतील नवी वळणे :** गझलकार भुषण कटककर
**राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची शंभरी** : वासुदेव कुळकर्णी यांचा वाचनीय लेख
**: मराठा आरक्षणाचा प्रश्न आणि रोजगाराचे संकट :** वरिष्ठ पत्रकार मिलींद किर्ती यांचे विश्लेषण
४ वाचनीय कथा
:मुल्य: रू.१२५/-
■ भरगच्च आणि दर्जेदार साहित्याचा नजराणा ■
वितरकांनी आपली मागणी आजच नोंदवावी, जेणेकरून तेवढ्या प्रती पाठविता येतील.
पुरण शुंकर ८८८८६४७७५३

# आमच्या मुलींकडे चुकीच्या नजरेने पहाल तर...



■ यशोमती ठाकूर यांचा गृहमंत्र्यांना इशारा
■ थोरातांच्या कन्येविरोधात आक्षेपार्ह विधान
■ देखमुखांवर गुन्हा : सूजय विखेंना





राजकारणात आपण भाषण करतो, लोकशाहीमध्ये मत मतांतर असतात. मत मांडण्याचा अधिकार लोकशाहीनं दिला आहे. परंतु पूर्वीच्या वेळी एक दर्जा राखला जायचा, आता मात्र पातळी अत्यंत खालावली आहे. सुजय विखे हे संगमनेर तालुक्यातील आहेत, बोलण्याचा त्यांचा अधिकार आहे. मात्र भाषण कोण करतंय आणि काय करतंय हे पाहिलं पाहिजे. हे अत्यंत गलिच्छ आहे जयश्री संदर्भात त्यांनी जे वक्तव्य केलं. त्याचा मी निषेध करतो असं थोरात यांनी म्हटलं आहे.

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २६ :** काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात यांच्या कन्या जयश्री थोरात यांच्या विरोधात भाजप नेते वसंतराव देशमुख यांनी आक्षेपार्ह विधान केल्यानंतर आता वातावरण चांगलंच तापलं आहे. या प्रकरणावरून काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर यांनी भाजपवर जोरदार हल्लाबोल करताना फडणवीसांना इशारा दिला आहे. आमच्या मुलींकडे चुकीच्या नजरेने पहाल तर याद राखा असं यशोमती ठाकूर यांनी म्हटलं आहे.

बाळासाहेब थोरात यांच्या कन्या जयश्री थोरात यांच्या विरोधात भाजप नेते वसंतराव देशमुख यांनी वादग्रस्त वक्तव्य केले. सुजय विखे यांच्यासमोर भाजपच्या स्टेजवर भाजपच्या एका व्यक्तीने बाळासाहेब थोरात यांच्या कन्येबद्दल वादग्रस्त वक्तव्य केले हे विखे आणि फडणवीस यांना पटतं का? असा सवाल यशोमती ठाकूर यांनी उपस्थित केला आहे.

ज्यांनी महिलांना प्रोटेक्शन करून आमदारकी घेतली आहे ते आता झोपले आहेत का? यामधून महिलांप्रती आरएसएस आणि भाजपची काय मानसिकता आहे हे दिसून येत आहे. त्यामुळे ज्यांनी ज्यांनी हे वक्तव्य केले त्यांच्यावर गुन्हे दाखल झाले पाहिजे, अशी मागणी यशोमती ठाकूर यांनी केली आहे. काँग्रेसच्या अन्य नेत्यांनी भाजपावर तोफ डागली आहे.

दरम्यान, वसंतराव थोरात यांच्या आक्षेपार्ह विधानाची राज्य महिला आयोगाने दखल घेतली आहे. अहिल्यानगर पोलिसांना पत्र लिहून कारवाई करण्याचे निर्देश राज्य महिला आयोगाने दिले आहेत. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी कारवाई करण्याचे आदेश दिलेत.

भाऊसाहेब थोरात यांची नात... ती तर बोलती म्हणत्यात... माझा बाप सगळ्याचा बाप... काही कळत नाही. तुला सुद्धा पोरं कशी झाले हा प्रश्न आहे. आपल्या कन्येला समजवा. नाहीतर आम्ही जर निवडणूक काळात मैदानात उतरलो तर तुमची मुलगी घराबाहेर पडू शकणार नाही. तिला सुजय दादा प्रेमाने ताई म्हणतात. दादा, या ताईचे पराक्रम जर पाहिले नाङ्ग सगळ्या तालुक्याला माहिती आहेत, असं वसंतराव देशमुख स्टेजवरून म्हणालेत. त्यांच्या या वक्तव्यावरून वाद पेटला आहे.




## नागपूर दक्षिणमधून पुन्हा मते विरूद्ध पांडव

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २६ :** विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसने त्यांच्या उमेदवारांची दुसरी यादी शनिवारी जाहीर केली असून, नागपूर दक्षिण मतदारसंघातून गिरीश पांडव यांना पुन्हा संधी दिली आहे. येथून भाजपाने विद्यमान आमदार मोहन मते यांचे नरव आधीच जाहीर केले असल्याने, नागपूर दक्षिणमध्ये पुन्हा गेल्या वेळेप्रमाणेच मते विरूद्ध पांडव असा सामना पाहायला मिळणार आहे.

२०१९ च्या निवडणुकीत काँग्रेसचे गिरीश पांडव हे मते यांच्याकडून अवघ्या ४ हजार मतांनी पराभूत झाले होते. मात्र, यावेळी नव्या दमाने उतरण्यासाठी त्यांनी कंबर कसली असून, ही लढत अटीतटीची होणार आहे.

# राजपुत्र अमित ठाकरेंसाठी शिवसेना शिंदे गटाची फिल्डिंग

## सदा सरवणकरांचा पत्ता कापणार?

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६ :** विधानसभा निवडणुकीचं बिगूल वाजलं आहे. सध्याची राजकीय परिस्थिती पाहाता यावेळी विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडी विरोधात महायुती असाच सामना रंगणार असल्याचं चित्र आहे.

मात्र, या निवडणुकीत मनसेनं देखील उडी घेतली आहे. मनसेकडून आपल्या उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली आहे. त्यामुळे या निवडणुकीत आणखी चूरस निर्माण होण्याची शक्यता आहे. मनसेनं जाहीर केलेल्या उमेदवारांच्या पहिल्याच यादीमध्ये अमित ठाकरे यांच्या नावाचा समावेश आहे, ते माहिम विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवणार आहेत.

दरम्यान, दुसरीकडे याच मतदारसंघातून शिवसेना शिंदे गटाचे नेते सदा सरवणकर हे निवडणुकीच्या रिंगणात आहेत, त्यामुळे या मतदारसंघात मनसे आणि शेवसेनेमध्ये काटे की टक्कर होऊ शकते असे वाटत असतानाच मोठा ट्विस्ट आला आहे.

मनसे नेते अमित ठाकरे यांच्यासाठी आता शिवसेनेचे नेते ॲक्शन मोडमध्ये आल्याचं पाहायला मिळत आहे. शिवसेनेचे नेते आणि मंत्री दिपक केसरकर यांनी आज सकाळीच मनसेप्रमुख राज ठाकरे यांची भेट घेतली आहे. त्यानंतर त्यांनी सदा सरवणकर यांची देखील भेट घेतली.

या भेटीनंतर चर्चेला उधाण आलं आहे, सदा सरवणकर यांना अमित ठाकरे यांच्यासाठी माघार घेण्यास शिवसेना भाग पाडणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

अमित ठाकरेंसाठी भाजपकडून शिवसेनेची मनधरणी सुरू आहे. तर शिवसेना नेंत्याकडून सदा सरवणकर यांची मनधरणी करण्यात येणार असल्याची चर्चा आहे. दीपक केसरकर यांनी आज राज ठाकरे यांची भेट घेतली, या भेटीनंतर त्यांनी सरवणकर यांची देखील भेट घेतली आहे.

सदा सरवणकर यांना या मतदारसंघातून माघार घेण्यास शिवसेना भाग पाडणार असल्याची माहिती सुत्रांकडून मिळत आहे. मात्र अमित ठाकरेंसाठी सदा सरवणकर जागेचा त्याग करणार का? हे पाहाणं महत्त्वाचं ठरणार आहे.

वरळीमध्ये 2019 ला आदित्य ठाकरेंविरोधात राज ठाकरे यांनी उमेदवार दिला नव्हता. आताही एकनाथ शिंदे यांच्याविरोधात मनसेनं उमेदवार दिलेला नाही. त्यामुळे आता शिवसेनेकडून सरवणकर यांची मनधरणी सुरू असल्याची माहिती समोर येत आहे. सदा सरवणकर गेली अनेक वर्ष माहिम विधानसभेचे आमदार आहेत. त्यामुळे आता अमित ठाकरे यांच्यासाठी ते माघार घेणार का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. दरम्यान, अमित ठाकरे हे आमच्या घरातील तरूण असून, महायुतीच्या सर्व पक्षांनी त्यांना पाठिंबा द्यावा, अशी मागणी भाजपाचे ॲड. आशिष शेलार यांनी केली आहे.

**सध्या आपण अतिसंवेदनशील झालो आहोत. सोशल मीडिया, समाज, राजकारण, जातीपाती या सगळ्या माध्यमांमधून अतिसंवेदनशीलतेचे हे चित्र स्पष्ट होते. म्हणूनच या दिवाळीच्या निमित्ताने आपण 'बॅक टू बेसिक' जाण्याचा प्रयत्न करावा असे वाटते. पूर्वीचे जगणे अगदी साधे होते. पण लाईफस्टाईलच्या नादात आपण सगळ्याच बाबतीत वेगळीकडे गेलो आहोत. दिवाळीत तरी थोडे थांबू या आणि एकमेकांचा हात धरू या.**

# ही दिवाळी एकमेकांना जपण्याची

दिवाळी विशेष

**संकर्षण कऱ्हाडे**

प्रसिध्द अभिनेता

दीपावलीचे पर्व आनंद घेऊन आले आहे. प्रत्येकच दिवाळी सगळ्यांसाठी पर्वणी असते. मला दीपावलीचे साजरीकरण खूप आवडते. यंदाच्या दिवाळीने तर मला खूप व्यस्त ठेवले आहे. हे सगळेच दिवस भरगच्च कार्यक्रमांनी सजलेले आहेत. 'दिवाळी पहाट'चे जवळपास ११ कार्यक्रम करत असल्याचा एक कलाकार म्हणून होणारा आनंद खूप मोठा आहे. मुख्य म्हणजे या कार्यक्रमांच्या निमित्ताने मला आनंद भाटे, राहुल देशपांडे, जयतीर्थ मेवुंडी, आरतीताई अंकलीकर यांच्यासारख्या दिग्गजांबरोबर तसेच तरुण पिढीतील आर्या आंबेकर, प्रियांका बर्वे, सन्मिता धापटे-शिंदे अशा सगळ्यांबरोबर काम करण्याची, स्टेज शेअर करण्याची संधी मिळत आहे. पुणे, नागपुर, बोरिवली, ठाणे अशा विविध शहरांमध्ये पार पडणारे हे कार्यक्रम माझ्यासारख्या कलाकाराला सुखावून जाणारे आहेत. शेवटी दिवाळी हा समृद्धता आणि संपन्नतेचा सण आहे आणि व्यस्त राहिल्याखेरीज कलाकाराला ती मिळत नाही. तेव्हा यंदाच्या दिवाळीने व्यस्त ठेवण्याचा प्रयत्न केला आहे, असे म्हणून मी या व्यस्ततेचे मनापासून स्वागत करतो. कारण ती मिळवण्यासाठीच माझ्यासारखे अनेकजण मुंबईत येत असतात. तेव्हा वैयक्तिकदृष्ट्या सांगायचे तर ही दिवाळी अशी लगबगीची आणि अभिव्यक्तीचे अपूर्व समाधान देणारी आहे.

दुसरीकडे, स्वत:च्या परिघाबाहेर जाऊन विचार करता या देखण्या सणाचे अनेक कंगोरे दिसतात. पूर्वी दिवाळीत मोठ्या प्रमाणावर फटाके उडवले जायचे. आता त्याचे प्रमाण कमी झाले असले तरी संपलेले नाही. खरे सांगायचे तर, दिवाळीत दारु उडवण्यामागील कारणच एकदाचा मनातल्या बारुदाचा निचरा करणे, हे आहे. एकदा मनातील निराशेचा, क्षोभाचा, नकारात्मतेचा फटाका फुटला; मोठा आवाज झाला की नंतर पणतीसारखे शांत तेवत रहावे, असे मला वाटते. सध्या आपण आयुष्याकडे नानाविध कोनांमधून पाहतो. नानाविध तर्क लावतो. राजकारणामुळे म्हणा वा अन्य गोष्टींमुळे, सध्या वातावरण अतिशय संवेदनशील झाले आहे. कोणत्याही गोष्टीविषयी एखादे मत मांडले आणि त्यामुळे ठराविक लोकांच्या भावना दुखावल्या तर ते आपल्याबरोबरच समाजासाठीही अतिशय त्रासदायक ठरु शकते. म्हणूनच आपणा सर्वांनी, समाजाने ही दिवाळी संवेदनशीलतेची दिवाळी म्हणून साजरी करायला हवी. ही दिवाळी कोणालाही न दुखवता, कोणाविरुद्ध काही चुकीचे न बोलता, कोणालाही त्रास होईल असे न वागता एकमेकांना जपण्याची असायला हवी, असे समाजाचा एक घटक या नात्याने प्रामाणिकपणे वाटते. हा एकमेकांना त्रास देण्याचा काळ नाही. आपण सगळेच वेगवेगळ्या बाबतींमध्ये संवेदनशील झालो असून सोशल मीडिया, समाज, राजकारण, जातीपाती या सगळ्या माध्यमांमधून अतिसंवेदनशीलतेचे हे चित्र स्पष्ट होते.

या दिवाळीच्या निमित्ताने आपण 'बॅक टू बेसिक' जाण्याचा प्रयत्नही करावा. पूर्वीचे जगणे अगदी साधे होते. पण लाईफस्टाईलच्या नादात आता आपण सगळ्याच बाबतीत फार पुढे आलो आहोत. याचा परिणाम म्हणजे सगळ्याच गोष्टींचा चिकित्सक अभ्यास करायला शिकलो आहोत. अगदी साधे उदाहरण घ्यायचे तर आजी-आजोबांच्या काळात गुळ वापरा, पौष्टिक खा, एकमेकांना भेटा, मनमोकळ्या गप्पा मारा, मन मोकळे करा, भावनांचा निचरा करा हे कधी कोणाला सांगावे लागत नसे. ते सहजतेने, जगण्याचा एक भाग म्हणून घडत होते. पण आता ते आवर्जून सांगावे लागते. म्हणूनच आता 'बॅक टू बेसिक' या अर्थाने दिवाळी साजरी करायला हवी. दिवाळीनिमित्त रोषणाई केली पाहिजे तेवढ्या गाठीभेटीही घेतल्या पाहिजेत. ही दिवाळी नात्यांचे महत्त्व ओळखून साजरी करायला पाहिजे.

आमच्याकडे परभणीला दिवाळीला घरी आला नाही असा एकही माणूस नसायचा. त्यात बाबांच्या बँकेतले शिपाई यायचे, काम करणारी बिस्मीला भाभी, गल्लीतला ऑटोवाले, हातगाडीवाले असायचे. थोडक्यात, आजोबांच्या जुन्या मित्रांपासून, बाबांचे मित्र, सहकारी, आम्हाला शाळेत सोडणारे अब्दुल चाचा अशा सगळ्यांचीच सरमिसळ असायची. केळीच्या पानावर सगळ्यांचा एकत्रित फराळ असायचा. मला तशी दिवाळी पुन्हा साजरी करायला आवडेल. एकदा बाबांनी आमच्यासाठी ५०० रुपयांचे फटाके आणले होते तर वाटले होते की, आपण त्यांना इतका जास्त खर्च करावा लावला. आता इतक्या पैशात किरकोळ फटाकेही येत नाहीत. त्यामुळे ही दिवाळी खर्चापेक्षा मोल ओळखण्याची असावी असे मनापासून वाटते.

ही दिवाळी नात्यांमधला समजुतदार परत आणण्यासाठीही असावी. अगदी घरातले उदाहरण सांगतो. आधी मी दिवाळीत तरी परभणीला यावे, असे बाबांना खूप वाटायचे. पण हेच आमच्यासारख्या कलाकारांसाठी व्यस्ततेचे दिवस आहेत हे समजू लागले तसा त्यांनी हा हट्ट सोडला. आता ते म्हणतात, आम्हीच सगळे मुंबईला येतो. तुझी व्यस्तता हीच आमची दिवाळी...! त्यानुसार आता माझे सगळे कुटुंब 'दिवाळी पहाट'च्या कार्यक्रमाला येते. मंडळी तिकीट काढून पहिल्या रांगेत बसतात आणि मनापासून आनंद घेतात. तेव्हा अशा प्रकारे एकमेकांना समजून घेऊन दिवाळी साजरी करण्याची भावना कुटुंब, समाज आणि त्यातील प्रत्येक स्तरात रुजायला हवी. खेरीज हे आवर्जून सांगेन की ही दिवाळी सोशल मीडिया, ट्रोलिंग, आरक्षण, निवडणुका अशा कोणत्याही माध्यमातून एकमेकांना न दुखावण्याच्या संकल्पाची व्हायला हवी. शेवटी सगळे आपले आहेत.

माझ्या मनात नेहमी एक विचार येतो, की आत्ता एकमेकांविरुद्ध उभी ठाकणारी, भांडणारी दोन माणसे उद्या भारत-पाकिस्तानच्या सीमेवर असतील आणि समोरुन एखादा दहशतवादी येत असेल तर निश्चितच ते दोघे मिळून त्याला मारतील. मग याच भावनेने इथेही जगायला काय हरकत आहे? तेव्हा आपल्या असतील त्या भावना, विचार, म्हणणे एकमेकांना हलक्या स्वरात आणि चांगल्या भाषेत सांगून सगळ्यांना आपलेसे करायची ही दिवाळी आहे. शिवाजी महाराजांच्या काळात आपण सगळेच एक होऊन लढलो आहोत. अठरापगड जातींचे लोक एकत्र येऊन, प्रत्येक स्तरावरचा माणूस एकत्र येऊन परकीय आक्रमकांना पळता भुई थोडी केली आहे. आपल्याला सर्जिकल स्ट्राईक, गनिमी कावा, स्त्री सुरक्षा, पेंशन योजना, शेतीचे ज्ञान, सुरक्षा आणि सुराज्य हे सगळेच शिवरायांनी दिले आहे. थोडक्यात, वाढलेले पान समोर तयार आहे. आपल्याला फक्त ते पुरवून पुरवून खायचे आहे. त्या पुरवून खाण्याची ही दिवाळी आहे.

इथे मागे लिहिलेल्या ओळी आठवतात...

भिन्न भाषा, भिन्न राज्ये, वेगवेगळा वेष आहे,
संस्कृतीने नटलेला हा भारत माझा देश आहे
कष्टाचा खातो घास आम्ही, सोन्याचा निघतो घरात धूर
सचिनची बॅट आमची आहे, आमचा आहे लताचा सूर
साहित्य, कला, विज्ञानातही सुवर्णाक्षर गिरवायचंय
आणि येत्या काही वर्षांत आम्हाला महासत्ता म्हणून मिरवायचंय
विनंती करतो भावांनो, अनावश्यक खिसा भरू नका

*चार घास कमी खा ना, पण भ्रष्टाचार तेवढा करु नका*
*सलोख्याने राहू अशी मनाशी गाठ बांधू*
*रमजान, दिवाळी साजरी करू आणि आनंदाने नांदू*
*काय कोणाची बिछाद आता आणि काय कुणात आहे दम*
*मनात ठेवा देशाला आणि म्हणा वंदे मातरम्*




अशा या दिवाळीत आपण सगळे एकत्र येऊ या, एकरुप होऊ या आणि मनातील सगळी स्फोटके काढून एक छान दिवा लावू या; जो आपल्या समाजाचे, महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करेल.

**(शब्दांकन: स्वाती पेशवे)**

✦✦✦

**जगात अमेरिका ही महाशक्ती मानली जाते. मात्र चीन तिला सातत्याने आव्हान देत आहे. चीनच्या नौदलाची ताकद अमेरिकेपेक्षा खूप जास्त आहे. नौदलाच्या ताकदीच्या जोरावर चीनने हिंद महासागरात तसेच अन्यत्र सुरू केलेल्या कुरघोड्यांची भीती अमेरिकेला वाटते आहे. जागतिक लष्करी शक्ती बनण्याच्या चीनच्या घोषित महत्त्वाकांक्षेमुळे हे घडत आहे. या आव्हानाला तोंड देण्यासाठी अमेरिका विविध उपाय योजत आहे.**

# अमेरिकेला ड्रॅगनची भीती का?

विशेष

**आरिफ शेख**

कंबोडियाच्या 'रीम' नौदल तळावर लक्ष रोखून असणाऱ्या उपग्रहावरून दोन वाढत्या आकृत्या दृश्यमान होत्या. त्यावरून अमेरिकेला भीती वाटू शकते की दक्षिण चीन समुद्रातील तीन विवादित बेटांच्या पलीकडे चीन आपल्या क्षमतांचा विस्तार करत आहे. त्यावर चीनने केवळ कब्जाच केला नाही, तर मजबूत ताबा घेतला. चीनच्या नौदलाची १५०० टन वजनाची ए ५६ युद्धनौकया घाटाजवळ (लहान युद्धनौकांसाठी राहण्याची जागा) उभी आहे. हे घाट इतके मोठे आहेत, की तिथे मोठी युद्धनौका किंवा जहाजेही ठेवता येतात. चीनने किनारपट्टीवर अनेक बांधकामेही केली आहेत. हे चीनच्या नौदलाच्या वापरासाठी असल्याचे मानले जाते. हा चीनी नव्हे तर कंबोडियाचा तळ आहे. कंबोडिया खूपच लहान आहे आणि त्याची लष्करी क्षमताही मर्यादित आहे. कंबोडियाने चीनचे मांडलिकत्व स्वीकारल्यासारखे आहे. कंबोडियाचा तळ असला, तरी तिथे चीनी जहाजे आहेत. चीनकडून अधिक प्रशिक्षणाची गरज आहे, असे समर्थन करून कंबोडिया चीनच्या नौदलाला स्वतःचा तळ वापरू देत आहे; मात्र अमेरिकेसह इतर देश याकडे संशयाने बघत आहेत. चीनची वाढती सागरी शक्ती हा चर्चेचा विषय आहे. चीनकडे आता अमेरिकेपेक्षा जास्त जहाजे आहेत. आफ्रिकेतील जिबुती येथे चीनचा एकच परदेशी लष्करी तळ आहे, जो २०१६ मध्ये बांधला गेला होता. त्या तुलनेत अमेरिकेचे परदेशात जवळपास ७५० लष्करी तळ असून चीनजवळच्या जपान आणि दक्षिण कोरियासारख्या देशांमध्येही लष्करी तळ आहेत; मात्र अमेरिकेला हा समतोल बदलत असल्याची चिंता वाटते. जागतिक लष्करी शक्ती बनण्याच्या चीनच्या घोषित महत्त्वाकांक्षेमुळे हे घडत आहे, असे त्या देशाचे मत आहे.

चीन आपल्या बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्ह (बीआरआय) अंतर्गत परदेशात पायाभूत सुविधा प्रकल्पांवर ज्या प्रकारे खर्च करत आहे, त्यावरून अमेरिकेला त्या देशाची महत्त्वाकांक्षा प्रचंड वाढल्याची चिंता जाणवते. या पायाभूत सुविधांचे बांधकामही चीनी लष्कराच्या मानकांनुसारच व्हायला हवे, असा त्या देशाचा आग्रह असतो. अमेरिकन तज्ज्ञांचा विश्वास आहे की चीन लष्करी तळ किंवा सामान्य बंदरांचे जाळे तयार करून त्याचा तळ म्हणून वापर करू शकेल. 'रीम' हा अशा पहिल्या तळांपैकी एक असेल. २०१७ पूर्वी 'रीम' नौदल तळाला अमेरिकेकडून आर्थिक मदत मिळाली होती. काही वर्षांपूर्वीपर्यंत कंबोडियाच्या दक्षिण टोकावर वसलेल्या 'रीम'चे अमेरिकेच्या मदतीने अपग्रेडेशन केले जात होते. ही मदत कंबोडियाला देण्यात येणाऱ्या १० दशलक्ष डॉलर लष्करी मदतीचा एक भाग होती; पण २०१७ मध्ये कंबोडियातील प्रमुख विरोधी पक्षावर बंदी घालण्यात आली आणि त्यांच्या नेत्यांना तुरुंगात टाकण्यात आले, तेव्हा अमेरिकेने ही मदत बंद केली. गुंतवणुकीसाठी आणि आर्थिक मदतीसाठी आधीच चीनवर अवलंबून असलेल्या कंबोडियाने लगेच बाजू बदलली. कंबोडियाने अमेरिकेसोबतचा संयुक्त लष्करी सरावही रद्द केला आहे. यानंतर आता कंबोडिया चीनसोबत तथाकथित गोल्डन ड्रॅगन प्रॅक्टिस लष्करी सराव करत आहे.

अमेरिकेने २०२० मध्ये 'रीम'मध्ये बांधलेल्या दोन इमारती



पाडल्या. यानंतर चीनी पैशाने बांधलेल्या इमारतींचा विस्तार होऊ लागला. गेल्या वर्षाच्या अखेरीस नवीन घाटही तयार झाला होता. तो जिबुती लष्करी तळाच्या ३६३ मीटर लांब घाटासारखा आहे. तो इतका लांब आहे, की चीनची सर्वात मोठी विमानवाहू युद्धनौकाही तिथे तळ ठोकू शकते. लवकरच दोन्ही युद्धनौका 'रीम'मध्ये तैनात करण्यात आल्या. या युद्धनौका किंवा तत्सम दोन युद्धनौका वर्षातील बहुतांश काळ तैनात राहिल्या. या युद्धनौका प्रशिक्षणासाठी उभ्या केल्याचा दावा कंबोडियाने केला आहे. या वर्षी होणाऱ्या गोल्डन ड्रॅगन सरावासाठी त्यांची तयारी केली जात आहे. चीन आपल्या नौदलासाठी दोन नवीन ए ५६ युद्धनौका बनवत असल्याचेही म्हटले आहे. 'रीम'मध्ये चीनची उपस्थिती कायमस्वरूपी नाही, यावर भर दिला जात आहे. अमेरिकन अधिकाऱ्यांनी या साइटच्या विस्ताराबाबत चिंता व्यक्त केली आहे. सॅटेलाइट प्रतिमांमध्ये नवीन घाटाव्यतिरिक्त एक ड्राय डॉक, गोदामे आणि इमारती आहेत, जे प्रशासकीय ब्लॉक आणि निवासी क्वार्टर असल्यासारखे दिसतात. यात चार बास्केटबॉल कोर्टदेखील आहेत. २०१९ मध्ये कंबोडिया आणि चीन यांच्यातील करार लीक झाल्याची बातमी 'वॉल स्ट्रीट जर्नल'मध्ये प्रसिद्ध झाली होती. त्यात या तळाची ७७ हेक्टर जमीन चीनला ३० वर्षांच्या भाडेतत्त्वावर देण्याची चर्चा होती. लष्करी जवानांची कथित तैनाती आणि शस्त्रास्त्रांचा साठा यावरही चर्चा झाली.

कंबोडिया सरकारने ही बातमी 'फेक न्यूज' म्हणून फेटाळून लावली होती; मात्र येथे हे नमूद करणे महत्त्वाचे आहे, की नवीन जेटीवर केवळ चीनी युद्धनौका ठेवण्यास परवानगी देण्यात आली होती. फेब्रुवारीमध्ये आलेल्या दोन जपानी विनाशकांना जवळच्या सिनोविकविले येथे डॉक करण्यास सांगितले गेले. चीनला येथे कायमस्वरूपी उपस्थितीची परवानगी दिली गेली आहे. कॅलिफोर्निया-आधारित 'रँड' कॉर्पोरेशनचे वरिष्ठ धोरण संशोधक क्रिस्टिन गुनेझ म्हणतात की 'रीम' तांत्रिकदृष्ट्या स्थानिक नाही. चीनच्या निधीतून त्याचा विस्तार झाला असला, तरी चीनला भाडेतत्त्वावर देण्यात आलेला नाही. आम्ही पाहत आहोत की चीनची जहाजे 'रीम'मध्ये सतत थांबत आहेत. घटनात्मक बंदी टाळण्याचा एक मार्ग म्हणजे याला परदेशी तळ न म्हणता परकीय सैन्याला एक एक करून येथे येऊ देणे. बहुतेक विश्लेषकांचा विश्वास आहे की 'रीम'मध्ये चीनची दीर्घकालीन उपस्थिती प्रत्यक्षात त्या देशाला फारशी फायदेशीर ठरणार नाही. दक्षिण चीन समुद्रात मिशिफ, फेरी क्रॉस आणि सुबी रिफ्स या तीन तळांवर त्याची उपस्थिती आहे. दक्षिण किनारपट्टीवर चीनी नौदलाच्या भक्कम उपस्थितीकडेही त्यांनी लक्ष वेधले. थायलंडच्या आखाताच्या तोंडावर असलेल्या 'रीम'मध्ये चीनच्या तळामुळे कंबोडियाचे थायलंड आणि व्हिएतनाम हे शेजारी चिंताग्रस्त झाले आहेत. या आणि उत्तरेकडील इतर तळांना एकत्र करून व्हिएतनामला वेढा घालण्याचा चीनचा प्रयत्न म्हणून याकडे पाहिले जात आहे.

फिलिपिन्सप्रमाणेच व्हिएतनामचाही संपूर्ण दक्षिण चीन समुद्रातील बेटांवरून चीनशी वाद आहे. या प्रकरणावरून त्याच्या नौदलाची चीनी नौदलाशी झटापट झाली आहे. थायलंडच्या राष्ट्रीय सुरक्षा अधिकाऱ्यांनी सट्टाहिप थाई नौदलाच्या मुख्य बंदराच्या दक्षिणेला चीनी तळाच्या बांधकामावर चिंता व्यक्त केली आहे. तथापि, थायलंड आणि कंबोडिया यांच्यात अजूनही अनेक निराकरण न झालेले सीमावाद आहेत. चीनच्या नौदल तळांमुळे तणाव वाढत आहे. काही तज्ज्ञांचा असा विश्वास आहे की पुढील अनेक वर्षांपर्यंत अमेरिकन सैन्याच्या जागतिक स्तरापर्यंत पोहोचणे चीनसाठी कठीण होईल; मात्र कोणताही देश या तक्रारी सार्वजनिकपणे पुढे आणू इच्छित नाही. चीनशी महत्त्वाचे आर्थिक संबंध असल्याने थायलंड कोणताही वाद निर्माण करू इच्छित नाही. त्याच वेळी, कंबोडियामध्ये त्याच्या विरोधात जनभावना भडकू नयेत, अशी व्हिएतनामची इच्छा आहे. व्हिएतनामलाही चीनविरोधी भावना भडकवायला नको आहे. त्याच वेळी, भविष्यात चीन हिंदी महासागरात नौदल तळ उभारण्याच्या शक्यतेने अमेरिकन आणि भारतीय रणनीतीकार अधिक चिंतेत आहेत. चीनच्या अशा नौदल तळांमध्ये श्रीलंकेच्या हंबनटोटा बंदराचा समावेश होतो. २०१७ मध्ये चीनच्या सरकारी कंपनीने ते ९९ वर्षांच्या लीजवर घेतले होते. त्याचप्रमाणे पाकिस्तानच्या ग्वादर बंदराचा पुनर्विकास चीनच्या निधीतून करण्यात आला आहे. असे असले तरी पुढील अनेक वर्षांपर्यंत अमेरिकन सैन्याच्या पातळीपर्यंत पोहोचणे चीनसाठी कठीण राहील. चीनी नौदलाच्या शक्तीच्या प्रक्षेपणात 'रीम' फारशी भर घालत नाही. चीनला जिथे पोहोचायचे आहे, तिथे पोहोचण्यास ते मदत करत नाही. तथापि, बुद्धिमत्ता गोळा करणे, उपग्रहांचा मागोवा घेणे आणि लांब पल्ल्याच्या लक्ष्यांचे निरीक्षण करणे आणि शोधणे यासाठी 'रीम' मोठी भूमिका बजावू शकते.

✦✦✦

**भारताची परकीय चलन गंगाजळी ३१ मार्च १९९० अखेर चार अब्ज डॉलरदेखील नव्हती. त्या काळात देश आर्थिक संकटात सापडला होता. आज मात्र चीन, जपान आणि स्वित्झर्लंडनंतर ७०० अब्ज डॉलरची परकीय गंगाजळी असणारी भारत ही जगातील चौथी अर्थव्यवस्था आहे. बाह्य व्यापार आणि आयातीच्या गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टीने सध्या आपण भक्कम स्थितीत आहोत, असे रिझर्व्ह बँकेचे म्हणणे आहे.**

# आणखी एका आघाडीवर सक्षम...

परामर्श

**हेमंत देसाई**
ज्येष्ठ पत्रकार

भारताच्या परकीय चलन गंगाजळीत वाढ झाली असून २७ सप्टेंबर २०२४ ला संपलेल्या आठवड्यात गंगाजळी ७०४ अब्ज डॉलर या विक्रमी पातळीवर पोहोचल्याचे भारतीय रिझर्व बँकेने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे. २० ते २७ सप्टेंबर या कालावधीतच गंगाजळीमध्ये सुमारे १२ अब्ज डॉलर्सची विक्रमी भर पडली. त्या आधीच्या आठवड्यात पावणेतीन कोटी अब्ज डॉलर्सची भर पडली होती. चीन, जपान आणि स्वित्झर्लंडनंतर ७०० अब्ज डॉलरची गंगाजळी असणारी भारत ही जगातील चौथी अर्थव्यवस्था आहे. बाह्य व्यापार आणि आयातीच्या गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टीने सध्या आपण भक्कम स्थितीत आहोत, असे रिझर्व्ह बँकेचे म्हणणे आहे. गंगाजळीने ७०० चा टप्पा ओलांडण्याची ही पहिलीच वेळ आहे. गंगाजळी वजनदार झाल्यामुळे, अस्थिर अशा आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील आकस्मिक चढ-उतारांच्या जोखमीविरुद्ध एक प्रकारचे संरक्षण कवच मिळेल. चलन व्यवस्थापनात रिझर्व बँकेलाही अधिक लवचिकता मिळेल. या घडामोडींचे चालू खात्यावरील तुटीवर नियंत्रणाच्या दृष्टीनेही चांगले परिणाम दिसून येतील. भारताची परकीय चलन गंगाजळी ३१ मार्च १९९० अखेर अवघी चार अब्ज डॉलरदेखील नव्हती. त्या काळात देश आर्थिक संकटात सापडला होता. कारण राजकीय अस्थिरता वाढली होती. देशाला आपले सोने गहाण ठेवून कर्जउभारणी करणे भाग पडले होते. आज मात्र विदेशी चलनाची घागर भरलेली आहे. ही वाढ अर्थातच टप्प्याटप्प्याने होत गेली. परंतु मागील दहा वर्षांमध्ये त्यात सर्वाधिक भर पडली, हे वास्तव आहे.

२०११ ते २०२१ या काळात परकीय चलनसाठा उभारणाऱ्या जगातील आघाडीच्या बारा देशांमध्ये भारताचे स्थान पहिल्या पाचांमध्ये होते. परंतु २०२० चा अपवाद केल्यास, भारताचा आयात-निर्यात व्यापार कायम तुटीचाच राहिला आहे. अन्य देशांबाबत अशी स्थिती नव्हती. अगदी २०२१ मध्येदेखील भारताकडे ६३८ अब्ज डॉलरची गंगाजळी होती. परंतु चालू खात्यातील तूट ११ वर्षांमध्ये ४०० डॉलरपेक्षा जास्त फुगली. जर्मनी, सिंगापूर, दक्षिण कोरिया, हाँगकाँग, चीन, रशिया, स्वित्झर्लंड, जपान यासारख्या देशांनी आपली निर्यात वाढवली आणि त्यामधून, म्हणजे चालू खात्यातील शिलकीतून विदेशी चलनाचा साठा जमवला. उलट भारताने विदेशातून भांडवलाची आयात केली आणि हा साठा तयार केला, हा फरक लक्षात घेतला पाहिजे. अमेरिका, ब्राझीलमधील परिस्थिती भारताप्रमाणेच आहे. उलट, त्यांची चालू खात्यावरील तूट आपल्यापेक्षा जास्त आहे. २०१४-१५ ते २०२१-२२ या आठ वर्षांमध्ये भारताची आयात-निर्यातीतील तफावत एक लाख २८ हजार कोटी झाली होती. ही तूट भरून निघाली, ती मुख्यतः भारतीय आयटी कंपन्यांच्या सॉफ्टवेअर सेवांच्या निर्यातीतून झालेली प्राप्ती, परदेशस्थ भारतीयांनी मायदेशात पाठवलेला पैसा आणि पर्यटन उत्पन्नातून.

विदेशातून उभारलेल्या कर्जावरील व्याजाची परतफेड, भारतात सक्रिय असलेल्या बहुराष्ट्रीय कंपन्यांचे स्वामित्वधन, परवाना शुल्क, परदेशी प्रवास आणि विविध वित्तीय सेवांवरील खर्चांपेक्षा आपल्या उपरोल्लेखित मिळकती जास्त राहिल्या आहेत. बाह्य वित्त पुरवठ्याच्या बाबतीतील गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टीने सध्या भारत सुस्थितीत आहे, असे रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनीही म्हटले आहे. परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदार (एफआयआय) जून २०२४ पासून देशांतर्गत बाजारात निव्वळ खरेदीदार बनले आहेत. जूनच्या सुरुवातीपासून ६ ऑगस्टपर्यंतच्या कालावधीमध्ये ९.६ अब्ज डॉलर, म्हणजेच ८१,४३३ कोटी रुपयांची निव्वळ गुंतवणूक 'एफआयआय'कडून आली. तर त्याआधी एप्रिल आणि मे महिन्यात एकूण ४.२ अब्ज डॉलर्स निधी त्यांनी काढून घेतला होता. एप्रिल आणि मे २०२४ या दोन महिन्यांच्या कालावधीत थेट परकीय गुंतवणुकीत २० टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे. तर निव्वळ एफडीआय प्रवाह मागील वर्षाच्या याच कालावधीच्या तुलनेत दुप्पट झाला आहे. भारतीय संस्थांकडून बाह्य वाणिज्य कर्जे कमी झाली आहेत. मात्र त्या तुलनेत अनिवासी भारतीयांच्या ठेवी एप्रिल-मेमध्ये अधिक राहिल्या आहेत.

एकीकडे विदेशी गंगाजळीची परिस्थिती चांगली असताना दुसरीकडे रुपयाची घसरण झाली आहे. एक डॉलर घेण्यासाठी आता ८४ रुपये आणि ४ पैसे मोजावे लागत आहेत. डॉलर जेवढा महाग होत जाईल, तेवढा आपला आयातीवरील खर्च वाढणार आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. गाझापट्टी, लेबनॉन, युक्रेन, रशिया येथे युद्ध सुरू असून, क्षेपणास्त्र हल्ले, बॉम्बफेक चालूच आहे. त्यामुळे तसेच येमेनमधील हुथी बंडखोर जहाजांवर हल्ले चढवत असल्यामुळे आंतरराष्ट्रीय मालवाहतुकीला फटका बसतो आहे. याचा जागतिक व्यापारावर प्रतिकूल परिणाम होत आहे आणि उद्या संघर्ष पेटल्यास कच्च्या तेलाचे भावही वाढू शकतात. तसे झाल्यास, भारताला परकीय चलन जास्त प्रमाणात खर्च करावे लागेल. म्हणूनच आहे त्या परिस्थितीवर संतुष्ट राहून चालणार नाही. धोरणकर्ते, आर्थिक वृत्तपत्रे आणि परकीय गुंतवणूक समर्थक अर्थतज्ज्ञ या सर्वांना भारताच्या वाढत्या परकीय चलनाच्या साठ्यामुळे वेड लागले आहे. देशातील गुंतवणुकीचे वातावरण सुधारल्याचे सांगत सरकार आपल्या पाठीवर थाप मारून घेत आहे. परकीय चलनाच्या साठ्यात वाढ होण्याला अर्थव्यवस्थेच्या तंदुरुस्तीचा बॅरोमीटर मानण्याची स्पर्धा लागली आहे. आपल्या परकीय चलनाच्या गंगाजळीत गेल्या तीन दशकांपासून सातत्याने वाढ होत असली, तरी गेल्या १८ महिन्यांमध्ये पूर्वीपेक्षा वेगवान वाढ झाली आहे. वाढत्या परकीय चलनाच्या साठ्यामुळे समाधान आणि दिलासा मिळतो.

देशात परकीय चलनाचा पुरेसा साठा नसेल तर परकीय कर्जाचे व्याज आणि मुद्दल परतफेड करण्यात चूक होण्याचा धोका असतो. १९९१ मध्ये आपले सोने बँक ऑफ इंग्लंडकडे गहाण ठेवण्यास भाग पडले होते. इतिहासाचा दाखला देत काही अर्थतज्ज्ञ परकीय चलनाच्या वाढत्या साठ्याला शुभ मानतात. त्यांचा युक्तिवाद आहे की परकीय चलन गंगाजळी देशासाठी विमा म्हणून काम करतात. ते भारताच्या परकीय चलनाच्या साठ्याची तुलना चीनच्या परकीय चलनाच्या साठ्याशी करतात. विशेष म्हणजे चीनचा परकीय चलनाचा साठा भारताच्या साठ्यापेक्षा सहा ते सातपटींनी जास्त आहे. आपल्याला हे समजले पाहिजे की चीनचा परकीय चलन साठा त्यांच्या बहुतेक व्यापार भागीदारांसह चीनच्या पेमेंट बॅलन्स (बीओपी) अतिरिक्ततेमुळे वाढला आहे. भारताच्या परकीय चलनाच्या गंगाजळीत झालेली वाढ मुख्यत्वे थेट परकीय गुंतवणूक (एफडीआय) आणि विदेशी पोर्टफोलिओ/संस्थागत गुंतवणूक (एफपीआय) यामुळे आहे. या स्त्रोतांमधून मिळणाऱ्या परकीय चलनाचे दूरगामी परिणामही लक्षात ठेवावे लागतात. आपली वस्तू आणि सेवांची निर्यात आयातीपेक्षा जास्त असेल, तर अशा प्रकारे कमावलेले परकीय चलन हा सर्वोत्तम पर्याय असतो. हे प्रत्यक्षात चीनमध्ये घडले आहे.

शेअर बाजारातील गुंतवणुकीतून परकीय चलन मिळाले, तरी त्याचे अनेक दुष्परिणाम असतात. पहिला दुष्परिणाम असा, की यामुळे केवळ शेअर बाजारातच नव्हे, तर विनिमय दरातही अस्थिरता निर्माण होते. आणखी एक दुष्परिणाम असा की परकीय चलनाच्या या प्रवाहासाठी देशाला मोठी किंमत मोजावी लागते. कारण हे गुंतवणूकदार त्यांच्या मालमत्तेचे मूल्य वाढत असतानाही मोठा नफा त्यांच्या मूळ देशांमध्ये परत नेतात. परकीय गुंतवणूक, खासगी कंपन्यांनी घेतलेली विदेशी कर्जे आणि भारतीयांनी मायदेशात पाठवलेले पैसे या सर्व गोष्टी परकीय चलनाचा साठा वाढवण्यासाठी महत्त्वाच्या आहेत; परंतु या सर्व स्त्रोतांचा साठ्यांवर समान परिणाम होत नाही. परदेशी गुंतवणूकदार किंवा पोर्टफोलिओ गुंतवणूकदार मोठ्या प्रमाणात पैसे परत नेतात. हे गुंतवणूकदार लाभांश रॉयल्टी, तांत्रिक शुल्क, व्याज, पगार इत्यादींच्या रूपात मोठ्या प्रमाणावर परकीय चलन काढून घेतात. त्याव्यतिरिक्त, या परदेशी कंपन्यांनी उत्पादित केलेल्या उत्पादनांमध्ये आयातीचा वाटाही खूप जास्त असतो. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर परकीय चलन बाहेर पडते. गेल्या दहा वर्षांमध्ये परदेशी गुंतवणूकदारांनी लाभांश, रॉयल्टी, तांत्रिक शुल्क, व्याज आणि पगाराच्या रूपात ३९० अब्ज डॉलर काढून घेतले असून ही रक्कम वर्षानुवर्षे वाढत आहे. पोर्टफोलिओ गुंतवणूकदार किती परकीय चलन आणतील आणि कधी काढतील याचा अंदाज लावता येत नाही. त्यांच्या अस्थिरतेचा परिणाम विनिमय दरावर होतो. एवढेच नव्हे, तर या गुंतवणूकदारांमुळे शेअर बाजारातही प्रचंड अस्थिरता निर्माण होते.

✦✦✦



**१९८५ मध्ये आसाम कराराच्या निमित्ताने अस्तित्वात आलेले, बेकायदा स्थलांतराच्या समस्येवर आधारित असलेले कलम - ६ अ अखेर सर्वोच्च न्यायालयाने वैध ठरवले. स्थलांतरितांची देशातील सर्वात जास्त लोकसंख्या असलेल्या, आसाम आणि पश्चिम बंगाल राज्यांच्या दृष्टीने हा महत्वाचा निर्णय म्हणावा लागेल. कारण यामुळे देशात बेकायदेशीरपणे राहणाऱ्यांची ओळख करायच्या कामाला गती येईल.**

# महत्वाचा निवाडा

दखल

**शंतनु चिंचाळकर**

आसाममधील नागरिकत्वाच्या प्रश्नावर देशभर बरीच चर्चा झाली. बांगलादेशमधून प्रचंड संख्येने भारतात शिरणाऱ्या घूसखोरांच्या समस्येने मोठी अस्वस्थता निर्माण केली. हा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून चर्चेत असल्याने कोणता पक्ष रास्त आहे, यावरुन बऱ्याच चर्चा झडल्या. त्याला हिंदू विरुध्द मुस्लिम संघर्षाचाही कंगोरा होता. याच प्रश्नावरुन आसाम सन्मिलित महासंघ आणि इतर स्वयंसेवी संस्थांनी नागरिकत्व कायद्याच्या कलम ६ ला विरोध केला आणि सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. ही याचिका निकाली काढताना सर्वोच्च न्यायालयाने कायद्याची वैधता उचलून धरल्याने एक महत्वाचा निर्वाळा मिळाला.

भारताची राज्यघटना १९५० मध्ये लागू झाली. त्यात प्रस्तावना आणि ४७० कलमे आहेत, जी २२ भागांमध्ये गटबद्ध आहेत. संविधानाच्या भाग २ मध्ये कलम ५ समाविष्ट आहे. त्यात नागरिकत्वाबद्दल स्पष्ट निकष विषद केले आहेत. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील फाळणीच्या वेळी पाकिस्तानमधून भारतात स्थलांतरित झालेल्या व्यक्तींच्या नागरिकत्वाबद्दल काही अर्हता नमूद करण्यात आल्या आहेत. घटनेच्या कलम ६ मधील तरतुदीनुसार पाकिस्तानमधून भारताच्या हद्दीत स्थलांतरित झालेली व्यक्ती भारताची नागरिक मानली जाईल, असे म्हटले आहे. अर्थात देशाच्या इतर काही भागांमध्ये या पलिकडे काही प्रश्न उभे राहिले आहेत. उदाहरणादाखल आसामकडे पाहता येते. आसाममध्ये राहणाऱ्या बेकायदेशीर बांगलादेशी स्थलांतरितांची ओळख पटवण्याच्या आणि त्यांच्या हद्दपारीच्या प्राथमिक मागणीसाठी आसाममधील विद्यार्थ्यांचे सहा वर्षे (१९७९-१९८५) आंदोलन चालले होते. ऑल आसाम स्टुडंट्स युनियन आणि ऑल आसाम गणसंग्राम परिषद यांच्या नेतृत्वाखाली हे अहिंसक आंदोलन सुरू झाले होते. नंतरच्या टप्प्यात त्याला हिंसक वळण लागले. त्यावेळी केंद्र सरकार, आसाम सरकार आणि आंदोलनकर्त्यांमध्ये झालेल्या करारातील कलम-५ नुसार जानेवारी १९६६ ते मार्च १९७१ दरम्यान भारतात आलेल्यांची ओळख निश्चित केली जाणार होती. त्यानंतर आलेल्यांचे भारतातील वास्तव्य बेकायदा ठरवून भारताबाहेर पाठवण्यात येणार होते. एका माहितीनुसार केवळ आसाम आणि पश्चिम बंगालमध्ये मिळून ९५ लाखांच्या आसपास बेकायदा स्थलांतरित आहेत. त्यामुळे या प्रश्नाकडे अवघ्या देशाचे लक्ष वेधले गेले होते.


१ जानेवारी १९६६ पूर्वी बांगलादेशमधून आसाममध्ये प्रवेश केलेल्या सर्व स्थलांतरितांना कलम ६अ (२) नुसार नागरिकत्व दिले गेले आहे. पुढे, त्यात नमूद करण्यात आले आहे की १ जानेवारी १९६६ ते २४ मार्च १९७१ दरम्यान आसाममध्ये प्रवेश केलेल्या स्थलांतरितांना दहा वर्षांसाठी मतदानाचा विशेषाधिकार नसताना भारतीय नागरिक मानले गेले. नागरिकत्वाची वैधता ठरवण्यासाठी १९ जुलै १९४८ ही कट ऑफ तारीख निश्चित केली गेली होती. कलम ६ मधील तरतुदीनुसार एखाद्या व्यक्तीने दोन अटींचे पालन केल्यास भारताच्या हद्दीत स्थलांतरित झालेला परदेशी भारताचा नागरिक असल्याचे समजले जाईल. भारत सरकार कायदा, १९३५ नुसार ती व्यक्ती स्वत: किंवा तिचे आई-वडील किंवा आजी-आजोबा भारतात जन्मलेले असणे अपेक्षित आहे. संबंधित व्यक्तीने १९ जुलै १९४८ पूर्वी स्थलांतर केले असेल आणि २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय राज्यघटना अंमलात येण्यापूर्वी नागरिकत्वासाठी अर्ज केला असेल तर भारतीय नागरिकत्व मिळेल, असे हे दोन मुद्दे.

आसाम सन्मिलित महासंघ आणि इतर स्वयंसेवी संस्थांनी नागरिकत्व कायद्याच्या कलम ६ ला विरोध केला. त्याला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देताना युक्तिवाद केला की, कलम ६ असंवैधानिक आणि भेदभावपूर्ण आहे आणि ते आसामी लोकांच्या सांस्कृतिक, भाषिक आणि राजकीय हक्कांचे संरक्षण करण्याच्या अधिकाराचे उल्लंघन करते. त्यांनी युक्तिवाद केला की या तरतुदीमुळे अवैध स्थलांतरितांचा ओघ वाढला. त्यामुळे राज्याच्या आर्थिक आणि विकासात्मक उद्दिष्टांवर ताण आला. निवाड्याप्रसंगी न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांनी कलम २९ अंतर्गत याचिकाकर्त्यांचे दावे नाकारले, जे वांशिक आणि सांस्कृतिक अल्पसंख्याकांच्या हक्कांचे रक्षण करते. त्यांनी नमूद केले की आसाममध्ये विविध जातीय गटांची उपस्थिती कलम २९(१) चे उल्लंघन केल्याचा दावा करण्यासाठी अपुरी आहे. कलम २९ लागू करण्यासाठी याचिकाकर्त्यांना हे सिद्ध करावे लागेल की जातीय समूह यापुढे दुसऱ्या गटाच्या उपस्थितीमुळे आपली संस्कृती किंवा भाषा संरक्षित करू शकत नाही. निवाडा करणारे अन्य न्यायमूर्ती कांत यांच्या मते याचिकाकर्ते आसामी संस्कृतीवर कृतीयोग्य प्रभाव दाखवण्यात किंवा कलम ६ चा त्यांना अपेक्षित असा अन्वयार्थ लावण्यात अयशस्वी ठरले आहेत.

सर्वोच्च न्यायालयात युक्तिवाद करताना याचिकाकर्त्यांनी म्हटले की, कलम ६ मुळे आसाममध्ये मोठ्या प्रमाणात स्थलांतरित येण्यास मदत होते. कारण ही तरतूद केव्हा संपली याची कोणतीही अंतिम तारीख नाही. पुढील तरतुदीमध्ये नमूद केलेल्या तारखांच्या आधी एखादी व्यक्ती किंवा त्यांचे पालक किंवा त्यांचे आजी-आजोबा आसाममध्ये स्थलांतरित झाले आहेत की नाही, याची पडताळणी करण्यासाठी त्या ठिकाणी असलेल्या यंत्रणा पुरेशा मजबूत नाहीत. परिणामी, त्यांनी असा युक्तिवाद केला की मोठ्या प्रमाणात स्थलांतरण झाल्यामुळे आसामची लोकसंख्या आणि संस्कृती प्रभावित झाली. घटनेच्या कलम २९ अंतर्गत त्यांच्या सांस्कृतिक अधिकारांचे उल्लंघन झाले. शेवटी, त्यांनी युक्तिवाद केला की आसामला इतर राज्यांमधून वेगळे करण्याची तरतूद घटनेच्या कलम १४ चे उल्लंघन करते. न्यायालयाने दिलेल्या निवाड्यानुसार २५ मार्च १९७१ पूर्वी भारतात स्थलांतरित झालेल्यांना नागरिकत्वासाठी अर्ज करता येतील. त्याद्वारे बेकायदेशीरपणे भारतात राहणाऱ्यांची ओळख करता येईल. त्याच्या जोडीला या प्रक्रियेद्वारे भारतातील प्रत्येक व्यक्तीच्या नागरिकत्वाची स्थिती त्यांनी प्रदान केलेल्या कागदपत्रांच्या आधारे तपासणे सोपे जाईल. आसाममध्ये प्रथम ही चाचणी घेण्यात आलेल्या ठिकाणी १.९ दशलक्ष लोकांना नागरिक म्हणून वगळण्यात आले होते. यावरून भारतात बेकायदेशीर वास्तव्य करणाऱ्यांच्या संख्येचा अंदाज येऊ शकतो.

राजघटनेच्या कलम ६अ द्वारे १९७१ च्या पाकिस्तानसोबतच्या युद्धादरम्यान बांगलादेशमधून आसाममध्ये स्थलांतरित झालेल्या बेकायदेशीर स्थलांतरितांची ओळख होते. हा आसाममधील एक संवेदनशील मुद्दा आहे, कारण देशाच्या पूर्व सीमेवरून मोठ्या प्रमाणात लोक घुसखोरी करत असल्यामुळे आसामी संस्कृती नष्ट होत चालली आहे. सुप्रीम कोर्टाच्या या महत्वाच्या निर्णयाचे संपूर्ण देशातून स्वागत केले जात आहे. मुख्य कलम ६ अ द्वारे बेकायदेशीरपणे भारतात राहणाऱ्या बंगलादेशी नागरिकांची ओळख पटवणे आता सोपे झाले आहे. कायदा राबवण्याचा पाया म्हणून कलम ६ अ च्या वैधतेच्या निकालाकडे पाहिले जाईल. या निकालाचा काय परिणाम होणार याची लागलीच चर्चा सुरू झाली आहे. १९८५ मधील आसाम रेकॉर्ड आणि नागरिकता कायद्याचे कलम ६ सर्वोच्च न्यायालयाने ४:१ अशा बहुमताने योग्य ठरवले आहे. त्यानुसार, १ जानेवारी १९६६ ते २५ मार्च १९७१ दरम्यान पूर्व पाकिस्तानमधून (आताचे बांगलादेश) आसाममध्ये आलेल्या निर्वासितांची नागरिकता कायम असणार आहे. त्यानंतर आलेले लोक मात्र बेकायदेशीरपणे भारतात आल्याचे सिध्द होईल. त्यामुळे त्यांना बांगलादेशमध्ये परत पाठवले जाईल. आसाममध्ये राहणाऱ्या एका वर्गाला बंधुत्वाचे तत्त्व निवडकपणे लागू केले जाऊ शकत नाही, असे पाच न्यायाधीशांच्या खंडपीठाचे प्रमुख मत लिहिणारे न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी म्हटले. एकंदरीत, या निकालामुळे एक बहुचर्चीत आणि नागरिकत्वाच्या प्रश्नाचे विविध कंगोरे स्पष्ट करणारे प्रकरण निकाली निघाले आहे.

✦✦✦



# तरुणाई का जातेय अंधाराच्या वाटेवर?




प्रा. डॉ. मिलिंद भोई

अलीकडे मुला-मुलींच्या आत्महत्येच्या घटना लागोपाठ घडत आहेत. आयटीतील तरुण असोत वा शाळा-कॉलेजात शिकणारे विद्यार्थी; अगदी क्षुल्लक गोष्टींसाठी ही मुले जीवन संपवत आहेत. आयुष्याच्या वाटेवर उजेड उगवत असताना उमद्या तरुणाईने या अंधारवाटेवर जावू नये, यासाठी त्यांच्याकडे वेळीच लक्ष दिले पाहिजे.

गेल्या आठवड्यात छत्रपती संभाजीनगरमध्ये बारावीत शिकणाऱ्या साहिलने खोलीतील आरशावर आय वाँट टू रिस्टार्ट असे लिहून गळफास घेतला. दुसऱ्या दिवशी याच शहरातील आठवीत शिकणाऱ्या आदिश्रीने इमारतीच्या चौथ्या मजल्यावरुन उडी घेत आयुष्य संपवले. किशोरवयीन तसेच तरुण मुलामुलींच्या या लागोपाठ घडणाऱ्या आत्महत्यांच्या घटनांमुळे पालक आणि समाज म्हणून आपले डोळे उघडायला हवेत.

तरुणांमधील या आत्महत्यांमागे वेगवेगळी कारणे असू शकतात. पण, त्यातही कुठल्याही प्रकारचा ताण सहन करण्याची क्षमता कमी होणे आणि डोक्यावरील अनावश्यक ओज्याचा भार सहन न होणे, ही माझ्या दृष्टीने महत्त्वाची कारणे आहेत.

पैसा, प्रगती, प्रसिद्धी, प्रतिष्ठा या भुलभुलैयात अडकून स्वतःच्या आयुष्यातील निखळ आनंद हरवून गेल्याने असे ताण आणि भार वाढत आहेत. मन मोकळे करण्यासाठी, दुःख हलके करण्यासाठी समजून घेऊ शकेल अशी व्यक्ती जवळ नसण्यामुळेही समस्या गंभीर झाली आहे. एखाद्या तरुण-तरुणीच्या आयुष्यात आलेल्या अशा बिकट अवस्थेत मानसोपचारतज्ज्ञ, समुपदेशकांची भूमिका नक्कीच महत्त्वाची असू शकते. पण, जवळच्या कुणाकडे ताण आणि भार हलका होऊ शकला, तर कदाचित या मंडळींच्या मदतीची वेळ येणारही नाही.

आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल तेव्हाच उचलले जाते, जेव्हा त्या व्यक्तीच्या आरोग्यात काही बिघाड होतो. साधारणपणे सहा प्रकारच्या आरोग्यांमधील बिघाड आत्महत्येसारख्या विचाराला कारणीभूत ठरू शकतात. या प्रत्येक आरोग्याविषयी, त्यांतील बिघाडाच्या कारणांची आणि लक्षणांची माहिती घेऊ.

**१. शैक्षणिक आरोग्य :**
हे आरोग्य बिघडण्याची कारणे ठरवलेली ध्येय, उद्दिष्टे साध्य न होणे / सातत्याने अपयश येणे, ही असतात. अनेक शैक्षणिक संस्था दर्जा टिकवण्यासाठी १०० टक्के निकालाबाबत आग्रही असतात. याचे नकळत दडपण विद्यार्थ्यांवर येते. पालक, शिक्षक, नातेवाईक, मित्र परिवाराच्या अपेक्षांचा विद्यार्थ्यांवर ताण, दबाव येऊ शकतो.

**२. मानसिक आरोग्य :**
हे आरोग्य चांगले नसण्याचे लक्षण म्हणजे एकाकीपणा/असुरक्षितेची भावना निर्माण होणे. गुणवत्तेच्या दबावामुळे विद्यार्थ्यांमध्ये नैराश्य, ताण वाढतो. बऱ्याचदा विद्यार्थी शिक्षणासाठी कुटुंबापासून दूर राहतात. तिथल्या स्पर्धेच्या वातावरणात त्यांच्यात एकाकीपणाची भावना निर्माण होते. याचा मानसिक आरोग्यावर परिणाम होतो.

**३. आर्थिक आरोग्य :**
हे आरोग्य बिघडण्याचे कारण म्हणजे उत्पन्न आणि खचार्चे व्यस्त प्रमाण. दुसऱ्या शहरात शिक्षणासाठी आलेल्या विद्यार्थ्यांवर फी, राहण्या-खाण्यासाठी होणारा खर्च, त्यातून येणाऱ्या आर्थिक अडचणी यांचाही एक प्रकारे ताण असतो.

**४. सामाजिक आरोग्य :**
बदनामीची भीती हे प्रामुख्याने या प्रकारचे आरोग्य बिघडण्याचे कारण असते. सोशल मीडियाचा गैरवापर आणि त्यातून घडणारे सायबर गुन्हे विद्यार्थ्यांचे सामाजिक आरोग्य बिघडवतात. बदनामीचा ताण अशा विद्यार्थ्यांवर येतो.

**५. शारीरिक आरोग्य :**
हे आरोग्य बिघडण्याची कारणे म्हणजे व्यसनाधीनता किंवा एखाद्या आजाराने ग्रस्त असणे. अमली पदार्थ सेवन, व्यसनाच्या आहारी गेल्यामुळे शरीरासह मानसिक आरोग्य तर बिघडतेच. पण, आर्थिक व कायदेविषयक समस्यांचे मोठे दडपण येते. अनेक विद्यार्थी ते सहन करू शकत नाहीत.

**६. कौटुंबिक आरोग्य :**
नातेसंबंधांमध्ये येणाऱ्या समस्या या प्रकारचे आरोग्य बिघडण्याचे मुख्य कारण असते. घरापासून दूर राहिल्याने मिळालेली मोकळीक आणि शहरातील कथित मॉर्डन कल्चर यांतून नव्याने तयार झालेल्या नात्यांतील बिघाड (ब्रेकअप), तसेच चुकीच्या संगतीमुळे आलेल्या समस्या यांना तोंड देणे अनेक तरुण-तरुणींना खूप कठीण होऊन बसते.

विद्यार्थी वा तरुणांचे वरीलपैकी कोणत्याही प्रकारचे आरोग्य बिघडल्यास खंबीर पाठिंब्याचा अभाव, हतबलता आणि निराशेची भावना या गोष्टी आत्महत्येस कारणीभूत ठरू शकतात. याकडे पालक, शिक्षक आणि समाज म्हणून आपण सर्वांनी वेळीच लक्ष दिले पाहिजे.

**कोणते उपाय करता येतील?**

विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याबाबत सकारात्मक दृष्टिकोन ठेवावा.

शाळा - कॉलेजांत आश्वासक समुपदेशन केंद्रे निर्माण करावीत.

समुपदेशन केंद्रात आत्महत्येचे विचार रोखण्याबाबाबत चर्चासत्रे व्हावीत.

डिप्रेशनबद्दल खुलेपणाने बोलण्याची प्रेरणा देणाऱ्या, नकारात्मकता टाळून सकारात्मक विचारांना प्रोत्साहन देणाऱ्या समुपदेशकांची नेमणूक करावी.

शाळा-कॉलेजांत सायबर क्राइम, अमली पदार्थ सेवनाचे दुष्परिणाम, मुलींवरील लैंगिक अत्याचारासंदर्भात जागरूकता निर्माण करावी.

शाळा-कॉलेजांकडून हेल्पलाइनच्या माध्यमातून समुपदेशकांची नेमणूक व्हावी.

शाळा-कॉलेजांच्या अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यावरील प्रथमोपचार- प्रशिक्षणाचा समावेश करावा.

पालक, शिक्षक, समुपदेशकांनी विद्यार्थ्यांना सकारात्मक नातेसंबंध निर्माण करण्यास प्रोत्साहित करावे.

**विद्यार्थ्यांनी काय करावे?**

अभ्यासाला महत्त्व जरूर द्या; पण व्यायाम, खेळ, छंदही जोपासा. त्यामुळे आत्मविश्वास वाढेल, नकारात्मक विचारही दूर जातील.

सकारात्मक विचारांची पुस्तके वाचा.

रोज थोडा वेळ निसर्गाच्या सानिध्यात घालवा.

मनःशांतीसाठी ध्यानधारणा करा.

खोट्या प्रतिष्ठेला महत्त्व देण्यापेक्षा गरजा कमी करा.

कमीत कमी पैशांत गरजा भागवण्याची सवय लावा.

इतरांशी आपली कोणत्याही प्रकारे तुलना करू नका.

वेळीच कोणाशी तरी बोला, रडून मोकळे व्हा. भावना दाबून ठेवू नका.

विश्वासार्ह आउटलेट शोधा आणि ड्रेन आउट व्हा.

●●●●●

# सर्वच पक्षांत घराणेशाही

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीतील चित्र पाहिले तर राजकीय निष्ठा, विचारसरणी, तत्त्व याला दुय्यम स्थान आल्याचे दिसते. उमेदवारीसाठी सोयीची पक्षांतरे, एकाच घरात दोन पक्ष हे आता नवीन नाही. आमदार होण्याच्या इषेर्पायी विचार दुय्यम ठरलेत. राजकीय पक्षांची उमेदवारी यादी पाहिली तर घराणेशाही मोठ्या प्रमाणात आहे. त्याला कोणताही पक्ष अपवाद नाही.

उमेदवारी दिल्यानंतर त्याचे समर्थन करण्यासाठी संबंधित तो किंवा ती पक्षात काम करत असल्याचे सांगितले जाते. या साऱ्यात पक्षासाठी कष्ट उपसणारा सामान्य कार्यकर्ता दुर्लक्षित राहतो. यात मतदारांनाही गृहित धरले जाते. अर्थात या काही प्रमाणात मतदारांनाही दोष दिला पाहिजे. कारण अशा घराणेशाहीच्या प्रतिनिधींना ते संधी देतात. यावेळी राज्यात उमेदवारी याद्यांवर नजर टाकल्यावर हेच चित्र दिसते.

**भाजपमध्ये मोठ्या प्रमाणात**

इतरांपेक्षा वेगळा पक्ष अशी भाजप आपली नेहमी ओळख सांगतो. मात्र सत्ता मिळवण्यासाठी आता या पक्षातही घराणेशाही मोठ्या प्रमाणात आहे. एखाद्या आमदार किंवा खासदाराचा मुलगा त्या पक्षात वर्षानुवर्षे काम करत असेल तर, त्याला उमेदवारी देणे हा भाग वेगळा. अशा वेळी ही उमेदवारी समर्थनीय ठरते. मात्र अचानक केवळ जिंकण्याच्या क्षमतेच्या (इलेक्टीव्ह मेरीट) नावाखाली संबंधित लोकप्रतिनिधीच्या नात्यातील व्यक्तीला संधी देणे अयोग्य आहे. यातून पक्षात असंतोष वाढतो.

भाजपने महाराष्ट्रात उमेदवारी देताना बहुतेक जुन्या आमदारांनाच संधी दिली. फार क्वचित विद्यमान आमदार वगळले. मात्र जेथे वगळले तेथे अनेक ठिकाणी संबंधितांच्या कुटुंबातच उमेदवारी दिली. यात अशोक चव्हाण यांच्या कन्या श्रीजया, कल्याणमध्ये गणपत गायकवाड यांच्या पत्नी सुलभा, जळगाव जिल्ह्यात माजी खासदार हरिभाऊ जावळे यांचे पुत्र अमोल, चिंचवडमध्ये दिवंगत लक्ष्मण जगताप यांचे बंधू शंकर जगताप, श्रीगोंदा मतदारसंघात बबनराव पातपुते यांच्या पत्नी प्रतिभा यांचा समावेश आहे.

मुंबई अध्यक्ष आशिष शेलार व त्यांच्या बंधूंना उमेदवारी मिळाली. इचलकरंजीत आमदार प्रकाश आवाडे यांचे पुत्र राहुल हे भाजप उमेदवार आहेत. जवळपास २० जण हे घराणेशाहीशी संबंधित आहेत. थोडक्यात प्रत्येक पाच उमेदवारांमागे एक जण हा यातून आला आहे. त्यामुळे घराणेशाहीरून विरोधकांवर टीका करणाऱ्या भाजपला आता लक्ष्य केले जात आहे.

**महायुतीतही तेच..**

शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाच्या यादीतही हाच प्रकार दिसतो. जवळपास ४५ जणांच्या पहिल्या यादीत अनेक नावे घराणेशाहीशी संबंधित आहेत. पैठणमधून संदिपान भुमरे यांचे पुत्र विलास, जोगेश्वरी पूर्वमधून खासदार रवींद्र वायकर यांच्या पत्नी मनिषा, दर्यापूरमधून आनंदराव अडसूळ यांचे चिरंजीव अभिजीत, सांगली जिल्ह्यातून अनिल बाबर यांच्या मुलाला संधी देण्यात आली.

मंत्री उदय सामंत यांचे बंधू किरण हे राजापूरमधून उमेदवार आहेत. त्यामुळे उमेदवारी देताना हा मुद्दा प्रकषार्ने पुढे आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षातही अशी काही उदाहरणे आहे. मात्र या दोन पक्षांनी बंडात साथ देणाऱ्या सर्वांनाच पुन्हा संधी दिल्याने त्यांच्या यादीत विशेष बदल नाहीत. जेथे ज्याचा आमदार तेथे उमेदवार हा निकष असल्याने जवळपास १८० जागा त्यांच्या ठरल्या आहेत. त्यामुळे बदलाला मोठी संधी नाही. तरीही जेथे शक्य आहे तेथे तगडा उमेदवार देण्याच्या प्रयत्नात घराणेशाहीचे प्राबल्य उमेदवारी यादीवरून दिसते.

**ठाकरे गटही अपवाद नाही**

ठाकरे गटानेही आदित्य ठाकरे यांचे मावसबंधू वरुण सरदेसाई यांना रिंगणात उतरवले आहे. याखेरीज रत्नागिरीत भाजपचे माजी आमदार सुरेंद्रनाथ तथा बाळ माने यांना ज्या दिवशी पक्षात प्रवेश केला त्याच दिवशी उमेदवारी मिळाली. याखेरीज डोंबिवली, सिल्लोड या ठिकाणी बाहेरील उमेदवारांना संधी देण्यात आली आहे.

शरद पवार गटात बारामतीमधून युगेंद्र पवार यांना उमेदवारी दिली आहे. येथे पवार कुटुंबातच लढत होईल. याच कुटुंबात तीन खासदार आहेत. आता आमदारही तेच. नवी मुंबईत नाईक कुटुंबीय दोन वेगळ्या पक्षातून भाग्य आजमावत आहेत. सिंधुदुर्गमधील तीनपैकी दोन मतदारसंघात राणे कुटुंबातील व्यक्ती दोन प्रमुख पक्षांमधून रिंगणात आहेत. घराण्यांची ही यादी लांबतच आहे. काँग्रेसची उमेदवारी यादी अद्याप झालेली नाही. मात्र घोषित उमेदवार पाहता सामान्य कार्यकर्त्याने केवळ जयजयकार करण्यात धन्य मानायचे का, हाच मुद्दा आहे.

●●●●●

# एकाकी मृत्यू म्हणजे काय?

दक्षिण कोरियाची राजधानी असलेल्या सोल या महानगराने एकटेपणाच्या समस्येचा सामना करण्यासाठी लाखो डॉलर्सची गुंतवणूक करण्याची योजना आखली आहे. शहरातील वाढत्या एकटेपणाच्या समस्येचा सामना करण्यासाठी 'Loneliness- Free Seoul' हा उपक्रम आखला आहे.

या उपक्रमासाठी ३०० दशलक्ष डॉलर्सपेक्षा अधिक निधी मंजूर करण्यात आला आहे. या उपक्रमाचा उद्देश समस्येच्या मुळाशी जाऊन उपाय करणे आणि गोडोक्सा किंवा एकाकी मृत्यूच्या वाढत्या घटनांना प्रतिबंध घालणे हा आहे.

दक्षिण कोरियाच्या आरोग्य आणि कल्याण मंत्रालयाच्या अहवालानुसार, २०२२ साली ३५५९ एकाकी मृत्यूंची नोंद झाली, तर २०२३ मध्ये हा आकडा वाढून ३,६६१ वर पोहोचला. त्यामुळेच 'Loneliness- Free Seoul' सारखे उपक्रम राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

सोल महानगर सरकार येत्या पाच वर्षांत एकटेपणाशी लढा देण्यासाठी ३२६ दशलक्ष डॉलर्स (सुमारे रु. २७०० कोटी) गुंतवणार आहे, असा रिपोर्ट The Korea Herald ने दिला आहे.

या योजनेत मानसिक आरोग्य सल्ला सेवांचा विस्तार, २४ तासांची हेल्पलाइन सुरू करणे आणि लोकांना प्रोत्साहन देण्याचा समावेश आहे. स्मार्ट २४ प्लॅटफॉर्म हा उपक्रमाचा मुख्य भाग आहे. या प्लॅटफॉर्मद्वारे सोलमधील एकटे रहिवासी, यात परदेशी नागरिकांचा देखील समावेश आहे. जे ऑनलाइन आणि ऑफलाइन मदत आणि सल्ला घेऊ शकतील.



सोलचे महापौर ओ से-हून यांन पत्रकार परिषदेत सांगितले की, निराशा, उच्च आत्महत्या दर आणि आयुष्यातील आनंदाची कमतरता यांसारख्या सामाजिक समस्यांचा संबंध एकटेपणाशी आहे. एकटेपणा ही वैयक्तिक समस्या नाहीच , तर हा समाजाचा प्रश्न आहे, त्याकडे आपल्याला लक्ष देणे आवश्यक आहे. एकटेपणाविरहित सोल तयार करण्यासाठी आम्ही सर्व प्रशासकीय साधनांचा वापर करण्यास वचनबद्ध आहोत, ज्यामध्ये प्रतिबंधापासून समाजात पुनर्वसन आणि एकटेपणा टाळण्याचे व्यवस्थापन बारकाईने केले जाईल, असे सोल महानगरपालिकेने जाहीर केले.

या योजनेचा एक भाग म्हणून, सोल पुढील वर्षी एप्रिलमध्ये 'Goodbye Loneliness 120' नावाची २४ तास कार्यरत असणारी हेल्पलाइन सुरू करणार आहे. ही हेल्पलाईन एकटेपणाशी संघर्ष करणाऱ्यांसाठी असेल, ती कॉलर्सना प्रशिक्षित सल्लागारांशी जोडून देईल. यामध्ये फॉलो-अप सपोर्ट, प्रत्यक्ष भेटी आणि आपत्कालीन मदत यांचाही समावेश असेल. ही सेवा मित्र, कुटुंबीय किंवा शेजारी म्हणून मदत करू इच्छितात त्यांच्यासाठीही उपलब्ध असेल असे The Korea Herald ने म्हटले आहे.

**सोल हार्ट कन्व्हिनियन्स स्टोअर्स**

सोल महानगर प्रशासनाने एकट्या असलेल्या लोकांसाठी सार्वजनिक जागा तयार करण्याचा निर्णय घेतला आहे. त्या जागेला सोल हार्ट कन्व्हिनियन्स स्टोअर्स म्हटले जाईल. येथे लोक इन्स्टन्ट रॅम्यन सारख्या भोजनांचा आनंद घेऊ शकतील. पुढील वर्षापर्यंत अशा चार ठिकाणांची उभारणी केली जाणार आहे. या ठिकाणी भेट देण्यापूर्वी, लोक चेकलिस्टद्वारे आपल्या सामाजिक एकटेपणाची पातळी तपासू शकतील. या जागेत उपलब्ध सल्लागारांशी बोलू शकतील आणि भोजनाचा आनंद घेऊ शकतील. सरकारने ही सेवा केवळ उच्च-जोखीम गटांपुरताच मर्यादित न ठेवता सर्व नागरिकांसाठी मानसिक आरोग्य सल्ला सेवांचा विस्तार करण्याचा निर्णय घेतला आहे. नागरिकांना सार्वजनिक आणि खाजगी मानसिक आरोग्य संस्थांमध्ये यद्वारे अपॉइंटमेंट बुक करता येईल. आठ आठवड्यांसाठी आठवड्यातून एकदा वैयक्तिक सल्ला सेवा देण्यात येईल.

**३६५ सोल चॅलेंज**

वृत्तानुसार सोल शहरातील एका अधिकाऱ्याने सांगितले की, याशिवाय, शहरातील एकटेपणाचे जोखीम ओळखण्यासाठी आणि त्याचे मूल्यांकन करण्यासाठी एका स्वतंत्र प्लॅटफॉर्मची मदत घेतली जाईल. कारण एकट्या राहणाऱ्या व्यक्ती घरीच राहून विविध सेवांचा वापर करण्याची अधिक शक्यता असते. याशिवाय लोकांना बाहेर भोजन करण्यास प्रोत्साहित करण्यासाठी, डाइनिंग डिस्काउंट्स दिले जातील.

एकटेपणाशी लढण्यासाठी आणखी एक रणनीती म्हणजे 365 सोल चॅलेंज, ज्याद्वारे शहरातील प्रमुख कार्यक्रमांना एक पॉइंट्स प्रणालीशी जोडले जाईल. या कार्यक्रमांमध्ये सहभागी होणाऱ्या लोकांना सोल स्कायवे, हान नदीवरील कॅम्पिंग साइट आणि सोल बोटॅनिक पार्कसारख्या ठिकाणांची तिकीटे बक्षिसे म्हणून मिळू शकतील.

वृद्ध रहिवाशांसाठी कुकिंग क्लासेस, एक्सरसाइज क्लासेस किंवा खानपानाच्या तरतुदी यांसारख्या पर्यायी ऑफर्सची आणकी केली जात आहे, असे वृत्त इंडिपेंडंटने दिले आहे. दक्षिण कोरियामध्ये २०२२ साली ३,५५९ एकाकी मृत्यूपैकी ५४.१ टक्के मृत्यू ५०-६० वयोगटातील होते. गेल्या वर्षी अशा मृत्यूपैकी ५३.८ टक्के मृत्यू या वयोगटातील लोकांचे होते.

दक्षिण कोरियामध्ये एकट्या राहणाऱ्या कुटुंबांची संख्या २०२१ साली ७.१६ दशलक्षवरून २०२२ साली ७.५ दशलक्ष आणि २०२३ मध्ये ७.८२ दशलक्षांवर पोहोचली आहे. Korea Institute for Health and Social Affairs (KIHASA) या सरकारी विचारमंचाच्या २०१९ च्या अभ्यासानुसार, १९ ते ३४ वयोगटातील तीन टक्के लोक, म्हणजेच ३.३८ लाख लोक, एकटेपणा आणि समाजापासून दूर राहण्याच्या समस्यांनी ग्रस्त होते.

मंत्रालयाच्या अहवालानुसार, ४० टक्के लोकांमध्ये किशोरवयातच एकटेपणाची भावना निर्माण व्हायला सुरुवात होते. २०२१ मध्ये हा आकडा पाच टक्क्यांपर्यंत वाढला, ज्याचा परिणाम ५.४ लाख तरुण कोरियन लोकांवर झाला.

सीड या नागरी संस्थेच्या मुख्य संचालक ली यूनाए यांनी म्हटले की, कुटुंब संस्कृती असलेल्या देशांमध्ये आणि आर्थिक समृद्धीवर मूल्यांकन करणाऱ्या संस्कृतींमध्ये तरुण लोक एकाकी आणि समाजापासून दूर राहण्याची अधिक शक्यता असते.

त्यांनी सांगितले की, पालक आपल्या मुलांना संधी मिळवून देण्यासाठी सर्व काही देतात आणि त्यांच्या मुलांकडून खूप अपेक्षा करतात. पालकांना वाटते की त्यांनी मिळवलेली संपत्ती आणि सामाजिक स्थान त्यांच्या मुलांनी वारशाने घ्यावे.

सोलने एकटेपणाशी लढण्यासाठी सुरू केलेला हा उपक्रम देशाला वृद्ध होत असलेल्या लोकसंख्येची आणि कमी होणाऱ्या जन्मदराची समस्या भेडसावत असताना सुरू करण्यात आला आहे.

जागतिक आरोग्य संघटनेने एकटेपणाला जागतिक सार्वजनिक आरोग्य संकट म्हणून घोषित केले आहे. गेल्या वर्षी, अमेरिकेच्या सर्जन जनरलने असे सांगितले की, एकटेपणाशी संबंधित आरोग्यविषयक धोके १५ सिगारेट दररोज ओढण्याइतके गंभीर आहेत. The Guardian च्या अहवालानुसार, वृद्धांमध्ये एकटेपणामुळे डिमेन्शिया होण्याचा धोका ५० टक्क्यांनी वाढतो, तसेच हृदयविकार रोग किंवा धक्का येण्याची शक्यता ३० टक्क्यांनी जास्त असते.

शाळेत एकटेपणाशी झुंजणारे तरुण विद्यापीठातील शिक्षण सोडण्याची अधिक शक्यता असते. जून २०२३ मध्ये Nature Human Behaviour जर्नलमध्ये प्रकाशित केलेल्या एका संशोधन पत्रिकेनुसार, एकटेपणाचा सामना करणाऱ्या लोकांमध्ये कोणत्याही कारणाने लवकर मृत्यू होण्याचा धोका ३२ टक्के जास्त असतो.

सामाजिक नेटवर्क जपणे हे इतर कोणत्याही आरोग्यवर्धक उपक्रमासारखेच आहेः नियमित व्यायाम करणे, चांगले खाणे, स्वतःची काळजी घेणे इत्यादी, असे न्यूयॉर्कच्या स्टोनी ब्रूक युनिव्हर्सिटीच्या मानसशास्त्र विभागातील समन्वयक न्यूरोसायन्सचे प्राध्यापक तुर्हान कॅन्ली यांनी गेल्या वर्षी सांगितले होते.

●●●●●●●●●●

# साधन के रसधार में, रहै निसदिन भीना रे...

प्रपंच-व्यवसायात गुंतलेल्या मनांची पावलं कधीकधी घात-आघातानं अंतर्मुख होतात. आपण कोण आहोत, आपल्या असण्याचा अर्थ काय, या भौतिक जगात सगळंच बदलणारं आहे की काही न बदलणारंही आहे, अशा जगण्याच्या प्रश्नांशी जोडली जातात. मनात एक कुतूहल जागं होतं : भक्तीचा नेमका आशय काय, ती आपली आंतरिक स्थिती आहे की कर्मकांड आहे? नुसता बोलण्याचा विषय आहे की रोजच्या जगण्यातल्या नैमित्तिक क्रिया अवधानासह नीटपणे पार पाडण्याचा विषय आहे? भक्तीचा कुठला विशेष पंथ असतो का? असावा का?

-------------------



हेमकिरण पत्की

असे अनेक प्रश्न जगणं गांभीर्यानें घेणाऱ्या मनांना पडतात. अशा विचारी मनांना कबीर आपल्या दोह्यांतून भक्तीचा आशय सांगतात. हा आशय आपण हृदयानं जाणून घेतला तर कर्म आणि ज्ञानाचा मार्ग आपल्याला उमजू शकेल. कबीरांचं सांगणं लख्ख उजेडासारखं आहे. या उजेडात मन जसं आहे तसं दिसू शकतं. भक्तीचा मार्ग कसा असतो, ते सांगताना कबीर म्हणतात...

*भक्ति का मारग झीना रे।*
*नहिं अचाह नहिं चाहना,*
*चरनन लौ लीना रे।।*

कबीरांनी त्यांच्या अखंड चिंतनातून स्वतःला सुचलेली भक्तिगीतं, पदं तल्लीन होऊन गायली. त्यांची ही अक्षरठेव कुठल्याही मुद्रित ग्रंथांतून साधकांसाठी उपलब्ध नाही. मात्र, पिढ्यान पिढ्या लोकांनी ही ठेव मुखोद्गत करून जतन केली आहे. या साऱ्या भक्तिगीतांतून कबीरांच्या भक्तिमय जगण्याचा प्रत्यय येतो. कबीरांच्या शब्दांतून, आचरणातून भक्ती अशी ओसंडून वाहताना आपल्याला दिसते.

कबीर भक्तीचे तीन मार्ग सांगतात. एक कमार्चा, दुसरा ज्ञानाचा आणि तिसरा भक्तीचा. त्यांना भक्तीचा मार्ग हृदयातून जाणारा वाटतो. सेवाभाव, ज्ञान-ध्यान याहूनही हा भक्तिमार्ग खूप तरल नि सूक्ष्म असतो, असं ते म्हणतात. कर्ममार्गात गोरगरीब, आजारी, अनाथ, वंचित यांची सेवा करायला भरपूर अवकाश आहे. ज्ञानाचा मार्ग एकल्यानं आचरायचा असतो. पण, भक्तिमार्ग आपलं हृदयपरिवर्तन करणारा व इतरांची हृदयं आपल्याशी जोडणारा असल्यानं कबीर भक्तिमार्गाविषयी खूप तळमळीनं सांगतात...

*नहिं अचाह नहिं चाहना,*
*चरनन लौ लीना रे।।*

वासना आणि निर्वासना ही वृत्तीची दोन टोकं असतात. कबीर म्हणतात, भक्तीचा मार्ग या दोन्हींच्या मध्यातून जातो. हा मार्ग कबीरांना खूप सूक्ष्म वाटतो. आपलं मन सतत अधिकाची, नव्या नव्या सुखाची मागणी करत असतं. आपण या मनामागून चालत असतो.

अधिकाची वासना मनात असली, तर आपण सुखाच्या अधीन होतो. वासना नीट समजून न घेता दुर्लक्षिली तर आपण स्वाभाविक जगण्याला पाठमोरं होण्याची शक्यता असते. यामधल्या स्थितीचा बोध घडण्यासाठी कबीर भक्तिमागार्ची दिशा दाखवतात. अति उपवास किंवा अजीर्ण होईल असं खाण्याहून परिमित आहार उत्तम असतो. कारण तोच देहा-मनाचं आरोग्य राखतो. हीच गोष्ट सर्व इंद्रियांच्या आहारातल्या संतुलनाला लागू असते. हाच तो वासना-निर्वासना यांतला मध्य साधणारा भक्तीचा अतिशय तरल मार्ग आहे.

कबीर म्हणतात, या मार्गाची दिशा दिसली की, मग भक्तामध्ये लीनता येते. त्याला देवाच्या चरणांशी लीन होऊन आपला अहंकार विसर्जित करावा वाटतो. यामुळंच भक्ताच्या हृदयात कायम ओलावा राहतो. भक्त सदाच सहृदय होऊन जातो. कसा तर...

*साधन के रसधार में,*
*रहै निसदिन भीना रे।*

भक्तीच्या साधनांत म्हणजे कीर्तन, नामस्मरण, जप यांत भक्त ओलाचिंब असतो. देवाचं सान्निध्य लाभेल अशा प्रत्येक साधनाशी तो आतून जोडलेला असतो. भक्तीचा मार्ग संतांच्या संगतीत असतो, त्यांची वचने आचरण्यात असतो. हे जाणून भक्त अनुग्रहित असतो, संतुष्ट असतो. शेतकरी जसा पावसाच्या उशिरा येण्याविषयी, अनियमित असण्याविषयी देवाजवळ तक्रार करत नाही, तशीच भक्ताची आंतरिक स्थिती असते.

*राग में श्रुत ऐसे बसै,*
*जैसे जल मीना रे।*
*साईं सेवत में देइ सिर,*
*कुछ विलय न कीना रे।।*

कबीर म्हणतात, देवाच्या स्मरणात जीवन घालवायचा हृदयाचा निर्धार झाल्यावर भक्ताचं वेगळं असणं कुठलं! देवाच्या चरणी माथा ठेवून सारा अहंकार विसर्जित करायचा, आपलं संपूर्ण कर्तेपण विसर्जित करायचं, हाच तो भक्तीचा सूक्ष्म मार्ग असतो. बुद्धीतून निघणाऱ्या तर्कट, कल्पनाजन्य, संदेहग्रस्त आणि अभावग्रस्त गोष्टी देवचरणाशी ठेवून निश्चिंत व्हायचं. हीच भक्ताची आचारसंहिता आणि तीच भक्ताला अंतिम सत्याशी जोडून देते.


●●●●●●●●●●

महासागर

# ग्लॅम वर्ल्ड

रविवार ■ दि. २७ आक्टोबर २०२४

## लॉरेन्सच्या धमक्या दरम्यान सलमान दुबईला जाणार



गँगस्टर लॉरेन्स आणि त्याच्या टोळीच्या सततच्या धमक्या दरम्यान सलमानने पुन्हा एकदा कामाला सुरुवात केली आहे. सध्या अभिनेता रिॲलिटी शो 'बिग बॉस १८' च्या शूटिंगमध्ये व्यस्त आहे.

सलमान लवकरच 'दबंग रीलोडेड' या आंतरराष्ट्रीय शोसाठी दुबईला जाणार असल्याचे ऐकू येत आहे. हा शो यावर्षी ७ डिसेंबरला होणार आहे.

या दौऱ्यात जॅकलिन, तमन्ना आणि सोनाक्षीसह अनेक सेलिब्रिटी सलमानसोबत सामील होणार आहेत. 'दबंग रीलोडेड'मध्ये सलमानसोबत जॅकलीन फर्नांडिस, सोनाक्षी सिन्हा, सुनील ग्रोव्हर, मनीष पॉल आणि आस्था गिल सारखे सेलिब्रिटी दिसणार आहेत. जॉर्डी पटेल यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

सलमानने नुकतेच अजय देवगणच्या 'सिंघम अगेन' चित्रपटाचे शूटिंग सुरक्षेत पूर्ण केले आहे. यामध्ये तो चुलबुल पांडेच्या भूमिकेत कॅमिओ करताना दिसणार आहे. १ नोव्हेंबरला प्रदर्शित होत असलेल्या 'सिंघम अगेन' या चित्रपटात सलमानचा कॅमिओ असू शकतो.

राजकारणी आणि सलमानचे जवळचे मित्र बाबा सिद्दिकी यांच्या मुंबईत नुकत्याच झालेल्या हत्येनंतर अभिनेत्याची सुरक्षा अधिक कडक करण्यात आली आहे. अलीकडेच सलमानला आणखी एक धमकीचा मेसेज आला होता ज्यामध्ये लॉरेन्सकडून वाद सोडवण्यासाठी ५ कोटी रुपयांची मागणी करण्यात आली होती. मात्र, नंतर मेसेज पाठवणाऱ्याने माफी मागितल्याचे सांगण्यात येत आहे.

या वाढत्या धमक्यांमुळे सलमानला तगडी सुरक्षा देण्यात आली आहे. त्याच्या घराबाहेरही पोलिसांची संख्या वाढवण्यात आली आहे. सध्या सलमानच्या सुरक्षेसाठी जवळपास ५१ गार्ड आहेत. या वर्षी १४ एप्रिलला सलमानच्या घरावर गोळीबार आणि त्यानंतर १२ ऑक्टोबरला मुंबईत राष्ट्रवादीचे नेते बाबा सिद्दिकी यांची हत्या करण्याची जबाबदारी लॉरेन्स गँगने घेतली आहे. गँगस्टर लॉरेन्स सध्या गुजरातच्या साबरमती सेंट्रल जेलमध्ये बंद आहे.

या वर्षी १४ एप्रिलला सलमानच्या घरावर गोळीबार आणि त्यानंतर १२ ऑक्टोबरला मुंबईत राष्ट्रवादीचे नेते बाबा सिद्दिकी यांची हत्या करण्याची जबाबदारी लॉरेन्स गँगने घेतली आहे. गँगस्टर लॉरेन्स सध्या गुजरातच्या साबरमती सेंट्रल जेलमध्ये बंद आहे.

**'सिकंदर'मध्ये सलमान दिसणार**

वर्क फ्रंटबद्दल बोलायचे झाले तर 'बिग बॉस' व्यतिरिक्त सलमान 'सिकंदर' चित्रपटाच्या शूटिंगमध्येही व्यस्त आहे. यामध्ये तो पहिल्यांदाच साऊथ अभिनेत्री रश्मिका मंदान्नासोबत दिसणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन साऊथचे प्रसिद्ध दिग्दर्शक ए आर मुरुगादास करत आहेत. २०२५ मध्ये ईदला रिलीज होणार आहे. ■ ■

## नितेश तिवारीच्या 'रामायण'मध्ये यश साकारतो आहे रावण! उत्कंठा शिगेला





दिग्दर्शक नितेश तिवारी सध्या रणबीर कपूर आणि सई पल्लवीसोबत 'रामायण' बनवत आहेत. त्यात साऊथचा सुपरस्टार यश रावणाच्या भूमिकेत दिसणार असल्याची चर्चा होती. नुकत्याच एका मुलाखतीत, अभिनेत्याने पुष्टी केली की तो हे पात्र साकारत आहे आणि त्याबद्दल उत्सुक आहे.

चाहत्यांनाही या चित्रपटाची प्रचंड उत्सुकता आहे. मुख्य कलाकारांचे अनेक एआय जनरेट केलेले फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. हॉलिवूड रिपोर्टरला दिलेल्या मुलाखतीत यश म्हणाला, 'एक अभिनेता म्हणून रावणाची भूमिका साकारणे माझ्यासाठी खूप रोमांचक आहे. मला त्याच्या पात्रातील बारकावे आवडतात.

त्याची व्यक्तिरेखा वेगळ्या पद्धतीने मांडायला खूप वाव आहे. एक अभिनेता म्हणून मी खूप उत्साहित आहे आणि मी यावर काम करत आहे. मला आशा आहे की लोकांना माझा दृष्टिकोन अद्वितीय वाटेल. रामायणवर बोलताना यश पुढे म्हणाला- 'एवढा मोठा बजेट चित्रपट बनवण्यासाठी तुम्हाला अशा कलाकारांना एकत्र आणण्याची गरज आहे. चित्रपटाच्या निर्मात्यांशी मी सुरुवातीपासून जोडलो होतो. जेव्हा मी चित्रपटांमधून ब्रेकवर होतो, तेव्हा आम्ही यावर चर्चा करत होतो. या चित्रपटासाठी आधी रणबीर, नंतर मी आणि नंतर साई पल्लवी यांना कास्ट करण्यात आले. तीन भागात बनत असलेल्या या चित्रपटाचा प्रत्येक भाग ३ तासांचा असेल. ५०० कोटींहून अधिक बजेटमध्ये बनवण्यात येणार आहे. मधु मंटेना, अल्लू अरविंद आणि नमित मल्होत्रा संयुक्तपणे चित्रपटाची निर्मिती करणार आहेत. निर्माते २०२५ च्या उत्तरार्धात त्याचा पहिला भाग रिलीज करण्याचा विचार करत आहेत. हा चित्रपट आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रदर्शित करण्यासाठी निर्माता नमित मल्होत्रा आंतरराष्ट्रीय कंपनी वॉर्नर ब्रदर्सशी करार करण्याचा प्रयत्न करत आहेत. हंस झिमर आणि ए आर रहमान सारखे ऑस्कर विजेते कलाकार संगीत आणि पार्श्वसंगीतावर काम करत आहेत. हा चित्रपट हिंदी, तमिळ आणि तेलगूसह अनेक भाषांमध्ये प्रदर्शित होणार आहे. या मुलाखतीत यशने त्याच्या सुपरहिट फ्रँचायझी KGF च्या तिसऱ्या भागाविषयीही सांगितले. तो म्हणाला, 'आम्हाला माहित आहे की लोकांना रॉकी भाईला परत बघायचे आहे. मी आणि केजीएफचे डायरेक्टर प्रशांत यावर चर्चा करत असतो. जेव्हा योग्य वेळ असेल तेव्हा आम्ही नक्कीच काहीतरी भव्य घेऊन येऊ. सध्या मी माझ्या दोन प्रकल्पांवर ('टॉक्सिक' आणि 'रामायण') लक्ष केंद्रित करत आहे.

'KGF 3' अशी गोष्ट असेल ज्याचा प्रेक्षकांना अभिमान वाटेल

यश पुढे म्हणाला, 'या चित्रपटाबद्दल आमची ठाम कल्पना आहे. यावर पूर्ण लक्ष घालून लवकरच काम सुरू करू. सध्या आम्हाला या फ्रँचायझीचे भांडवल करण्याची घाई करायची नाही. यश म्हणाला की, प्रेक्षकांनी आमच्या फ्रेंचाइजीला भरभरून प्रेम दिले आहे. आता प्रेक्षकांना अभिमान वाटेल असा चित्रपट बनवायचा आहे.

'सालार' आणि 'केजीएफ'च्या कनेक्शनवर यश म्हणाला की, या दोन्ही चित्रपटांमध्ये कोणताही संबंध नाही. या सर्व सोशल मीडियावरील केवळ अफवा असल्याचेही त्याने स्पष्ट केले. रामायणमधील रावणाच्या भूमिकेविषयी मात्र यश जाम खूश आहे ■ ■ ■ ■

## सोशल मीडिया लाइफ नको रे बाबा...



काजोलने नुकतीच सोशल मीडियावर चर्चा केली. एका मुलाखतीदरम्यान सांगितले की, मला आनंद आहे की, ज्या काळात सोशल मीडिया नव्हता त्या काळात मी आपले आयुष्य जगले.

ऑनलाइन ट्रोलिंगबाबत काजोल म्हणाली की ही आव्हाने आहेत, पण तिला तिच्या कामाचा आणि ओळखीचा अभिमान आहे.

काजोलने सोशल मीडियावर होत असलेल्या टीकेबाबत सांगितले. काजोल म्हणाली, 'सोशल मीडियावर आयुष्य खरे नसते. लोक रेड कार्पेट चित्रे पाहतात, परंतु त्यामागील मेहनतीकडे दुर्लक्ष करतात. त्यांना माहीतच नाही की मी कोणत्याही कार्यक्रमाला जायला पहाटे ५ वाजता उठते आणि रात्री साडेअकरा वाजता थकून परतते.

काजोल म्हणाली, 'लोक सोशल मीडियावर फक्त एक झलक पाहतात, तर सत्य हे आहे की मीही इतरांप्रमाणे मेहनत करते. आपल्याही आयुष्यात चांगले-वाईट दिवस येतात, पण सोशल मीडियावर फक्त तीच छायाचित्रे दिसतात ज्यात आपण हसत असतो.

ऑनलाइन ट्रोलिंगबद्दल बोलताना काजोल म्हणाली, 'बऱ्याच लोकांचा असा विश्वास आहे की जेव्हा कोणी तुमच्यावर प्रेम करते, तेव्हा त्याला तिरस्कार करण्याचाही अधिकार आहे. पण माझ्या मते हे योग्य नाही. पब्लिक फिगर असल्याने हे सर्व सहन करावे लागते.

काजोल, क्रिती सेनन आणि शाहीर शेख अभिनीत 'दो पत्ती' हा एक सस्पेन्स-क्राइम थ्रिलर आहे. या चित्रपटात क्रिती दुहेरी भूमिकेत दिसणार आहे. ■ ■

## मल्लिका @ ४८



अभिनेत्री मल्लिका शेरावतची प्रतिमा बोल्ड अभिनेत्री अशी आहे. तिच्या या प्रतिमेमुळे मोठमोठे स्टार्स तिला रात्री फोन करून भेटायला सांगायचे. तिला वाटायचे की पडद्यावर असे बोल्ड सीन केले तर काय प्रॉब्लेम होईल?

अभिनेत्रीने एका मुलाखतीदरम्यान सांगितले होते की, दुबईमध्ये एका चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान मध्यरात्री हिरोने दरवाजा उघडण्याचा प्रयत्न केला. कॉम्प्रमाइझ न केल्यामुळे 20-30 चित्रपट गमावले. मल्लिका शेरावत 'डर्टी पॉलिटिक्स' चित्रपटाच्या पोस्टरवरून वादात सापडली होती.

मल्लिका शेरावतचा जन्म २४ ऑक्टोबर १९७६ रोजी हरियाणातील हिसार जिल्ह्यातील मोथ या छोट्या गावात झाला. आज मल्लिका ४८ वर्षांची आहे.

मल्लिका शेरावतने २००२ मध्ये रिलीज झालेल्या 'जीना सिर्फ मेरे लिए' या चित्रपटातून तिच्या करिअरची सुरुवात केली होती. या चित्रपटात तिने सीमा नावाच्या मुलीची छोटीशी भूमिका साकारली होती, ज्याची फारशी दखल घेतली गेली नाही. मात्र, तिचा दुसरा चित्रपट 'ख्वाहिश' आला तेव्हा या चित्रपटाची बरीच चर्चा झाली. मल्लिकाने या चित्रपटात अभिनेता हिमांशू मलिकसोबत १७ किसिंग सीन देऊन बॉलीवूडमध्ये खळबळ उडवून दिली होती.

'ख्वाहिश' चित्रपटानंतर मल्लिका शेरावतची महेश भट्टच्या 'मर्डर' या चित्रपटाबाबत बरीच चर्चा झाली होती. या चित्रपटाच्या यशानंतरही मल्लिकाला बॉलीवूडमध्ये टीका सहन करावी लागली. मल्लिका शेरावतने एका मुलाखतीत सांगितले होते, मर्डरला यश मिळाल्यानंतरही तिला लोकांच्या द्वेषाचा सामना करावा लागला. मला असे वाटते की मर्डरच्या यशानंतरही मला स्वतःची लाज वाटावी अशी लोकांची इच्छा होती.

मल्लिका शेरावत महेश भट्ट यांना आपला गुरू मानते. या बोल्ड मर्डर सीनमुळे मल्लिकावर टीका होत असताना ती महेश भट्ट यांच्याकडे रडत आली. महेश भट्ट यांनी मल्लिकाला समजावून सांगितले की हा इंडस्ट्रीचा एक भाग आहे. या गोष्टींकडे लक्ष न देता चित्रपटाच्या यशाचा आनंद घ्यावा.

मल्लिका शेरावत अन्य एका मुलाखतीत म्हणाली - तुम्ही कॉम्प्रमाइज केल्याशिवाय तुम्हाला काम मिळणार नाही हे खरे आहे. मोठमोठे स्टार्स मला फोन करून रात्री भेटायला सांगायचे. मी विचारायचे रात्री का? ते म्हणायचे की पडद्यावर बोल्ड भूमिका केल्या तर मला रात्री भेटायला काय हरकत आहे?

बॉलिवूडमधील प्रत्येक नायिकेला एकदा तरी कॉम्प्रोमाइझ करायला भाग पाडले जाते, असे मल्लिका शेरावतचे मत आहे. ती म्हणते, बॉलिवूडमधील प्रत्येक नायिकेला कॉम्प्रोमाइझच्या टप्प्यातून जावे लागते हे खरे आहे. हा माझा अनुभव आहे. कोणत्याही अभिनेत्रीने हे खरे नाही असे म्हटले तर ती खोटे बोलत आहे. मी कॉम्प्रोमाइझ केले नाही म्हणून मला २०-३० चित्रपट गमवावे लागले.

मल्लिका शेरावत म्हणाली, 'अनेक प्रसंग आले जेव्हा तडजोडीसाठी दबाव टाकला गेला, पण माझ्याकडे असे व्यक्तिमत्त्व नाही की मी कोणत्याही स्टारशी तडजोड करेल.

मल्लिका शेरावतला प्लेबॉय मासिकाच्या मुखपृष्ठावर न्यूड पोज देण्याची ऑफर देण्यात आली होती, मात्र तिने ही ऑफर नाकारली. यामुळे आपली प्रतिमा डागाळली जाईल आणि आपल्याला बॉलिवूडमधून काळ्या यादीत टाकले जाईल अशी भीती तिला वाटत होती.

चिनी सुपरस्टार जॅकी चॅनसोबत 'द मिथ' चित्रपटात काम केलेली मल्लिका शेरावत त्याला आपला भाऊ मानते. ही अभिनेत्री सद्धया मोजक्याच चित्रपटात काम करत असल्याचे दिसते. ■ ■

## बाहुबली रिलीजनंतर आले ६ हजार मॅरेज प्रपोझल



'मी खूप आळशी आणि लाजाळू आहे... लोकांना भेटायला अजिबात आवडत नाही. मला गर्दीत कम्फर्टेबल वाटत नाही. सेटवर गरजेपेक्षा जास्त लोक असले तरी मी अस्वस्थ होतो. अनेक वेळा मला प्रश्न पडतो की मी या क्षेत्रात का आलो? पण सुदैवाने मला 'बाहुबली'सारखा सुपरहिट चित्रपट मिळाला आणि आता मला दुसरा पर्याय नाही. साऊथचा सुपरस्टार प्रभासने स्वतः एका मुलाखतीत या गोष्टी सांगितल्या असल्या तरी त्याच्या कोणत्याही चाहत्यांसाठी यावर विश्वास ठेवणे कठीण आहे.

मात्र, ही प्रभासची खासियत आहे. आळशी आणि लाजाळू असूनही, जेव्हा तो कॅमेऱ्याचा सामना करतो, तेव्हा तो पूर्ण समर्पणाने वागतो. हा सुपरस्टार आता ४५ वर्षांचा झाला आहे.

प्रभास एका फिल्मी कुटुंबातील आहे, वडील निमार्ता आहेत आणि काका अभिनेता आहेत. २३ ऑक्टोबर १९७९ रोजी चेन्नईमध्ये दक्षिणेतील लोकप्रिय निर्माता उप्पलपती सूर्य नारायण यांना मुलगा झाला. तीन भावंडांमध्ये सर्वात लहान असलेल्या या मुलाचे नाव उप्पलपती वेंकट सूर्यनारायण प्रभास राजू होते.

प्रभासचे शालेय शिक्षण चेन्नईमध्ये झाले आणि नंतर हैदराबादच्या नालंदा कॉलेजमधून पदवी प्राप्त केली. त्यानंतर हैदराबादच्या श्री चैतन्य कॉलेजमधून बी. टेक केले. लहानपणापासूनच खाद्यपदार्थांचा शौकीन असलेल्या प्रभासला हॉटेलवाले व्हायचे होते, पण त्याच्या कुटुंबीयांची इच्छा होती की त्याने चित्रपट क्षेत्रात प्रवेश करावा. वडील निर्माते आणि काका कृष्णम राजू अभिनेते होते.

या दोघांच्या जिद्दीपुढे प्रभास टिकू शकला नाही आणि २००२ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'ईश्वर' चित्रपटातून त्याने अभिनेता म्हणून पदार्पण केले.

प्रभास त्याच्या एका मुलाखतीत म्हणाला होता, 'मी अभिनेता झालो हे चांगले आहे. अन्यथा मी आतापर्यंत बटर चिकन खाणारा १४० किलोचा बिझनेसमन झालो असतो. प्रभासने करिअरच्या सुरुवातीला ७ ॲक्शन चित्रपट केले. अजय देवगणसोबत बॉलिवूडमध्ये पदार्पण केले, पण, दखलही घेतली गेली नाही. २००४ मध्ये रिलीज झालेल्या 'वर्षम'मधून प्रभासने इंडस्ट्रीत आपली ओळख निर्माण केली होती. २००५ मध्ये त्याने राजामौलीसोबत 'छत्रपती' चित्रपटात पहिल्यांदा काम केले. इथून अभिनेत्याने स्टारडम मिळवले.

प्रभासने पुढे 'डार्लिंग', 'मिस्टर परफेक्ट', 'बिल्ला' आणि 'रिबेल'सारख्या अनेक हिट चित्रपटांमध्ये काम केले.

२०१२ मध्ये प्रभासचा 'बागी' हा चित्रपट प्रदर्शित झाला होता. चित्रपटाच्या दिग्दर्शकाच्या विनंतीवरून प्रभास थिएटरमध्ये आला आणि प्रेक्षकांमध्ये त्याची प्रतिक्रिया पाहिली. प्रभास त्यांच्यामध्ये येणार असल्याचे चाहत्यांना कळले तेव्हा ते अधिकच उत्साहित झाले. प्रभासने एका मुलाखतीत सांगितले होते की, त्या दिवशी थिएटरमध्ये येण्यापूर्वीच तो सुन्न झाला होता.

२०१२ मध्ये प्रभासच्या आईला प्रभासचे लग्न लावून देण्याची इच्छा निर्माण झाली. करिअरच्या चांगल्या टप्प्यात असलेल्या प्रभासनेही लग्नाला होकार दिला. आईने स्थळं पाहायला सुरुवात केली आणि त्याच दरम्यान एक दिवस दिग्दर्शक राजामौलीने प्रभासला फोन केला. राजामौली यांनी प्रभासला 'बाहुबली' चित्रपटाची ऑफर दिली आणि त्याच्याकडे ५ वर्षांचा वेळ मागितला.

प्रभासला या चित्रपटाची स्क्रिप्ट इतकी आवडली की त्याने त्याच्या लग्नाचे बेत रद्द केले आणि राजामौलींची ऑफर स्वीकारली. प्रभासच्या आधी राजामौली यांनी हृतिक रोशनला हा चित्रपट ऑफर केला होता.

प्रभासने बाहुबली फ्रँचायझीला पूर्ण ५ वर्षे दिली. या काळात त्याने दुसरा कोणताही चित्रपट साइन केला नाही. कोणतीही जाहिरात ऑफरही स्वीकारली नाही. 'बाहुबली'चे दिग्दर्शक राजामौली यांनी एका मुलाखतीत सांगितले होते की, चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान प्रभासला आर्थिक संकटाचा सामना करावा लागला होता.

मात्र, २०१५ मध्ये हा चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर प्रभासचे आयुष्य पूर्णपणे बदलून गेले. या चित्रपटाने तो पहिला पॅन इंडिया स्टार बनला. हा चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर प्रभासला देशभरातून ६ हजार लग्नाचे प्रस्ताव आले. या चित्रपटातील अमरेंद्र बाहुबलीच्या भूमिकेसाठी प्रभासने पहिल्यांदा वजन वाढवले होते. त्याने १०५ किलो वजन केले आणि हे वजन दीर्घकाळ टिकवले.

'बाहुबली' नंतर प्रभासला भरपूर जाहिराती मिळू लागल्या. या क्रमात, त्याला फेअरनेस क्रीमची जाहिरात मिळाली ज्यासाठी निर्माते त्याला १८ कोटी रुपये देऊ केले होते, परंतु अभिनेत्याने ही ऑफर नाकारली. ■ ■

## दिवाळखोर झाले होते अनुपम खेर



अनुपम खेर यांनी नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत खुलासा केला आहे की, अनेक मोठ्या चित्रपटांमध्ये काम करूनही ते दिवाळखोरीच्या मार्गावर होते. या वाईट काळात त्यांची कारही चोरीला गेली.

शुभंकर मिश्राच्या पॉडकास्टमध्ये अनुपम खेर म्हणाले, 'टीव्ही टायकून बनण्याचा प्रयत्न करत असताना 2003-04 मध्ये मी जवळजवळ दिवाळखोर झालो. त्यावेळी मी प्रस्थापित होतो आणि चांगले चित्रपट करत होतो. पण माझे ऑफिस आणि घर दोन्ही विकण्याच्या मार्गावर होते. एके दिवशी मला आठवलं की, अभिनय क्षेत्रात यश मिळवण्यासाठी मी महालक्ष्मी मंदिरात जायचो. पण एकदा अभिनेता झाल्यावर मी जाणे बंद केले.

पुढे मुलाखतीत अनुपम यांनी सांगितले की, त्यांच्या समोरून त्यांची कार कशी चोरीला गेली. अभिनेता म्हणाला, 'मला गाडी चालवण्यात फार मजा येत नाही. पण त्यादिवशी मी स्वतः कार चालवत मंदिरात गेलो. मी कर चालू ठेवून प्रार्थना करण्यासाठी बाहेर पडलो. तेव्हा एक चोर माझ्या गाडीसह पळताना दिसला. मी ताबडतोब ऑटो बोलावला आणि ड्रायव्हरला गाडीच्या मागे येण्यास सांगितले. तरीही आम्ही त्या चोराला पकडू शकलो नाही. मग आम्ही पोलिस स्टेशनला गेलो. गाडी कशी चोरीला गेली हे मी पोलिसांना सांगितल्यावर ते हसायला लागले. त्यांना ते एखाद्या चित्रपटातील दृश्यासारखे वाटत होते. अनुपम खेर यांनी महेश भट्ट दिग्दर्शित 'सारांश' या चित्रपटातून आपल्या अभिनय कारकिर्दीला सुरुवात केली होती. यानंतर ते अनेक हिट चित्रपटांमध्ये दिसले. येत्या काळात ते 'इमर्जन्सी' या चित्रपटात कंगना राणावतसोबत दिसणार आहेत. ■ ■